E-BOOK

# सुपर डुपर हिटस्

- दिलीप ठाकूर

३






"ई साहित्य प्रतिष्ठान"
सादर करीत आहे



"श्री. दिलीप ठाकूर" लिखित

# "सुपर डुपर हिट्स"

(भाग ३)

© - "श्री. दिलीप ठाकूर" (जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)
glam.thakurdilip@gmail.com 9870616216

# "सुपर डुपर हिट्स" (भाग ३)

© लेखक : दिलीप ठाकूर

प्रकाशन : १५ मार्च, २०२५

© esahity Pratishthan®2025

**प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com esahity@gmail.com

**ई साहित्य प्रतिष्ठान : Whatsapp - 9987737237**

**(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)**

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे "ई बुक" वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी "ई साहित्य प्रतिष्ठान" ची लेखी परवानगी आवश्यक!

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!

फक्त 'एकच' क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

**For all 'E-Sahitya' E-Books.. Visit/Log on**

**https://www.esahity.com**

**(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा-**
**एक मिनिट थांबा- बस्स)**

**तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.**

**आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !**

**लक्षात घ्या. हे बोलके "ई बुक" आहे. या "ई बुक" मधील प्रत्येक "फोटो"वर  तसेच "निळ्या रंगातील मजकूर", यावर सुद्धा "लिंक्स" दिलेल्या आहेत. फक्त "क्लिक" करा, आणि त्यावरील "ऑडिओ व व्हिडिओज" चा मनसोक्त आनंद घ्या.**

## ♥ लेखकांविषयी थोडेसे ♥

**दिलीप ठाकूर**
**(जेष्ठ सिनेपत्रकार व चित्रपट विश्लेषक)**
**जन्म २० एप्रिल १९६०**

अलिबाग तालुक्यातील चौल गावात जन्म झालेल्या "दिलीप ठाकूर" यांचे बालपण, शालेय आणि महाविद्यालयीन जीवन मुंबईत गिरगावातील खोताची वाडीतील अवघ्या दहा बाय दहाच्या खोलीत घडताना एकीकडे दक्षिण मुंबईतील अनेक चित्रपटगृहात स्टॉलच्या तिकीटात सतत  नवे जुने चित्रपट पाहणे आणि त्या काळातील अनेक साप्ताहिके, मासिके, दिवाळी अंक वाचणे यात घडले. शिवाय गल्ली क्रिकेट आणि गल्ली चित्रपट यातून जनसामान्यांशी नाळ जुळली होतीच. त्यांनी गिरगावातील हिंद विद्यालय हायस्कूलमध्ये शालेय तर चौपाटीच्या भवन्स

**कॉलेज मध्ये उच्च शिक्षण घेतले. यातूनच विद्यार्थी दशेतच त्यांनी विविध नियतकालिकांमधून वृत्तपत्र लेखन सुरु केले. एकाद्या लेखावरचे मत अथवा एकाद्या ताज्या घडामोडीवरचे आपले मत 'वाचकांच्या पत्रा'तून प्रसिद्ध होत आहेत या त्यांच्यासाठी खूपच मोठा उत्साहाचा भाग होता. मार्मिक, रसरंग, चित्रानंद, सोबत, लोकप्रभा, क्रीडांगण, मनोहर अशा साप्ताहिकातून आपली पत्रे तर कधी लेखही प्रसिद्ध होत असल्याने त्यांचा लेखनातील कल वाढला. १९८२ साली त्यांनी नवशक्ती दैनिकात प्रूफ रिडर म्हणून रुजू झाले आणि त्याबरोबरच रविवार नवशक्तीत चित्रपटविषयक सदरही लिहायला मिळाले. १९८६ साली त्यांना संपादकीय विभागात बढती देण्यात आली. तेव्हापासूनचा त्यांचा प्रवास खूप वळणा वळणाचा आहे. एकीकडे हॅन्ड कंपोझ (म्हणजे हाताने खिळे लावणे) ते डिजिटल मिडिया अशी तर दुसरीकडे सिंगल स्क्रीन थिएटर्स ते ओटीटी प्लॅटफॉर्म अशी त्यांची वाटचाल आहे. ऐशी आणि नव्वदच्या दशकात त्यांनी खूपच मोठ्या प्रमाणावर अनेक दैनिके आणि साप्ताहिकात**

विविध टोपणनावाने  चित्रपटविषयक सदर लेखन केले. "राजा दिलीप", "स्पॉटबॉय", "पिक्चरवाला", "सिनेमावाला", "राजा चौलकर", "राजा फिल्मीस्तानी" वगैरे टोपणनावानी खूपच मोठ्या प्रमाणावर लेखन केले. मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रत्यक्षात शूटिंग रिपोर्टींगसाठी सेटवर जाणे, चौफेर निरीक्षण आणि लहान मोठ्या स्टार्ससह अनेक प्रकारचे तंत्रज्ञ आणि कामगार, चित्रपट वितरक व प्रदर्शक यांच्याशी संवाद साधणे यातून त्यांच्याकडे वेगळी माहिती, संदर्भ, तपशील, आठवणी यांची जमा होत गेली. याचीच पुढची पायरी म्हणून २००३ सालापासून त्यांचे चित्रपटविषयक लेख संग्रह प्रसिद्ध होत आहेत. आतापर्यंत त्यांची पंचेचाळीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यात "स्थित्यंतरातील सिनेमा", "क्लॅप", "पैसा वसूल", "यादगार पल", "फर्स्ट डे फर्स्ट शो", "कॉर्नर सीट", "सिनेमा घर", "ओपन थिएटर", "बारा ते तीन तीन ते सहा", "गल्ला पेटी", "सिनेमा मसाला मिक्स", "आऊट फोकस", 'थिएटरातील टाळ्या  शिट्ट्या',  'यश हेच चलनी नाणे' अशी

अनेक  पुस्तके प्रकाशित झाली आहेत.  त्यांच्या अनघा प्रकाशन ( ठाणे) यांच्या वतीने "टॉकीजची गोष्ट" हे दक्षिण मुंबईतील जुन्या सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या आठवणी सांगणारे पुस्तक जुन्या आठवणीत नेते. त्यात आता खाणाखुणाही शिल्लक नसलेल्या मॅजेस्टीक, रेक्स, रेडियो अशा चित्रपटगृहांवरही फोकस टाकण्यात आला आहे. इट्स मज्जा या यू ट्यूब चॅनेलसाठीचा त्यांचा 'ठाकूर विचारणार' हा मुलाखतींचा शो अतिशय लोकप्रिय आहे. अशोक सराफ, रणजीत, बाळ धुरी, विजय पाटकर, सुकन्या कुलकर्णी, अशोक समर्थ, उपेंद्र लिमये, वर्षा उसगांवकर, अश्विनी भावे आदींच्या त्यांच्या मुलाखतींची चित्रपटसृष्टीत बरीच चर्चा होत आहे. २००९ सालापासून ते मुक्त पत्रकार आणि लेखक म्हणून कार्यरत आहेत. जनसामान्य रसिकांना समजतो आणि आवडतो अशाच पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटांवर आणि त्या विश्वावर त्यांनी कायमच फोकस ठेवला. आणि त्यातूनच त्यांच्या मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत सर्व स्तरांवर खूप ओळखी झाल्या. इसाक

मुजावर आणि शिरीष कणेकर हे त्यांचे विशेष आवडते लेखक आहेत. शिरीष कणेकर यांच्या नाविन्य प्रकाशन (पुणे) यांनी प्रकाशित केलेल्या "निवडक शिरीष कणेकर" या ग्रंथातील लेखांची निवड व संपादन दिलीप ठाकूर यांनी केली आहे. विशेष म्हणजे, चित्रपती व्ही. शांताराम फाऊंडेशनच्या 'शतक महोत्सवी मराठी चित्रपट' या शंभर वर्षातील मराठी चित्रपटांची तपशीलवार माहिती दिलेल्या सूचीच्या संपादनाची संधी त्यांना मिळाली. चित्रपटविषयक माहिती आणि अनुभवाचा त्यांना जवळपास सर्वच मराठी तसेच काही हिंदी वृत्तवाहिन्यांवर प्रतिक्रिया देताना, एकाद्या चर्चेत सहभाग घेताना कायमच फायदा होत असल्याचे दिसतेय. TIMES OF INDIA इत्यादी इंग्रजी वृत्तपत्रातही त्यांची चित्रपटसृष्टीतील एकाद्या घटनेवर दशकभरापासून अधिक काळ सातत्याने प्रतिक्रिया येत आहे. त्यांना या वाटचालीत अनेक पुरस्कार प्राप्त होत आहेत. विशेष उल्लेखनीय पुरस्कार म्हणजे अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या वतीने देण्यात आलेला चित्रकर्मी पुरस्कार,

मराठी पत्रकार संघाच्या वतीने जयहिंद पुरस्कार आणि प्रमोद नवलकर स्मृती पुरस्कार, संस्कृती कलादर्पणच्या वतीने उल्लेखनीय पत्रकार पुरस्कार, इंडिवूड मिडिया एक्सलन्स ॲवॉर्ड, शिवसेना गिरगाव शाखा पुरस्कार, 'मी गिरगावकर' दक्षिण मुंबई शिवसेना शाखा पुरस्कार, थर्ड बेल एन्टरटेन्मेन्ट कलातीर्थ पुरस्कार, बालगंधर्व सन्मान चिन्ह (पुणे) इत्यादी अनेक पुरस्कारांचा समावेश होतो. जवळपास रोजच तारीखवार जुन्या काळातील चित्रपटांबाबत सोशल मिडियात पोस्ट करणे यात त्यांनी सातत्य ठेवले आहे. कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट काळातील चित्रपटापासूनच्या फोटो आणि बुकलेटचा त्यांच्याकडे उत्तम संग्रह आहे.

दिलिप ठाकूर यांना शुभेच्छा.
#संजीव_वेलणकर पुणे.        ९४२२३०१७३३
♥



"मनोगत"

"शो हाऊसफुल्ल आहे... "

मला हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पिक्चर एन्जॉय करायला आवडते. कारण गिरगावातील खोताची वाडीत लहानाचा मोठा होताना अशाच एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्समध्ये हाऊसफुल्ल गर्दीतील एक पब्लिक होऊन पडद्यावरील डायलॉगला मनसोक्त मनमुराद टाळ्या व शिट्ट्या देत मी वाढलो. १९८२ साली मिडियात आलो, चित्रपट समीक्षक व पत्रकार म्हणून चौफेर व खणखणीत वाटचाल सुरू

**केली. मी मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत भटकंती, लहान मोठ्या भेटीगाठी व  निरीक्षण असे करत करत वाटचाल सुरू ठेवल्याने मला पुस्तकाबाहेरचे आणि गुगलबाहेरचे चित्रपटाचे जग माहीत होतं होत गेले. इतकेच नव्हे तर मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीत मला ओळखणारा खूपच मोठा वर्ग आहे हे विशेष उल्लेखनीय आहे. या प्रवासात चित्रपट विश्लेषक अशी प्रगती केली. या सगळ्यात माझ्यातील चित्रपट रसिक कायम राहीला. जनसामान्य प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा चित्रपट तोच माझा चित्रपट. अशा सर्वज्ञात चित्रपटावर लिहिणे, बोलणे जास्त आव्हानात्मक असते. कारण संदर्भ, माहिती, तपशील अजिबात चुकुन चालत नाही. अशाच काही सुपर डुपर हिट चित्रपटावरचे माझे ई बुक. आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीत रसिकांची आवडनिवड ही अतिशय महत्त्वाची गोष्ट. त्यांच्या संवेदनशीलतेवर मी कायमच विश्वास ठेवला आणि मी त्यांच्यातीलच एक आहे अशी भावना जपली. आजही मल्टीप्लेक्समध्ये चित्रपट एन्जॉय करतांना एखाद्या डायलॉगला**

मनापासून दाद देतो. आपण चित्रपट समीक्षक आहोत तेव्हा आपण गंभीरच असावे असे मी वागण्या बोलण्यात का आणू? आपण जनसामान्याचे प्रतिनिधी आहोत, त्यातून आलो आहोत हे विसरत नाही. म्हणून त्यांना आपलेसे वाटतील असे माझे विषय असतात.... आणि सुपर डुपर हिट ही खूपच मोठी गोष्ट. त्यामुळे सामाजिक सांस्कृतिक माध्यम आणि आर्थिक वातावरण बदलून जाते. अनेक यशोगाथा जन्माला येतात. गॉसिप, ग्लॅमर, फिल्मी गप्पा, गल्ला पेटी अशी सगळीकडे त्या यशाची चर्चा रंगते. सेलिब्रिटीजचा आत्मविश्वास वाढतो. त्यांच्या कारकिर्दीला गती येते. त्याला इमेज मिळते. एक सुपर डुपर हिट मंगता है यार असे उगाच म्हटले जात नाही. अशा अनेक गोष्टी यशात असतात. त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न म्हणजेच हे पुस्तक सुपर डुपर हिट....

माझा अनेक वर्षांपासूनचा जिवलग मित्र डॉ. अनंत पावसकर यांनी काही महिन्यांपूर्वी अतिशय प्रेमाने पुढाकार घेऊन माझे "शोले पन्नास वर्षे" हे पहिले "ई बुक" प्रकाशित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली! ई साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने ते

पुस्तक प्रकाशित झाले. भरपूर माहिती व मनोरंजन असलेल्या त्या ई बुकला रसिक वाचकांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, आजही मिळतोय. त्यामुळे अधिक उत्साहाने हे पुस्तक आपल्या समोर आणत आहे. या पुस्तकातील लेख तात्कालिक आहेत. पण चित्रपट सर्वकालीन सुपरहिट आहेत. हे पुस्तक जुन्या काळातील चित्रपट रसिकांना एक उत्तम फ्लॅशबॅक आहे तर आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला हे चित्रपट पहावेसे वाटतील. ई बुक हे जगभरातील वाचकांपर्यंत पोहोचत असते आणि आपले पुस्तक अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचावे ही लेखकाची मनोमन इच्छा असतेच असते. चित्रपट आणि चित्रपटसृष्टी यावर माझी मुद्रित माध्यमापासून माझी आतापर्यंत चव्वेचाळीस (४४) पुस्तके प्रकाशित झाली आहेत. चित्रपटसृष्टीतील मोठ्या सेलिब्रिटींज पासून सेटवरील कामगारांपर्यत आणि चित्रपट वितरकापासून कला दिग्दर्शकापर्यत अशा सर्वच स्तरातून मी सातत्याने काम करताना ही चित्रपटसृष्टी अधिकाधिक प्रमाणात जाणून घ्यायला

**मी कायमच उत्साह दाखवला. चित्रीकरणासाठीचे स्टुडिओ ते मिनी थिएटर्स असा माझा प्रवास सुरू आहे हे माझ्या अनेक पुस्तकांतून आपणास लक्षात येईलच वा आले असेल. मुद्रित माध्यमे, वृत्त वाहिन्या व डिजिटल युग असा माध्यमे स्वीकारत ही वाटचाल सुरू आहे आणि त्याच वाटचालीत हे "सुपर डुपर हिट" हे पुस्तक! आपण याही पुस्तकाचे नक्कीच स्वागत कराल याचा नक्कीच विश्वास आहे. अर्थात, इतकी वर्षे सतत काम करीत असतानाही आजही नवीन गोष्टी शिकण्याची व जाणून घेण्याची माझी इच्छा कायम आहे! मी आजही विद्यार्थी म्हणून वावरतोय....!**

**दिलीप ठाकूर**
**(ज्येष्ठ पत्रकार आणि चित्रपट विश्लेषक)**

♥



# <u>सादर करीत आहे.. "श्री. दिलीप ठाकूर" लिखित "सुपर डुपर हिट्स" (भाग ३)</u>

## <u>अनुक्रमणिका</u>


| | |
|---|---|
| ३९. मिली | (१६) |
| ४०. प्रतिज्ञा | (२२) |
| ४१. आखरी दाव | (३१) |
| ४२. कुछ कुछ होता है | (४०) |
| ४३. नया दिन नई रात | (५७) |
| ४४. ताल | (६७) |
| ४५. इश्क इश्क इश्क | (८१) |
| ४६. हाथ की सफाई | (९५) |
| ४७. "श्री-डी" चित्रपट | (११८) |
| ४८. जैसे को तैसा | (१२९) |
| ४९. सौदागर | (१३८) |
| ५०. शूल | (१५१) |
| ५१. मृत्युदंड | (१६१) |
| ५२. छोटी बहू | (१६८) |
| ५३. मनोज कुमार | (१७७) |
| ५४. मेरे जीवन साथी | (१९२) |
| ५५. परिचय | (२०३) |
| ५६. राजा जानी | (२१२) |
| ५७. विधू विनोद चोप्रा | (२२०) |
| ५८. बाजीगर | (२३३) |

## लेख क्र : ३९

## "मिली" @५० वर्षे ! "प्रेमाची वेगळीच परिभाषा.."




हिंदी चित्रपटातील 'प्रेम' ही कधीच न आटणारी/ओहोटी नसलेली हवीहवीशी वाटणारी बहुरंगी गोष्ट! हिंदी चित्रपट निर्मितीत 'प्रेमपटांची' संख्या जास्त भरेल! किती सांगावेत तरी कमीच! आणि मग त्यात प्रेमगीत, प्रियकराच्या भेटीच्या ओढीचे गीत, कधी विरह गीत, एकाद्या प्रेमाच्या गोष्टीचा शेवट गोड तर एकाद्या प्रेमाच्या गोष्टीचा शेवट दुर्दैवाने शोकांतिका! प्रेमाचे संवाद, प्रेम गीत यांचे

'पीक' तर अफाट! पडद्यावरचे प्रेम पाहून पाहून मात्र अनेक प्रेमवीर घडले, हे मात्र नक्की!

..आणि यात ह्रषिकेश मुखर्जी दिग्दर्शित "मिली" चित्रपटातील प्रेमाची गोष्ट आणखीनच वेगळी! जगावेगळी म्हटलं तरी चालेल! मुंबईत हा चित्रपट २० जून १९७५ रोजी प्रदर्शित झाला! म्हणजेच या चित्रपटाच्या प्रदर्शनास पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत. मुंबईत मेन थिएटर 'नॉव्हेल्टी'त या चित्रपटाने तसे साधारण स्वरुपाचे यश संपादले!

हे प्रेम अगदीच वेगळे! एका अतिशय दुर्धर आजाराने ग्रस्त असलेली 'मिली' (जया बच्चन) आपल्या आयुष्यातील लहान मोठ्या गोष्टींचा आनंद घेते! मैत्रीणीत रमतेय! अशातच त्याच सोसायटीत राह्यला आलेला शेखर दयाल (अमिताभ बच्चन) हा आपले एकटेपण घालवण्यासाठी नियमित थोडेसे मद्यपान करतो! त्याला 'मिली'च्या आयुष्याबद्दल त्याला तिच्या वडिलांकडून (अशोककुमार) समजते आणि

तिच्याबद्दल शेखर दयालला 'सॉफ्ट-कॉर्नर' वाटू लागतो! त्यातून त्यांचे प्रेमाचे एक वेगळे नाते निर्माण होते आणि मिलीला चांगले उपचार मिळावेत म्हणून शेखर तिला विदेशी घेऊन जातो!

ही गोष्ट बिमल दत्ता व डॉ. राही मासूम रझा यांनी लिहिली आहे! हसत खेळत खेळत भावनिक होणारी अशी ही गोष्ट आहे! ह्रषिकेश मुखर्जी यांनी अतिशय उत्कटपणे ती साकारली आहे हे विशेष! चित्रपटात उषा किरण, सुरेश चटवाल, शुभा खोटे, अरुणा इराणी इत्यादींच्याही प्रमुख भूमिका आहेत. छायाचित्रण जयवंत पाठारे यांचे आहे. चित्रपटाची आणखीन एक जमेची बाजू म्हणजे योगेश यांच्या गीतांना सचिन देव बर्मन यांचे श्रवणीय संगीत! 'आये तुम याद मुझे..' (किशोरकुमार), 'बडी सुनी सुनी है..' (किशोर कुमार), 'मैने कहा फुलो से..' (लता मंगेशकर) ही गाणी कधीही ऐकावीत, अगदी प्रसन्न वाटते!

"मिली" चित्रपट म्हणजे दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी यांनी आपल्याच "आनंद" (१९७१)ची नायिकाप्रधान गोष्ट साकारली असे म्हटले गेले! वरकरणी तथ्य दिसते. "आनंद" (राजेश खन्ना) आपल्याकडे आता मोजकेच आयुष्य शिल्लक असून त्या दिवसांचा अधिकाधिक मनसोक्त मनमुराद आनंद घ्यावा असे त्याला मनापासून वाटते. उर्वरित आयुष्यातील प्रत्येक क्षण त्याला भरभरुन जगायचाय! त्यातून तो जगण्याचे तत्वज्ञान सांगतो! "मिली"चीही तीच भावना आहे! पण तिला नवीन शेजारी आल्याने एक भावनिक आधार मिळतो! आणि त्यातून उपचाराचा मार्ग सापडतो! "आनंद" चित्रपटाचा शेवट पाहून अनेकांचे डोळे पाणावतात! आजही म्हणजे चित्रपटाला तब्बल चौपन्न वर्षे होवूनही तो हेलावून सोडतो. "मिली" अंतर्मुख करतो. असे चित्रपट आजच्या काळात निर्माण होणे आवश्यक असले तरी अवघड. हृषिकेश मुखर्जी यांची जया भादुरीवर विशेष माया!

त्यांनीच पुण्यातील दूरदर्शन व चित्रपट अभिनय प्रशिक्षण संस्थेतून जया भादुरीला "गुड्डी" (१९७१)तून चित्रपट क्षेत्रात आणले! त्यानंतर त्यांच्या 'बावर्ची' (१९७२), 'अभिमान' (१९७३), 'चुपके चुपके' (१९७५), 'मिली' १९७५) या चित्रपटात 'जया बच्चन' आहे. दरम्यान जया भादुरीची 'जया बच्चन' झाली! ह्रषिदांची अमिताभ बच्चनवरही खास मर्जी! 'बावर्ची'चे निवेदन आणि 'गोलमाल' (१९७९) या चित्रपटात अमिताभ पाहुणा कलाकार! तसेच ह्रषिदांच्या 'आनंद' (१९७१), 'नमक हराम' (१९७३), 'अभिमान' (१९७३), 'मिली' (१९७५), 'आलाप' (१९७७), 'जुर्माना' (१९७९), 'बेमिसाल' (१९८२) या चित्रपटात अमिताभ आहे! दिग्दर्शक व कलाकार अशा जोडीत



हीदेखील एक

वैशिष्ट्यपूर्ण जोडी! सहज म्हणून सांगतो! गुलजार यांनी आपल्या दिग्दर्शना तील चित्रपटात जितेंद्र व विनोद खन्ना यांना सातत्याने संधी दिली (पण राजेश खन्ना व अमिताभ बच्चन यांना आपल्या दिग्दर्शनातील कोणत्याच चित्रपटात संधी दिली नाही!) तर हृषिकेश मुखर्जी यांनी राजेश खन्ना व अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम केले, पण आपल्या दिग्दर्शनातील चित्रपटात जितेंद्र व विनोद खन्ना यांना कधीच संधी दिली नाही! त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'आनंद', 'बावर्ची', 'नमक हराम' व 'नौकरी' या चित्रपटात राजेश खन्ना आहे.) या सगळ्यात "मिली" मात्र सर्वथा वेगळा! हिंदी चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीत १९७५ साल हे खूपच वैशिष्ट्यपूर्ण. हे असे पुन:पुन्हा अधोरेखित होत आहे!

© दिलीप ठाकूर
(कलाकृती मिडिया)

**लेख क्र : ४०**

## 'प्रतिज्ञा' @ ५० वर्षे!.. 'धर्मेंद्र नाचला आणि पब्लिकने थिएटर डोक्यावर घेतले...!'




ते दिवसच वेगळे होते, म्हणूनच असे काही भन्नाट घडे!

स्थळ : वांद्र्याच्या मेहबूब स्टुडिओतील ध्वनिमुद्रण स्टुडिओ. वादकांचा ताफा बसलाय!

निमित्त : दुलाल गुहा दिग्दर्शित "प्रतिज्ञा" चित्रपटाच्या गाण्याचे रेकॉर्डिंगचे!

आनंद बक्षी यांच्या गीताना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत हे तर सुपरहिट समीकरण! यांची अनेक गाणी पन्नास पंचावन्न वर्षानंतर आजही लोकप्रिय आहेत! पुन्हा ऐकली,

पाहिली, गुणगुणली जातात. लोकप्रिय गाण्यांनी एका पिढीतील चित्रपट पुढील अनेक पिढ्यात जात असतात!

असेच एक गाणे, 'मै जट यमला पगला दीवाना...'! याच गाण्याचे हे रेकॉर्डिंग. पार्श्वगायक मोहम्मद रफी यांनी हे गाणे, त्याचे स्वरुप, पडद्यावरील त्याचे सादरीकरण, हे धर्मेंद्रवर चित्रीत होणार आहे याची माहिती हे सगळे समजून घेतले. (या चित्रपटाची निर्मिती त्याचा भाऊ विक्रमसिंग देओल याची असल्याने चित्रपटात धर्मेंद्र असणार हे वेगळे सांगायलाच नको. धर्मेंद्रही या गाण्याच्या रेकॉर्डिंगला हजर होता. घरचाच चित्रपट आहे म्हटल्यावर काय हो!?)

मोहम्मद रफी आपले प्रत्येक गाणे समरसून गाण्यासाठी ओळखले जाणारे. तशी आत्मियता हे त्या काळाचे वैशिष्ट्य! (उगाचच व्यावसायिकता वगैरे शब्द तोपर्यंत व्यवहारात आले नव्हते!) या गाण्यासाठी मोहम्मद रफी यांचा काही वेगळाच मूड लागला. ते गाता गाता उभ्या

उभ्या जणू नाचू लागले. गाणे तसे मस्तीभरे असल्याने त्याचा तसाच आनंद घेत घेत गायला हवे होते ते त्यांनी केले! रेकॉर्डिंग स्टुडिओतील वादक, रेकॉर्डिस्ट आणि अर्थातच धर्मेंद्र हे सगळे पाहुन थक्क झाले. त्यांना रफीसाहेबांचे विशेष कौतुक वाटले! धर्मेंद्रला तोपर्यंत मोहम्मद रफी यांनी अनेक गाण्यांसाठी पार्श्वगायन केले असल्याने धर्मेंद्रच्या आवाजाची मोहम्मद रफी यांना चांगलीच ओळख होती (त्या काळातील पार्श्वगायक/पार्श्वगायिका आपण कोणत्या कलाकारासाठी गातोय याचे भान ठेवत म्हणून तर पडद्यावर तो कलाकारच जणू गातोय असे वाटे. असं आजच्या चित्रपट गीत संगीताबाबत अजिबात होत नाही.)

मोहम्मद रफी याचा यावेळचा मनसोक्त मनमुराद उत्साह पाहून धर्मेंद्रही खुश झाला, त्याने रफीसाहेबांना मिठी मारली, पंजाबी शैलीत त्यांचे कौतुक केले आणि आपण हे गाणे असेच चांगल्या पध्दतीने पडद्यावर साकारु असे म्हटले!

हा किस्सा त्या काळात खूप गाजला!

त्यानंतर "प्रतिज्ञा" चे एकेक चित्रिकरण सत्र पार पडत गेले आणि मग या गाण्याच्या चित्रिकरणाची वेळ आली. तेव्हा धर्मेंद्रची मोठीच कसोटी होती! कारण नृत्य हे धर्मेंद्रचे अंग नव्हतेच! प्रेमगीत, विरहगीत, मैत्रीचे गीत, स्टेजवरचे माईकसमोरचे गीत, एकादे पार्टीतील गीत अशी गाणी त्याने पडद्यावर साकारली होती. (आणि पुढेही मोठ्याच प्रमाणावर साकारली.) पण नाचायचे तर हंसे होणार! ते आपणास जमणारे नाही. नृत्य दिग्दर्शकाने 'यमला पगला दीवाना' कसे नाचत नाचत साकारायचे हे नृत्य स्टेप सांगत समजावले. पण धर्मेंद्रला ती स्टेप्स बरेच प्रयत्न करुनही जमेना. त्याचे नाचकाम व कॅमेरा मूव्हमेंट यांचा काही ताळमेळ बसेना! ते अधिकच विचित्र होवू लागले. अखेर धर्मेंद्रने निर्णय घेतला. आपल्याला जमेल तसं मुक्त नाचायचे. चित्रपट ॲक्शन कॉमेडी आहे. त्यात ते फिट्ट बसेल आणि हा चित्रपट आपल्या

घरचीच निर्मिती आहे. आपण ठरवू ते होईल, व्हायलाच हवे. आणि त्याने जसे पाय उचलतील, हातवारे होतील तशी नाचायला सुरुवात केली. जवळपास चार दिवस या गाण्याचे तुकड्या तुकड्यात चित्रीकरण रंगले. संकलकाने ते पडद्यावर बरे दिसेल असे कापले व जोडले. अर्थात धर्मेंद्रला नाचता येते असे अजिबात म्हटले जात नसल्याने हा एकूणच आश्चर्याचा धक्का बसला!

"प्रतिज्ञा" प्रदर्शित झाला आणि हे गीत नृत्य पडद्यावर येताच पब्लिकने प्रचंड टाळ्या आणि शिट्ट्यांनी अख्ख् थिएटर असे काही डोक्यावर घेतले की 'पिक्चर हिट है!' हे सांगायला फिल्मी ज्योतिषाची गरजच लागली नाही. पब्लिक बोली 'पिक्चर कडक'!. म्हणजेच 'सुपरहिट!'

"प्रतिज्ञा" मुंबईत २७ जून १९७५ रोजी प्रदर्शित झाला. म्हणजेच त्याच्या प्रदर्शनास पन्नास
वर्षे पूर्ण होत आहेत. १९७५ मध्ये चित्रपटसृष्टीत

अनेक गोष्टी घडल्या, त्यात ही एक!

"प्रतिज्ञा" हा फुल्ल मसालेदार मनोरंजक चित्रपट. त्या काळात मोठ्याच प्रमाणावर डाकूपट बनत. प्रत्येक पटकथाकार व दिग्दर्शकाची त्यात शैली वेगळी. अधला मधला मसाला म्हणा वा भेसळ म्हणा, पण वेगळीच. अगदी चित्रपटाच्या नावातच डाकूपट (चांद दिग्दर्शित "धर्मा", सुलतान अहमद दिग्दर्शित "हीरा" वगैरे ). अशा डाकूपटात डायलॉगबाजी भरपूर! पब्लिक हमखास टाळ्या वाजवणार. आणि त्यात गीत, संगीत व नृत्याचीही बहार. ध्वनिमुद्रिकांचा खप वेगाने वाढे. "मै जट यमला दीवाना.."! या गाण्याने तर शहरांपासून ग्रामीण भागात दूरवर लाऊडस्पीकरवर अक्षरश: धुमाकूळ घातला! चित्रपटातील लोकप्रिय गाणी चित्रपटाला अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचवते (चित्रपट निर्मितीत पाऊल टाकणाऱ्यांनी याचा विचार करायला हरकत नाही.)

"प्रतिज्ञा"ची पटकथा शफिक अन्सारी, नबेन्दु घोष व कंवलजित सिंग यांची! धर्मेंद्रची दुहेरी भूमिका! ट्रकचालक अजितसिंग व पोलीस इन्स्पेक्टर देवेंद्र सिंग! यातून उडणारा गोंधळ आणि त्यातूनच भरत डाकू (अजित) व त्याचा उजवा हात (इम्तियाज खान) यांचा खातमा म्हणजेच हा चित्रपट! यात राधा (हेमा मालिनी) ट्रकचालकाची प्रेयसी आहे. ग्रामीण भागातील कथानक असल्याने त्यानुसार गोष्टी रंगतात. चित्रपटात केश्तो मुखर्जी (हमखास दारुड्याची भूमिका. प्रत्यक्ष आयुष्यात मात्र तो दारु पित नसे.), सुंदर, मारुती, जगदीप, बिरबल असे अनेक कॉमेडीयन विनोद निर्मातीसाठी होते! रंगत येई! याशिवाय प्रदीपकुमार, अभी भट्टाचार्य, नासीर हुसेन, सत्येन कप्पू, लीला मिश्रा इत्यादींच्याही भूमिका.

चित्रपटातील गाणी लोकप्रिय आहेत. "मै जंगल की मोरनी.." (लता मंगेशकर), "परदेसी आया देस में.." (लता

मंगेशकर), "उठ निंद से.." (मोहम्मद रफी व लता मंगेशकर) याबरोबरच "मै जट यमला पगला दीवाना...." (मोहम्मद रफी)

धर्मेंद्र व हेमा मालिनी त्या दिवसात पडद्यावर पाहण्यास पब्लिक इच्छुक असत आणि गॉसिप्स मॅगझिनमधून त्यांचा खास रिश्ता रंगवून रंगवून मांडला जाई. हेमा मालिनीच्या काही आवडत्या चित्रपटातील एक म्हणजे, "प्रतिज्ञा" आहे! कम्माल वाटतेय? तद्दन व्यावसायिक मनोरंजक चित्रपट
आहे आणि तशाच दृष्टिकोनातून याकडे पाह्यला
हवे. दिग्दर्शक दुलाल गुहा यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटात "दुश्मन" (१९७२, मीनाकुमारी, राजेश खन्ना, मुमताज) चे कथानक काहिसे वेगळे! त्यांच्या दिग्दर्शनातील काही चित्रपट सांगायचे तर, "धरती कहे पुकार के" (१९६९), "मेरे हमसफर" (१९७०), "दोस्त" (१९७४), "खान दोस्त" (१९७६),

"दो अन्जाने" (१९७६), "दिल का हीरा" (१९७९) इत्यादी. "प्रतिज्ञा" चित्रपट फर्स्ट रनला चांगलाच यशस्वी ठरल्याने मॅटीनी शो व रिपीट रनलाही त्याला चांगलीच गर्दी होई! तीच तर जास्त महत्वाची असते! आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला "प्रतिज्ञा" मधील "जट यमला दीवाना" गाणे भारी आवडेल. आज लहान मोठ्या सणात नाचकाम असतेच असते, त्यात हे गाणे एकदम फिट्ट! आणि कालांतराने धर्मेंद्रनेच समीर कर्णिक दिग्दर्शित "यमला पगला दीवाना" (२०११), त्याचाच दुसरा भाग संगीत सिव्हन दिग्दर्शित "यमला पगला दीवाना २" (२०१२) आणि मग तिसरा भाग नवनियत सिंग दिग्दर्शित "यमला पगला दीवाना ३" ( २०१८) हे चित्रपट निर्माण करताना "प्रतिज्ञा"च तर पुढील पिढीसमोर आणला! सगळेच चित्रपट पडद्यावरुन उतरले की फक्त "यू-ट्यूब" वर राहत नाहीत तर काही चित्रपट रसिकांच्या मनातही राहतात. (सर्व "लिंक्स" नक्की पहा. एन्जॉय!)

# लेख क्र : ४१

## "आखरी दाव" @५० वर्षे..
## "खेळ जो रंगलाच नाही...!"




"आखरी दाव" नावाचा चित्रपट होता हे फारसं लक्षात का येत नाही, कारण तो गल्ला पेटीवर यशस्वी ठरला नाही! चित्रपटाच्या जगात कायमच यशाच्या कथा होतात. त्यातील काही यशात दंतकथाही सामिल होतात. "आखरी दाव" बाबत नेमके काय झाले?

स्टार पटकथाकार सलिम-जावेद जोडीने काम करायचे त्या काळात त्यांची यशाची टक्केवारी भारी होती! या नावाला "ग्लॅमर" होते. वजन होते आणि त्याचा त्यांनादेखील विलक्षण अभिमान होता. तो त्यांच्या वागण्या बोलण्यात दिसे. तरी त्यांच्या खात्यात ए. सलाम दिग्दर्शित "आखरी दाव", देब मुखर्जी दिग्दर्शित "इमान धरम", सुदेश इस्सार दिग्दर्शित "सौदा" व रमेश तलवार दिग्दर्शित "जमाना" यांचे अपयश आहेच! आमच्या पटकथेवर प्रत्येक लहान मोठ्या दृश्याचे सगळेच बारीक  सारीक तपशील असतात (कॅमेरा कुठे असावा, कोणता असावा यापासून सगळेच ) त्यामुळेच दिग्दर्शकाला फारसे काम राहत नाही असे एका गॉसिप्स मॅगझिनला त्यांनी दिलेल्या मुलाखतीवरुन वाद ओढवून घेणारे आपल्या या यशावर फारसे कधी काहीच बोलत नाहीत!  "सौदा" या चित्रपटाचे ते कधी नावच घेत नाहीत! त्याच्या पोस्टरवर त्यांचे नाव आहे. हाही चित्रपट पडद्यावर

आला तोच पडला! आपण अपयशी देखील ठरलो हे मान्य करायला काय हरकत आहे? तेवढा मनाचा मोठेपणा हा हवाच!

"आखरी दाव" या चित्रपटाच्या मुंबईतील प्रदर्शनास पन्नास वर्ष पूर्ण झाली! (मुंबईत मेन थिएटर "स्वस्तिक") एव्हाना तुम्हांलाही माहित्येय १९७५ साल हे हिंदी




चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीतील अतिशय वेगळे व बहुचर्चित असे गाजलेले वर्ष! (आम्ही तेव्हा एस. एस. सी.ला म्हणजे केवळ पंधरा वर्षाचे होतो!).. विशेषत: रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" मुळे तर कायमच हे वर्ष चित्रपट चर्चेच्या नकाशावर असते! आता तोच "शोले" प्रदर्शित होत

असल्याच्या (अर्थात १५ ऑगस्ट १९७५) वातावरणात "आखरी दाव" नावाचा चित्रपट प्रदर्शित होत असल्याची फारशी कोणी दखल घेईल का? ते दिवसच वेगळे होते! शोलेदेखील असा व इतका खणखणीत व दीर्घकालीन यश प्राप्त करेल असे तरी कुठे कोणाला वाटले होते? पिक्चर हिट होईल की फ्लॉप हे पब्लिकच्या हातात/ मनात/ डोक्यात/ डोळ्या समोर असते. तो निर्णय त्यांचाच! कार्पोरेट युगात नेमका त्याचाच विसर पडला, ते आकडेमोडीने चित्रपटाचे यशापयश सांगू लागले आणि चित्रपट एकावर कोसळू लागलेत..! आता त्या आकड्यांवरचा चित्रपट रसिकांचा विश्वासही उडालाय. आजही शोलेच्या यशाच्या गोष्टी सांगताना त्यात त्याचा सामाजिक सांस्कृतिक प्रभाव दिसतो.

"आखरी दाव" पटकथेपासूनच फसला! आणि मग दिग्दर्शक ए. सलाम काहीच चमक दाखवू शकला नाही. चित्रपटात जितेंद्र व सायरा बानू अशी जोडी! तशी न

शोभणारी! पटतंय ना? जोडीला डॅनी डेन्झोपा, पद्मा खन्ना, रणजित, रमेश देव, इफ्तिखार, सत्येन कप्पू, मोहन चोटी इत्यादींच्या प्रमुख भूमिका. हा गुन्हेगारपट! खरं तर सलिम जावेद म्हटल्यावर त्यात टर्न आणि ट्विस्ट अपेक्षित असतात. भगवती चरण वर्मा यांच्या १९५०च्या एका कादंबरीवर आधारीत ही पटकथा! दिग्दर्शक ए. सलाम यांनी तत्पूर्वी "मर्डर इन सर्कस" नावाच्या चित्रपटाचे दिग्दर्शन केलेले! त्याशिवाय त्यांचे चित्रपट म्हणजे "सलाखें", "जमानत", "गंगा और सूरज", "गर्म खून", "आग और दाग" वगैरे! सगळेच चित्रपट अगदीच सर्वसाधारण! निर्माते एम. एम. मल्होत्रा यांच्यामुळेच ए. सलाम यांना सलिम-जावेद यांची पटकथेवरील चित्रपट दिग्दर्शित करण्यास मिळाला! अन्यथा सलिम-जावेद आपल्या पटकथेवर कोण बरे दिग्दर्शक काम करतोय याबाबत जास्त जागरुक असत! तेही बरोबरच आहे म्हणा. कारण आपण जे लिहिलंय ते तसेच प्रेक्षकांपर्यंत

पोहचायला हवे. जितेंद्र तेव्हा फॉर्मात असूनही "आखरी दाव" या आपल्या चित्रपटाला वाचवू शकला नाही. सायरा बानूची ही खरं तर सेकंड इनिंग! पण हाय !

हे दोघे व्यावसायिकदृष्ट्या एकत्र कसे आणि का आले, त्यांनी एकूण किती चित्रपटांचे पटकथा संवाद लेखन केले, त्यातील किती  सुपर हिट झाले, कोणते फ्लॉप झाले, ते दोघे नेमके कोणत्या कारणांनी वेगळे झाले, मग त्यांनी स्वतंत्रपणे वाटचाल कशी सुरु केली, ती कशी झाली त्यापलीकडे जाऊन त्यांनी बरेच काही हिंदी चित्रपटसृष्टीला, पटकथा संवाद लेखकांना, प्रेक्षकांना दिले आहे!

प्रकाश मेहरा निर्मित आणि दिग्दर्शित 'जंजीर' (१९७३) मध्ये अमिताभने साकारलेल्या सूडनायकाला प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले आणि अमिताभला 'अ‍ॅन्ग्री यंग मॅन' अशी इमेज मिळाली! त्यानंतर सलिम जावेद लिखित 'मजबूर', 'दीवार', 'शोले', 'त्रिशूल', 'इमान धरम', 'काला पत्थर', 'डॉन',

'शान', 'दोस्ताना' आणि 'शक्ती' या चित्रपटात अमिताभने भूमिका साकारली! ते सगळेच चित्रपट रौप्य महोत्सवी हिट! अपवाद 'इमान धरम'चा! त्याचे स्वागतच थंड झाल्याचे आठवतेय! त्यांनी 'मिस्टर इंडिया' देखील अमिताभसाठीच लिहिला होता! पण अमिताभ नेमका तेव्हाच राजकारणात लोकसभेत खासदार असल्याने तो योग हुकला!




लेखनात जावेद अख्तरचा कल! (ते जुने चित्रपट मोठ्याच प्रमाणावर पाहत) व व्यवहारात सलिम खान यांची हुशारी यातून ही जोडी जमली! सलिम जावेद यांनी लिहिलेले इतर चित्रपट असे, 'सीता और गीता', 'आखरी दाव', 'सौदा', 'चाचा भतिजा', 'हाथ की सफाई', 'यादो की बारात', 'क्रांती',

'जमाना' आणि 'मिस्टर इंडिया'! याशिवाय दोन कन्नड चित्रपटही त्यांनी लिहिले! एकूण सव्वीस पटकथा संवाद लेखनात त्यांनी असा आणि इतका जबरदस्त ठसा उमटवला की, त्यांना सेलिब्रेटिज स्टेटस मिळाले. त्यांच्याबाबत स्टोरीज, किस्से, दंतकथा, गोष्टी पसरु लागल्या. त्यातली एक खूपच चांगली होती, 'सर्वाधिक मानधन घेणारे पटकथा संवाद लेखक' ही त्यांच्याबाबतची चर्चा रंगली! तोपर्यंत सिनेमा लिहिणे म्हणजे काय हे....

जनसामान्यांपर्यंत पोहचले नव्हते! चित्रपट टेबलावर आकाराला येतो, ते म्हणजे बंदिस्त पटकथा लेखन आणि अचूक संकलन. अगोदर लेखणी आणि मग कात्री नीट



चालवता यायला हवी. चित्रपट माध्यम सोपे नाही म्हणतात ते उगीच

नाही. सत्तरच्या दशकात बरेच काही घडले! त्यात सलिम जावेद यांच्या युगात पटकथा संवाद लेखकाला 'ग्लॅमर' आले. खरं तर हिंदी चित्रपटाच्या पटकथा लेखनात वसंत साठे, के. ए. अब्बास, राम केळकर, ग. रा. कामत, मधुसूधन कालेलकर, सचिन भौमिक, के. के. शुक्ला, के. बी. पाठक, कादर खान ही एकेकाळची नावे बरीच मोठी! चित्रपट माध्यम व व्यवसाय यांची उत्तम जाण असलेली. असो!!

"आखरी दाव" नावाचाही एक चित्रपट होता एवढीच खरं तर नोंद! असे अनेक चित्रपट पडद्यावर येताच ते उतरण्याची घाई करतात. पण जेव्हा तो चित्रपट यशाची टक्केवारी अतिशय भारी आहे अशा सलिम जावेद यांच्या पटकथेवरील असेल तर....????

## लेख क्र : ४२

## "कुछ कुछ होता है" @२५
## 'प्रेम त्रिकोणाची गोष्ट' थेट 'अंदाज' पासूनची!




....याची पेरणी सुरजकुमार बडजात्या दिग्दर्शित राजश्री प्रॉडक्शनच्या "हम आपके है कौन"ने झाली! ('एचएएचके' चित्रपटाचा हा 'शॉर्ट-फॉर्म'! नव्वदच्या दशकाचे देणं!) मला आठवते १९९५ चा ऑगस्ट महिन्यात "हम आपके...."च्या आगमनाचे वातावरण निर्माण होत होतं! आम्हा चित्रपट 'समीक्षकांना' वेगळा 'शो' आयोजित करण्यापेक्षा 'राजश्री प्रॉडक्शन'च्या वतीने 'लिबर्टी'मधील

पहिल्या दिवसाच्या सेकंड शोचं तिकीट दिलं होतं! खरं तर संपूर्ण मुंबईमध्ये फक्त आणि फक्त 'लिबर्टी'तच हा चित्रपट प्रदर्शित होत होता. थिएटरवर पोहोचताच दोन गोष्टींनी माझं लक्ष वेधून घेतलं! एक म्हणजे थिएटर डेकोरेशन! हा फंडा काही तसा आपल्याकडचा नवीन प्रकार नाही. ती पूर्वापार चालत आलेली पब्लिकला हवीहवीशी अशी संस्कृती, परंतु नंतर-नंतर न कुठेतरी विशेषतः १९८२ साली देशात व्हिडिओ आल्यानंतर ज्या पद्धतीने चित्रपटगृहावरच्या गर्दीला ओहोटी लागली आणि त्या तडाख्यामध्ये 'लिबर्टी' सापडलं आणि त्यानंतर लिबर्टीला काही नवे जुने इंग्रजी चित्रपट नि इतर 'वाय झेड' कल्चरचे म्हणतो तसे चित्रपट प्रदर्शित झाल्याने लिबर्टीच्या मूळ कल्चरला, इमेजला धक्का लागला! हम आपके .... रिलीज होत असताना मात्र ते अतिशय चांगल्या पद्धतीने सुशोभित करुन एक चांगली सकारात्मक वातावरण निर्मिती केलेली! कौटुंबिक सिनेमासाठी पूरक

असा तो सगळा माहौल जाणवला आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्याचे तिकीट दर आश्चर्य वाटावे असे चढे होते. मलाही पूर्वपार म्हणजे 'स्टॉलचा पब्लिक' म्हणून पिक्चर 'एन्जॉय' करायला थिएटरवर गेलो की एक  सवय..! अॅडव्हान्स बुकिंगला त्या चित्रपटासाठी रिस्पॉन्स किती आहे बघूया! त्याचा मला व्यक्तिशः फायदा तो काही नाही. पण त्या काळातील पिक्चरची क्रेझ काही वेगळीच! लिबर्टीला बघतो तर 'हम आपके..' यासाठी सोमवार ते शुक्रवार पंचाहत्तर  रुपये वगैरे तिकीट दर! शनिवार रविवार तर शंभर रुपये वगैरे! असे फार चढे दर असले तरी पिक्चर हिट होताच तेही परवडतात..!

१९९५ च्या दिवाळीत यशराज फिल्मचा आदित्य चोप्रा दिग्दर्शित "दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे"  प्रदर्शित झाला ('डीडीएलजे' असं तेव्हाच्या यंगस्टर्सच्या भाषेत) आणि त्याने "हम आपके..." ने निर्माण केलेल्या वातावरणामध्ये भर घातली! आपल्या देशामध्ये नव्वदच्या दशकाच्या सुरुवातीला

जागतिकीकरण खुली अर्थव्यवस्था यांचे वारे आले आणि वातावरणामध्ये बदल होत होता. 'कॉर्पोरेट संस्कृती' रुजत होती. शहरांमध्ये नवश्रीमंत आणि उच्चभ्रू वर्गाची वाढ होती. चलती होती. आणि "महागडे ते चांगलं" असा कुठेतरी एक सामाजिक फील येत होता त्यालाच 'डीडीएलजे'ने एक सपोर्ट सिस्टीम निर्माण केली! मग आला १९९७ च्या दिवाळीमध्ये यशराज फिल्मचा यश चोप्रा दिग्दर्शित "दिल तो पागल है" अर्थात 'डीटीपीएच'! हाही सिनेमा नवश्रीमंत आणि उच्चभ्रू वर्गाच्या 'रिस्पॉन्स'वर हिट! फ्लॅशबॅकमध्ये डोकावलं, निरीक्षण केलं तर 'दिसतं' आपल्या देशात सिनेमा मध्यम आणि कनिष्ठ मध्यमवर्गाने, स्वप्नाळू, आशावादी, मेहनती, कष्टकरी, काहीश्या भाबड्या वर्गाने वाढवला...! तोच सिनेमा आता महागड्या तिकीट दराच्या रसिकांकडे वळत होता. म्हटलं ना, या सगळ्याची सुरुवात वा पेरणी झाली होती ती "हम आपके है कौन" ने! आता सिनेमा हा गरिबांचा "सपनो

का सौदागर" न राहता श्रीमंतांची ती चैन, फॅशन होऊ लागला होता आणि त्यातच दिवाळीला रिलीज होणारे चित्रपट असा आणखीन एक 'फंडा' योगायोगाने तयार झाला आणि त्याच्यातील एक हुकमी स्टार शाहरुख खान..! (एसआरके) आणि दिवाळी रिलीज हाही एक ट्रेण्ड! त्यात आता १९९८ च्या दिवाळीमध्ये "कुछ कुछ होता है" (केकेएचएच) हा 'धर्मा प्रोडक्शन'चा यश जोहर दिग्दर्शित चित्रपट आणि त्याचेही मेन थिएटर होतं ते 'लिबर्टीच'!एव्हाना लिबर्टी हे अशा चकाचक आणि श्रीमंत सिनेमासाठीच एक महत्त्वाचा स्पॉट ठरू पाहत होती!

आम्हा समीक्षकांना 'केकेएचएच'ची लिबर्टी चीच पहिल्या दिवशीची तिकीट दिली! म्हणजे प्रेक्षकांबरोबर सिनेमा पाहताना तुम्हाला काहीतरी एक 'फील' येईल! एक वेगळं वातावरण अनुभवता येईल आणि चित्रपटाला रसिकांचा कसा 'रिस्पॉन्स' मिळेल याचा सुद्धा अनुभव येईल

**असा त्यामागचा एक हेतू असे! पण लिबर्टीचा प्रेक्षक चार चाकी गाडीतून येणारा असा! ज्याला थिएटरमधला समोसा, पॉप-कॉर्न, आईस्क्रीम सहजी परवडतो! काहीजण त्या खाण्यात जास्त रस घेतात! असो ते जाऊ देत! 'केकेएचएच' देखील विदेशामध्येच घडतो! लव ट्रँगल! एक प्रियकर दोन मैत्रिणी असा फॉर्म्युला! याचा तो टोन मात्र इमोशनपेक्षा श्रीमंती थाटमाटाचा जास्त जाणवला! श्रीमंताना दु:ख नसते असे नाही! त्यातही ते मेकअप आणि मुखवटा सांभाळतात म्हणून ते दिसत नाही! आपल्यापर्यंत पोहचत नाही! 'करण जोहर'चा हा दिग्दर्शनातील पहिला चित्रपट! एक कार्पोरेट युगाचा, अतिशय प्रोफेशनल व फोकस्ड दिग्दर्शक जन्माला आला. (त्याचीही पंचवीशी झाली हो!) करण जोहर 'डीडीएलजे'मध्ये राज म्हणजे शाहरुखच्या मित्राची भूमिका साकारली होती त्याच वेळेला तो आदित्य चोप्राकडे सहाय्यक दिग्दर्शक म्हणूनही भूमिका वठवत होता, दिग्दर्शन शिकत**

होता. निर्माते यश जोहर यांचा हा मुलगा! यश जोहर फार पूर्वी 'नवकेतन फिल्म'मध्ये प्रोडक्शन कंट्रोलर होते! 'गाईड', 'ज्वेल थीफ' पुन्हा पुन्हा पाहताना यश जोहर यांना 'पडदाभर एकच नाव' असे स्थान दिल्याचं दिसेल! यश जोहर कालांतराने चित्रपट निर्माते झाले! त्यांनी स्वत:चं 'धर्मा प्रॉडक्शन्स' स्थापन केलं! आणि राज खोसला दिग्दर्शित "दोस्ताना"ला यश मिळाल्या नंतर त्यांची एक यशस्वी वाटचाल सुरु झाली! त्यानंतर महेश भट्ट दिग्दर्शित 'गुमराह', 'ड्युप्लिकेट' इत्यादी चित्रपटाची निर्मिती केली! आता खुद्द त्यांचा मुलगा 'करण जोहर'! हा नव्या पिढीचा नवा दिग्दर्शक! ही पिढी ही एकीकडे चांगले पैसे मिळवण्याबाबत फोकस, काहीजण विदेशी शिक्षण, मग नोकरी आणि जमलचं तर स्थायिक अशा विचाराची, दुसरीकडे वीकेंड ट्रीप, चंगळवादी, एव्हाना एम. टीव्ही कल्चर रुळलं होते! मॉल मल्टीप्लेक्स युग येऊ घातलं होतं! या दशकातील युवा

पिढीला चित्रपट चकाचक चित्रपट आवडत होते. त्याच शैलीतला "कुछ कुछ होता है"! १६ ऑक्टोबर १९९८ रोजी मुंबईमध्ये लिबर्टी आणि इतर काही चित्रपटगृहात प्रदर्शित झाला. त्याला पंचवीस वर्ष पूर्ण होत आहेत! पंचवीस वर्षानंतर आजही करण जोहर, शाहरुख खान, काजोल आणि राणी मुखर्जी हे त्याच उत्साहात कार्यरत आहेत. फोकसमध्ये आहेत!

राहुल शर्मा (शाहरुख खान) आणि अंजली (काजोल) हे एकाच कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतात आणि राहुल 'फ्लर्ट' करण्यात किंवा तरुणींवर इम्प्रेशन मारण्यात रस घेणारा! त्याच कॉलेजमध्ये टीना मल्होत्रा (राणी मुखर्जी) शिकण्यासाठी येथे आणि त्याच्यातून 'लव ट्रँगल' आकाराला येतो. म्हणजे अंजलीचे राहुलवर प्रेम आहे परंतु राहुलला त्याची कल्पना नसते! राहुल तिला आपली मैत्रीण समजत असतो तर राहुल आणि टीना यांचे मात्र प्रेम जुळतं! सूर

जुळतात आणि एक नवं नातं निर्माण होते आणि मग अशाच नाट्यातून निर्माण होणारा जो काही पेच आहे तो चटपटीत संवाद, विनोद, गीत, संगीत, नृत्य याची चकाचक मेजवानी म्हणजे "कुछ कुछ होता है!" चित्रपटात सलमान खान अमर मेहराच्या भूमिकेत आहे. फरिदा जलाल, अनुपम खेर, अर्चना पुरणसिंग, रिमा लागू, हिमानी शिवपुरी, जॉनी लिव्हर, फरजाद दस्तूर, पाहुणी कलाकार म्हणून नीलम इत्यादी कलाकार आहेत. टीना मल्होत्राच्या व्यक्तीरेखेसाठी ट्विंकल खन्ना नक्की झाली होती. अचानक तिने माघार घेतल्याने रानी मुखर्जीला मोठीच संधी मिळाली. चित्रपटाची मोठी जमेची बाजू होती गीत संगीत!

समीरच्या गीताला जतिन-ललितचे संगीत. ही जोडी नव्वदच्या दशकातील एक आघाडीचे संगीतकार म्हणून तरुण पिढीत लोकप्रिय! व्हिडिओ एव्हाना एस्टॅब्लिश झाला होता, चॅनलचं जग रुजले होते, इलेक्ट्रॉनिक वस्तूचा प्रभाव

वाढत होता आणि अशा वेळेला 'कुछ कुछ होता है' ची गाणी ही रसिकांसमोर आली आणि त्याची गाणी हिट व्हायला अजिबात वेळ लागला नाही! 'क्या करु हाये..' (उदित नारायण, अलका याज्ञिक), 'कोई मिल गया..' (उदित नारायण, अलका याज्ञिक व कविता कृष्णमूर्ती), 'साजनजी घर आये..' (कुमार सानू, अलका याज्ञिक, कविता कृष्णमूर्ती), 'ये लडका है दीवाना..' (उदित नारायण, अलका याज्ञिक)), 'तुझे याद ना आये..' (उदित नारायण व अलका याज्ञिक), 'लडकी बडी अंजानी है..' (कुमार सानू व अलका याज्ञिक)! एकापेक्षा एक लोकप्रिय गाणी आणि ज्या चित्रपटाची गाणी लोकप्रिय त्या चित्रपटाला रिपीट व्हॅल्यू निश्चित आणि आता तर शाहरुख खान "सुपरस्टार" होता! त्याचे युग सुरु झालेले! त्याचा स्वतःचा एक ऑडियन्स तयार झालेला आणि शाहरुख खानच्या रोमँटिक सिग्नेचर पोझवर तरुणाई विलक्षण फिदा! आपली ही स्टाईल त्याने अनेक चित्रपटांमध्ये अतिशय

मनसोक्तपणे वापरली (त्यावर त्याचीच मालकी असल्यावर काय हो!) आता कार्पोरेट युगात आपण आलो होतो. 'मार्केटिंग फंडा' फार महत्वाचा होता! 'एसआरके' त्यात एक्स्पर्ट! एव्हाना जग बदलत होतं. भारताबरोबरच विदेशातही मोठ्या प्रमाणावर चित्रपट प्रदर्शित होत होते! त्याची वाढ 'हम आपके...'ने झाली आणि 'दिलवाले दुल्हनियाने' त्याला एक मोठा चांगला 'टेक-ऑफ' दिला. शाहरुख खानवर जगभरातील फिल्म मीडिया फोकस टाकत होता!

'प्रेम त्रिकोणाचा फॉर्म्युला' हिंदी सिनेमाला नवीन नाही. मेहबूब खान दिग्दर्शित 'अंदाज' (१९४९) त्यात मास्टर पीस राज कपूर, नर्गिस आणि दिलीप कुमार यांच्या तिघांच्या जबरदस्त अभिनयासाठी 'अंदाज' कायमच ओळखला जातो! दिलीप कुमारचा 'राजन' खलप्रवृत्ती ठसा असलेला! नौशादच्या संगीतामधील आजही म्हणजे जवळपास

**'पंचाहत्तर वर्षे' होत आली तरी हिट! ('यु-ट्युब'वर तो उपलब्ध आहे. आजच्या पिढीने त्याचा अवश्य आस्वाद घ्यावा!) 'अभिनय कसा करावा?' यासाठी हा चित्रपट मार्गदर्शक!!**




**राज कपूर दिग्दर्शित आणि आर. के. फिल्मचा पहिला रंगीत चित्रपट "संगम" (१९६४) 'लव्ह-ट्रँगल'च!. सुंदर (राज कपूर), राधा ( वैजयंतीमाला) आणि गोपाल (राजेंद्र कुमार) या तीन प्रमुख व्यक्तीरेखांभोवतीचा चार तासांचा आणि देशातील पहिला दोन मध्यंतर असलेला असा हा चित्रपट! सुंदर आणि गोपाल यांची मैत्री आणि राधा प्रेमाचा तिसरा कोन. पटकथेत अनेक चढउतार! समज गैरसमज! गोपालचे राधाशी लग्न होते आणि गोपाल यांच्या मैत्रीची कसोटी लागते!**

गोपाल व राधाचंही प्रेम होतेच की. प्रेमामधला संघर्ष, त्यातलं नाट्य, त्यात बहारदार गीत, संगीत, नृत्य आणि युरोपीय देशातील चित्रीकरण! पिक्चर सुपर हिट!
(हा चित्रपट.. 'साने गुरूजीं'च्या 'तीन मुले' या कादंबरीवर आधारित असल्याचे म्हणतात!)




रमेश सिप्पी दिग्दर्शित "सागर" (१९८५)चा 'लव-ट्रँगल'ही बहुचर्चित! ऋषी कपूर डिंपल कापडिया आणि कमल हसन या तीन प्रमुख व्यक्तीरेखा! समुद्रकिनाराच्या कोळीवाड्यातील




राजा (कमल हसन) आणि मोना डिसिल्वा (डिंपल) हे लहानपणापासूनचे चांगले मित्र तर विदेशातून आलेला रवि (ऋषी कपूर) याचं प्रशस्त घर या कोळीवाड्याच्या नजीक!. तो एका भल्या पहाटे समुद्रकिनारी मोनाला पोहताना पाहतो आणि तो

तिच्या प्रेमात पडतो आणि त्यांची प्रेम कथा सुरू

होते..! इकडे रवि आणि राजा यांची मैत्री घट्ट होत जाते! एक दिवशी राजाच्या लक्षात येते की.. रवि व मोना एकमेकांच्या प्रेमात आहेत. पण आपल्या लहानपणापासूनच्या मैत्रिणाला आपलं प्रेम कसे लक्षात आले नाही? याचेही राहुल देव बर्मनचे

संगीत आजही लोकप्रिय! लॉरेन्स डिसोझा दिग्दर्शित आणि सुधाकर बोकाडे निर्मित "साजन"चा (१९९१) प्रेम त्रिकोणही असाच बहुचर्चित! संजय दत्त, माधुरी दीक्षित आणि सलमान खान या तीन प्रमुख व्यक्तिरेखांभोवतीचा प्रेम त्रिकोण. अमन (संजय दत्त) हा अपंग आहे आणि त्याला आकाश वर्माच्या (सलमान खान) कुटुंबात विशेष स्थान आहे! अमन सागर नावाने लोकप्रिय कवी आहे. त्याच्या कवितांवर फिदा असलेली पूजा (माधुरी दीक्षित) सागरला लिहिलेले पत्र आकाशला मिळते आणि तोच पूजाला 'सागर' म्हणून भेटतो. त्यांच्यात प्रेम होते. पण पूजाला वस्तुस्थिती समजल्यावर नाट्य निर्माण होते! याचेही नदीम श्रवण यांचे संगीत आजही लोकप्रिय! प्रेमपटाला श्रवणीय संगीताचा बुस्टर डोस हवाच!

हिंदी सिनेमातील 'लव्ह-ट्रॅंगल'च्या गोष्टी अनेक! राज खोसला दिग्दर्शित 'प्रेम कहानी', धर्मेश दर्शन दिग्दर्शित 'धडकन', सुनील हिंगोरानी दिग्दर्शित 'राम अवतार' वगैरे

वगैरे! गाजलेल्या 'लव ट्रँगल'मध्ये नाव घ्यायची तर मेहबूब खानचा 'अंदाज', राज कपूरचा 'संगम', रमेश सिप्पीचा 'सागर', लॉरेन डिसोजाचा 'साजन' आणि करण जोहरचा 'कुछ कुछ होता है' हे टॉप फाईव्ह 'लव ट्रँगल'! आणि म्हणूनच तर 'कुछ कुछ होता है'ला 'पंचवीस वर्षे' झाल्यानिमित्ताने त्याच्यावर एक विशेष फोकस टाकलाच पाहिजे! या यशाने शाहरुख खान आणि करण जोहर जोडी त्यानंतर जमली आणि त्यांनी 'कभी खुशी कभी ग़म'! (२००१), 'कभी अलविदा ना कहना' (२००६), 'माय नेम इज खान' (२०१०) , 'ऐ दिल है मुश्किल' (२०१६) अशा आणखीन काही चित्रपटांमध्ये चित्रपटासाठी ही 'दिग्दर्शक' आणि 'सुपरस्टार' अशी जोडी एकत्र आली! सुस्वभावी शाहरुख खानने नेहमीच चित्रपटाची निवड करताना त्याचा दिग्दर्शक, त्या दिग्दर्शकाचे व्यावसायिक स्थान याला फारच महत्त्व दिले! आणि ते करण जोहरला नक्कीच आहे! पटो न पटो

करण जोहरने त्यानंतर खरोखरच मागे वळून पाहिलेलं नाहीये! मग ते चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन इतकंच नव्हे तर छोट्या पडद्यावरील 'कॉफी विथ करण शो', 'इव्हेन्टस निवेदन' आणि इतर बरंच काही करत करत त्याने स्वतःचा 'एक्सप्लोजर' वाढवला! स्वतःचा एक 'ऑडियन्स' तयार केला! इमेज तयार केली..! या सगळ्याची पाळमुळं ही पंचवीस वर्षांपूर्वी 'कुछ कुछ होता है'मध्ये रुजली! सिनेमा रिलीज झाला आणि पहिल्या 'शो'पासूनच चित्रपटाला रसिकांचा अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला! त्यात जास्त भरणा मात्र नव-श्रीमंत आणि उच्चभ्रू वर्गाचा होता! समाजामध्ये बदल होत होता. हिंदी सिनेमा बदलत होता आणि त्याच टप्प्यावरचा एक महत्त्वाचा रोमॅन्टीक चित्रपट म्हणजे "कुछ कुछ होता है" अर्थात, केकेएचएच!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर)

♥

## लेख क्र : ४३

## 'नया दिन नयी रात' @५२ वर्षे..
## संजीवकुमारची 'नऊ रुपे' केवढी तरी कौतुकाची!




माणसाच्या आयुष्यातील 'नवरस' हे आपणासही माहित आहेत! आश्चर्य अथवा अद्‌भूत, भयानक, करुणा, क्रोध, रौद्र, बिभत्स, शृंगार, वीरता आणि आनंद वा हास्य! त्या त्या प्रसंगानुरुप ते भाव व्यक्त होत असतात! (मित्रांनो! इथें 'शारदीय नवरात्री' निमित्ये विविध 'कॅसेट कंपन्या'.. 'नवरात्रीची नवरूपे' अशा काही 'कॅसेट' काढतात त्याचा इथे काहीही संबंध नाही बरं!) मात्र याच सर्व भाव भावनाना

एकाद्या कथा व पटकथेत गुंफले तर? चित्रपट कशावरही असू शकतो!

ही मूळ कल्पना दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटातील! तेथे १९६६ साली "नवरात्री' या नावाने तेलगू व तमिळ अशा दोन भाषेतील चित्रपट प्रदर्शित झाले होते! आणि त्यावरुनच हिंदीत कदाचित उत्स्फूर्ततेने दिग्दर्शक ए. भीमसिंग यांनी "नया दिन नयी रात" (मुंबईत प्रदर्शित १० मे १९७४) पडद्यावर आणला असावा! त्याला बावन्न वर्षं पूर्ण झाली देखील! एव्हाना रसिकांची एक पिढी 'फ्लॅशबॅक'मध्ये रमलीही असेल. चित्रपट व क्रिकेट अनेक भारतीयांना हमखास जुन्या आठवणीत नेतेच!

त्या काळात नवीन चित्रपटाचे पोस्टर ही त्याची पहिली ओळख असे! ते पाहून चित्रपट रसिकांचे विचारचक्र सुरु होई! या चित्रपटात काय बरे पाह्यला मिळेल. याची गोष्ट काय असेल? सामाजिक असेल की सस्पेन्स? की आणखीन

एखादी.? 'नया दिन नयी रात'च्या पोस्टरवरील संजीवकुमारची एक दोन नव्हे तर चक्क नऊ रुपे! (विविध मुखवटे!) पाहून माझ्यासारख्या अनेक चित्रपट रसिकांच्या मनात प्रश्न आला, एकाद्या हीरोच्या डबल रोलच्या चित्रपटांची पोस्टर पाहिली (चाणक्य दिग्दर्शित "राम और श्याम' मधील दिलीपकुमार! मनमोहन देसाई दिग्दर्शित "सच्चा झूठा" वगैरे!) अगदी नायकाच्या तिहेरी भूमिकेचे पोस्टर पाहिले (असित सेन दिग्दर्शित "बैराग" मधील दिलीपकुमार!) पण नऊ रुपातील संजीव कुमार आणि जोडीला जया भादुरी? काय असेल बरं या चित्रपटात?

रस्त्यावरची पोस्टर्स, होर्डींग्स, रेडिओ 'विविध भारती'वर या चित्रपटाचा 'रेडिओ कार्यक्रम' यातून चित्रपट जवळ येत होता आणि आता 'नऊ भूमिकेत संजीवकुमार!' हे चित्र स्पष्ट झाल्याने मुद्रित माध्यमातील बातम्यात वगैरे हा चित्रपट चर्चेत आणि म्हणूनच तर विशेष कुतूहल! विजय

आनंद दिग्दर्शित "जॉनी मेरा नाम" (१९७०) आय. एस. जोहरची धमाल तिहेरी भूमिका! रामन्ना दिग्दर्शित 'हमजोली' (१९७०) मधील मेहमूदने पृथ्वीराज कपूर, राज कपूर व रणधीर कपूर या तीन पिढ्यांची धमाल नक्कल करत रसिकांचे केलेले मनोरंजन! ही वेगळीच तिहेरी भूमिका असे काही संदर्भ समोर येत गेले! पण चक्क नऊ? एकाच कलावंताच्या चक्क नऊ भूमिका?

मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर 'शालिमार'ला थिएटर डेकोरेशनवर ही नऊ रुपे लक्ष वेधून घेणारी होती. (त्या काळात असे थिएटर डेकोरेशन पाहत पाहत एक प्रकारचे थिएटर पर्यटन हा देखील आनंदाचा भाग असे! अशाच लहान लहान गोष्टीतील आनंदाने आपल्या देशात अगदी खालच्या माणसांपर्यंत चित्रपट नेला आणि रुजवला. त्यांची आठवण हवीच!)

'नया दिन...' ची मूळ गोष्ट ए. पी. नागराजन यांची, त्यावर ए. भीमसिंग ('आदमी', 'लोफर', 'साधू और शैतान', 'गोपी' फेम) यांनी पटकथेत माणसाच्या आयुष्यातील नवरस मांडलेत! नायिका 'सुषमा' (जया बच्चन) हिच्या आयुष्यातील एकेका अडथळ्यात विविध रुपात तिला एकेक जण मदत करतो. त्या विविध व्यक्तीरेखा म्हणजेच संजीवकुमारची 'नऊ रुपे'! त्यात वेडा, डॉक्टर, रंगभूमीवरील कलाकार, कुष्ठरोगी, आपल्या भावाच्या खुनाचा बदला घेणारा डाकू अशी ती विविध रुपे आहेत! यांची नावे आनंद, स्वामी रहस्यानंद, सारंग, सेठ धनराज, शेरसिंग फुलकुमार वगैरे. संजीवकुमार कायमच अष्टपैलू व मेहनती कलाकार म्हणून ओळखला गेला!  त्याला हा चित्रपट म्हणजे आपल्यातील गुणवत्ता दाखवायची खूपच मोठी संधीच मिळाली! खरं तर सुरुवातीस दिलीपकुमारला हा चित्रपट ऑफर झाला होता. दिलीपकुमारने एस. एच. रवैल दिग्दर्शित "संघर्ष" (१९६७)

मध्ये संजीव कुमारसोबत भूमिका साकारताना त्याच्या गुणवत्तेचा अनुभव घेतला होता, आणि त्याच कामाची जणू शाबासकी म्हणून दिलीपकुमारने 'नया दिन नयी रात' साठी संजीवकुमारचे नाव सुचवले. आणि या चित्रपटाच्या सुरुवातीस आपल्या नेहमीच्या शैलीत निवेदनही दिले. (यश चोप्रा दिग्दर्शित "त्रिशूल", नासिर हुसेन दिग्दर्शित "जबरदस्त" हेही चित्रपट सुरुवातीस दिलीप कुमारलाच ऑफर झाले होते. त्याच्या नकारानंतर संजीवकुमारला त्या व्यक्तीरेखा साकारायला मिळाल्या. एकाची भूमिका दुसऱ्याला, कधी तिसऱ्यालाच हे होतच असते. ती एक वेगळी रंगत.) 'नया दिन नयी रात' दिलीपकुमारने साकारला असता तर नायिका कोण? बहुतेक सायरा बानूच असती. नायिकेच्या अडचणीच्या प्रवासात विविध ठिकाणी नायक नवीन रुपात मदत करतो हे या थीममध्ये ही जोडी फिट्ट बसली असती!

संजीवकुमार व जया भादुरी (ती नंतर बच्चन झाली हो!) यांनी भिन्न नात्यांतील व्यक्तीरेखा साकारलीय. गुलजार दिग्दर्शित 'परिचय' मध्ये वृध्द पिता व त्यांची मुलगी, गुलजार दिग्दर्शित 'कोशिश' मध्ये पती व पत्नी, रघुनाथ झालानी दिग्दर्शित 'अनामिका' मध्ये प्रियकर व प्रेयसी (तरी तिची चार रुपे), रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले'मध्ये वृध्द सासरे व सून, ईस्माईल मेमन दिग्दर्शित 'नौकर" मध्ये नायक व नायिका, यश चोप्रा दिग्दर्शित "सिलसिला" मध्ये संजीवकुमार डॉक्टर असून, रेखाला त्याच्याशी लग्न करावे लागते! याचं कारण, पतीचे (शशी कपूर) विमान अपघातात निधन झाल्यानंतर त्याच्या पत्नीला (जया बच्चन) आपल्या दीरासोबत (अमिताभ बच्चन) लग्न करावे लागते त्यातून हा दीर व त्याची प्रेयसी (रेखा) दुखावतात आणि दुरावतात. संजीवकुमार व जया बच्चन यांचा एकत्र काम करण्याचा रुपेरी पडद्यावरील प्रवास असा विविध नातेसंबंधाचा. 'नया दिन नयी रात' मध्ये

अखेरीस ते विवाहबद्ध होतात तेव्हा संजीवकुमारची सहा रुपे या लग्नात हजर असतात. या चित्रपटात फरिदा जलाल, सुंदर, ललिता पवार, टूनटून, मनोरमा, श्यामा, डेव्हिड, नाझनीन व ओम प्रकाश यांच्याही भूमिका! चित्रपटाचे छायाचित्रणकार जी. विठ्ठल राव, तर आनंद बक्षी यांच्या गीतांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांचे संगीत!

नऊ या आकड्यास खूप महत्व आहे! नवरात्रीत देवीची नऊ रुपे तर आईच्या पोटात मुलं मोठे होण्यास नऊ महिने लागतात! आणि त्यात 'नया दिन नयी रात' ची ही बहुचर्चित नऊ रुपे! या कॉमेडीच्या अंगाने खुललेल्या 'नया दिन नयी रात' ला सर्वसाधारण स्वरुपाचे यश लाभले. त्यापेक्षा जास्त रंजक चर्चा संजीवकुमारच्या नऊ भिन्न मुखवटा आणि व्यक्तीरेखांची झाली.....तेच तर महत्वाचे असते! संजीवकुमार कधी नायक तर कधी सहनायक रंगवत रंगवत वाटचाल करत होता. महेश भट्ट दिग्दर्शित 'विश्वासघात'

मधील पिता व पुत्र या दुहेरी भूमिकेतील टेलिफोनवरील संभाषणाचे दृश्य त्याच्या अभिनय वाटचालीतील सर्वात बहुचर्चित व सर्वोत्कृष्टही! संजीवकुमार स्टार नव्हे तर ॲक्टर. वयाची पर्वा न करता अनेक प्रकारच्या व्यक्तीरेखा साकारल्यात....मॅटीनी शो, मग व्हिडिओ, त्यानंतर मनोरंजन उपग्रह वाहिनी, आता यू ट्यूबवर 'नया दिन नयी रात' चा प्रवास सुरु आहेच. पण एकदा 'एन्जॉय' करु शकता! (मी लिंक दिलीय.) एकाच चित्रपटात एक नायक नऊ भूमिकेत असे मोहन सैगल दिग्दर्शित 'वो मै नहीं" (१९७४) मध्येही होता. (आचार्य अत्रे लिखित 'तो मी
नव्हेच' या बहुचर्चित नाटकाचे हे माध्यमांतर... अर्थात न जमलेले!) यात नवीन निश्चल अशीच नऊ रुपे घेतो. पण त्यात रंगत नव्हती. तेथे संजीव कुमारच हवा होता, हेच खरं! उगाच नाही हो 'नया दिन नयी रात' मधील संजीवकुमारची आजही उगाच चर्चा करीत नाहीत.... बावन्न वर्षे पूर्ण होत असताना

**संजीवकुमारची नऊ रुपे कौतुकास प्राप्त होताहेत हे उल्लेखनीय! नाही का? (दिलेल्या सर्व 'लिंक्स' वर 'क्लिक' करून एन्जॉय करा.)**

**© दिलीप ठाकूर**
**(राम प्रहर-झूम प्रहर)**

♥

## लेख क्र. ४४

## 'ताल से ताल मिला'....
## २५ वर्षांनंतरही 'दिल ये बेचैन वे..'!




गीत संगीत व नृत्य आपल्या देशातील चित्रपट संस्कृतीची जान! अथवा आत्मा आणि आपल्या देशातील जवळपास सर्वच जाती धर्म पंथातील अनेक सणांतील एक महत्वाचा घटक! एक संस्कृतीच म्हणा ना!! लग्नातही नाचकाम आणि काही समाजात तर अंत्ययात्रेतही वादन!

गीत, संगीत व नृत्याने भरलेल्या नि भारलेल्या समाजाला अनेक चित्रपट त्यांतील गाण्यांमुळे पटकन

**डोळ्यासमोर येतातच! त्यातील काही चित्रपटातील सर्वच्या सर्व गाणी सर्वकालीन लोकप्रिय! (असं आजच्या मुव्हीजबद्दल आपण बोलू शकत नाही हो! पडद्यावरचा चित्रपट संपतो आणि अनेकदा तरी त्यातील गाणी विसरली जातात! असो!!)**

**मुक्ता आर्ट्स निर्मित व सुभाष घई दिग्दर्शित "ताल" (मुंबईत रिलीज १३ ऑगस्ट १९९९) मधील अशीच सर्वच्या सर्व गाणी.. आजही चित्रपटाला पंचवीस वर्ष होवूनही लोकप्रिय! संगीतकार ए. आर. रहमानचे संगीत असलेले मणिरत्नम दिग्दर्शित "रोजा" (१९९२) सारखे मूळ तमिळ भाषेतील चित्रपट हिंदीत डब झाल्याने आपल्यापर्यंत पोहचले. (मित्रांनो.. इथे मी एक पॉझ घेतोय! "ए. आर. रहेमान" संगीत रसिकांच्या सामोरा कसा आला, ते कळेल!)**

**सिनेरसिक मित्रांनो! काहिसं विस्ताराने सांगायचं तर.. कित्येक वर्षे आपल्या या "चित्रपटसृष्टीत" केवळ एक "रसिक" तसेच "फिरस्ता" म्हणून "मार्गक्रमण" करताना**

अनेक "वेगळ्या" गोष्टी सामोऱ्या येतात! "शूटिंग-फ्लोअर" वरील गोष्टी तर "भन्नाट" असतातच! "संगीत क्षेत्रातील" घडामोडी तर अनेकदा थक्क करणाऱ्या असतात! निमित्त होते.."व्हीनस कॅसेट कंपनी" तर्फे दिल्लीमध्ये "पॅनासोनिक" पुरस्कृत एका जबरदस्त "लाईव्ह शो"चे! आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने त्या कंपनीचे सर्व अधिकारी तिथे आवर्जून कार्यरत होते.. त्या त्यांच्या मुक्कामात.. एके दिवशी "कॅसेट वितरकांकडे" अचानक "ट्रक" भरून.. "एका अमुक आगामी नव्या चित्रपटाच्या" कॅसेट्स दाखल झाल्या होत्या! सगळे थक्क! याबाबत केवळ "कुतूहल" म्हणून पाहता.. त्या "बॉम्बे" या आगामी चित्रपटाच्या गाण्यांच्या "कॅसेट्स" होत्या! चित्रपट मणि रत्नम दिग्दर्शित "बॉम्बे" (१९९५) देखील मूळ तमिळ भाषेतील चित्रपट! लक्षात घ्या! ते १९९४ हे साल होते! (त्यानंतर हा "सिनेमा" भले १९९५ मध्ये नंतर प्रदर्शित झाला!

"परफेक्ट प्लॅनिंग" म्हणतात ते हेच!) योगायोगाने या काळात.. "अंजली अंजली पुष्पांजली.." (ड्युएट) हे मूळ "तमिळ" चित्रपटाचे गाणे "कॅसेट" रुपात हिंदी भाषेत आले...! मग काय! सर्व "साऊथ-संगीतकार" त्यांच्या त्यांच्या "पोतडीतून आणि फडताळातून" त्यांच्या "मस्त, जबरदस्त, किंवा अक्षरश: मृत अवस्थेतील" अनेक रचना हिंदीत डब करून पेश करू लागले. त्यात केवळ "पैका" कमवायचा हेतू होता म्हणाना! "धरपकड" गीतकारांना, गायकांना अनुबंधित करत "छापो अने आपो!..या पद्धतीने चाललेलं सगळं!

मुंबईत "कॅसेट्स" सर्वत्र मिळायच्या. मात्र "साऊथ इंडियन-स्टफ" बाबत "माटुंगा पूर्व" विभागाची जणू मक्तेदारी होती, हे मात्र पहिल्यांदाच कळलं! त्या विभागात "मराठी" लोकांचं जाणं तसं अभावानेच होई. पण तिथे आता साऊथच्या जबरदस्त "ऱ्हिदम/म्युझिक"ने भारावून जात..

गाण्यांचे शौकीन आवर्जून जाऊ लागले! कुतूहल म्हणून एकदा सहजच गेलो तर काय? फिल्म इंडस्ट्रीतील गाण्यातील "ऱ्हिदम व म्युझिकचे प्रोग्रामिंग" करणारे अनेक वादक व संगीत संयोजक वगैरेंची तिथे गर्दी पाहून थक्क झालो! "विरपांडी कोथीयले.." (थिरुडा थिरुडा) या गाण्यातील शब्दांचा अर्थ न समजूनही.. सॉलिड डिमांड! खरं तर हा सिलसिला "रोजा" (मूळ तमिळ फिल्म १९९२) पासून सुरू झालेला. आणि नंतर तो व्हाया "दिल से.." (१९९८) आपल्या लेखातील "ताल" पर्यंत आला! मध्ये बरीच स्थित्यंतरे घडली. "रोजा" ची गाणी ऐकून "सुभाष घई" खूपच "इंप्रेस" झालेले! त्यांनी "ए. आर. रहेमान"शी संपर्क करून त्याला भेटायला थेट चेन्नईला गेले! "रहेमान" शोमन घई यांचे नाव ऐकून होता. परंतु त्याने कामाचा व्याप असल्याचे सांगत काही महिने (चक्क तीन वर्षे!) थांबायची नम्र विनंती केली. येस्! सुभाष घईसाहेब थांबले!

ए. आर. रहमानने हिंदी चित्रपटाला संगीत दिलेला सर्वोत्कृष्ट चित्रपट "ताल"! हा हिंदीत निर्माण होवून मग तमिळमध्ये डब करण्यात आला!

सुभाष घई हा चित्रपट संगीताचा उत्तम कान व दृष्टी असलेला दिग्दर्शक. आठवा "कर्ज", "कर्मा", "राम लखन" वगैरे त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटातील गीत संगीत व नृत्य! त्याच्या या गुणांवर काहीसा मनोजकुमारचा प्रभाव जाणवतो, माझे हे मत काहींना पटेल अथवा नाहीदेखील! 'कर्ज', 'हीरो', 'कर्मा', 'खलनायक' या चित्रपटातील गाणी 'एन्जॉय' करताना कुठे तरी मनोजकुमार शैली जाणवते...!

"ताल" हा सुभाष घई दिग्दर्शित चित्रपट असला तरी तो पहावासा/ ऐकावासा/ आठवावासा वाटतो तो ए. आर. रहमानसाठीच! एकाद्या चित्रपटाच्या दिग्दर्शकावर "संगीतकार" मात करु शकतो? याचे उत्तर "होय" असेच द्यायला हवे. (आणखीनही असे अनेक चित्रपट आहेत!)

पारंपरिक मसालेदार मनोरंजक चित्रपटात सुभाष घईची आपली एक शैली, आपले स्वतंत्र स्थान, आपलं एक व्हीजन! 'परदेस' या चित्रपटाच्या वांद्याच्या पाली हिलवरील 'आनंद रेकॉर्डिंग स्टुडिओ'तील मिक्सिंगच्या वेळेस मुलाखतीचा योग आला असता, अतिशय फोकस्ड दृष्टिकोनातून आपलं एकेक मत मांडण्याची, आपल्या फ्लॅशबॅकमध्ये जात रंगवून खुलवून एकादी गोष्ट सांगणे ही त्याची पध्दत मला आवडली. पण त्याचा "परदेस" नंतर प्रभाव ओसरला. "ताल" मध्ये सुभाष घई टच दिसला नाही. त्यानंतर त्याचा 'उतरता प्रवास' दिसतोय. इंग्लिश मिडियाने त्याला फारच लवकर राज कपूरनंतरचा 'शो मन' म्हटलं (त्या कौतुकाशी राज कपूरच्या दिग्दर्शनाचे चाहते आजही सहमत नाहीत)!

"ताल" ची जान आनंद बक्षी यांची गीते व ए. आर. रहमानचे संगीत यात आहे. सुभाष घईने "ताल" साठी ए. आर. रहमानची निवड कशी केली याचाही एक किस्सा आहे.

आपल्या "खलनायक" च्या शूटिंगसाठी बंगलोर विमानतळावरुन हॉटेलमध्ये जात असताना गाडीत "रोजा" चे लागलेले गाणे ऐकून सुभाष घईने अतिशय कुतूहल म्हणून ड्रायव्हरला विचारले, या गाण्याचा संगीतकार कोण? उत्तर ऐकताच सुभाष घईने ठरवले, आपण आपल्या एका चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी ए. आर. रहमानकडे सोपवायची...

रहमानच्या मते, "ताल" च्या संगीताने त्याला उत्तर भारतातील चित्रपट संगीत शौकीनांपर्यंत नेले (एक चित्रपट काय काय घडवत असतो, आणि त्यातील प्रत्येक जण त्याकडे भिन्न दृष्टिकोनातून पाहतो हेच यातून अधोरेखित होतेय!)

रहमान शक्यतो रात्रीच्या शांततेत आपली गाणी ध्वनिमुद्रित करतो. एकाद्या कलावंताचे हे वेगळेपण. आणि चेन्नईत (पूर्वीचे मद्रास) ते करण्यास प्राधान्य देतो. 'इश्क बिना..' (अनुराधा श्रीराम, सुजाता मोहन, ए. आर. रहमान

**आणि सोनु निगम), 'इश्क बिना इश्क बिना..' (कविता कृष्णमूर्ती व सुखविंदर सिंग), 'कहीं आग लग जाए..' (आशा भोसले, रिचा शर्मा व आदित्य नारायण), 'करिये ना..' (सुखविंदर सिंग व अलका याज्ञिक), 'क्या देख रहे हो तुम..' (मधू वैशाली व शोमा), 'नहीं सामने तू..' (रिचा शर्मा व सुखविंदर सिंग), 'रमता जोगी..' (सुखविंदर सिंग व अलका याज्ञिक), 'ताल से ताल मिला..' (सुखविंदर सिंग, अलका याज्ञिक व उदीत नारायण) ही "ताल"ची सगळीच गाणी सुपर हिट! या गाण्यांचे रुपेरी पडद्यावरील सादरीकरणही देखणे! 'रमता जोगी..' या गाण्याचे गोरेगावच्या फिल्मीस्तान स्टुडिओत शूटिंग असतानाच मुंबईतील आम्हा काही सिनेपत्रकाराना सेटवर शूटिंग रिपोर्टींगसाठी बोलावले असता काही विशेष गोष्टी दिसल्या! शामक दावरच्या नृत्य शाळेतील विद्यार्थी अनिल कपूर व ऐश्वर्या रॉयच्या सभोवार नृत्य सादर करत होते आणि त्यात एक होता, 'शाहिद कपूर'!**

('यू-ट्यूब'वर हे गाणे पाहताना तुमच्या हे नक्कीच लक्षात येईल! तोपर्यंत तो कोण आहे याला काहीच ओळख नव्हती). काही वर्षातच "तुझे मेरी कसम" (२००४) या आपल्या पहिल्या चित्रपटाच्या निमित्ताने रितेश देशमुखच्या मुलाखतीचा योग आला असता तो मला म्हणाला, "ताल"च्या फिल्मीस्तान स्टुडिओतील शेड्युलला मी सुभाष घईकडे सर्वात तळाचा सहाय्यक दिग्दर्शक होतो!

एक चित्रपट आणि त्यात किती गोष्टी! "ताल" चे कथालेखन सुभाष घईचे! पटकथालेखन सचिन भौमिक व सुभाष घईचे. संवाद जावेद सिद्दीकीचे. तर संकलनही सुभाष घईचे!

उद्योगपती जगमोहन मेहता (अमरीश पुरी) एका जागेच्या खरेदीसाठी एका गावात गेले असता त्यांचा मुलगा मानव (अक्षय खन्ना) याची नजर पावसात चिंब चिंब भिजून गीत संगीत व नृत्यात रमलेल्या 'मानसी शंकर' (ऐश्वर्या रॉय)

हिच्यावर पडते. त्याला ती आवडते....पुढे अनेक वळणे घेत घेत चित्रपट पुढे सरकतो आणि त्यात मानसीच्या आयुष्यात विक्रम कपूर (अनिल कपूर) येतो. प्रेम त्रिकोणाची थीम आपल्यासमोर येते!

ऐश्वर्या रॉयसाठी हा चित्रपट खूपच महत्वाचा. विश्व-सुंदरीचा मुकुट पटकवणारी ऐश्वर्या काय नि सुश्मिता सेन काय (आणि नंतरच्या सेलिना जेटली, लारा दत्तादेखील आल्याच!) या तर "प्लॅस्टिकच्या बाहुल्या", यांना अभिनय तो काय येणार नि समजणार असा एक तद्दन फिल्मी समज. तो मोडायचा तर तशी दिग्दर्शकांनी चांगलीच संधी द्यायला हवी.




ऐश्वर्याला ती संजय लीला भन्साली दिग्दर्शित "हम दिल दे चुके सनम" (मुंबईत रिलीज १८ जून १९९९) आणि सुभाष घई दिग्दर्शित

"ताल" या चित्रपटात मिळाली. तिने जणू कात टाकली आणि अभिनेत्री म्हणून स्वतःची ओळख मिळवली. "ताल" म्हणूनही महत्वाचा. छाया चित्रणकार कबीर लालने ऐश्वर्या रॉयचं अद्‌भुत सौंदर्य, तिची मोहकता, प्रसंगानुरुप मादकता आणि तिने साकारलेला अभिनय हे छान पडद्यावर दाखवले!

मुंबईतील आम्हा सिनेपत्रकारांसाठी स्वतंत्र खेळाचे आयोजन न करता मेन थिएटर मेट्रोत 'फर्स्ट डे फर्स्ट शो'चे बाल्कनीचे तिकीट दिले! आमच्या आजूबाजूचा रसिक प्रेक्षक मला तरी "ताल" पाहताना फार उत्साही दिसला नाही. कारण चित्रपटच यथातथाच. म्हणून तर यशाला मर्यादा पडल्या! त्यात जान होती ती, ए. आर. रहमानच्या जबरदस्त परफॉर्मन्समध्ये. पाश्चात्य मेलडी, पॉप संगीत व भारतीय लोकसंगीत यांचे फ्युजन त्याने अप्रतिम केले!

"मास्टरपीस अल्बम" म्हणून "ताल" ओळखला जातोय...ताल म्हणजे संगीत, संगीत म्हणजे ताल असे आपले

म्हणणे ए. आर. रहमानने कृतीतून दाखवून दिले. 'नही सामने तू..' हे आनंद बक्षी यांचे गाणे तसे एकदम साधेच पण रहमानने त्याचं जणू सोने केले. सत्तर व ऐंशीच्या दशकातील हिंदी चित्रपट संगीतालाच पुन्हा साकारणे रहमानला मंजूर नव्हतेच. त्याला असलेले बदलत्या काळाचे भान त्याने कृतीतून घडवले.

ए. आर. रहमानच्या हिंदी चित्रपटांच्या संगीताचा खूपच मोठा चाहतावर्ग आहे. त्यात त्याचे सर्वोत्कृष्ट पाच हिंदी चित्रपट सांगायचे तर, रामगोपाल वर्मा दिग्दर्शित "रंगीला" (१९९५), मणि रत्नम दिग्दर्शित "दिल से.." (१९९८), सुभाष घई दिग्दर्शित "ताल" (१९९९), आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित "लगान" (२००१) आणि आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित "स्वदेस" ( २००४) हे चित्रपट!

"ताल" तर ए. आर. रहमानसाठीच आठवणीत! विक्रम कपूरच्या भूमिकेसाठी गोविंदाची निवड नक्की झाल्यावर

त्यालाच साक्षात्कार झाला की या चित्रपटात अक्षय खन्ना हीरो असून आपण जर ही भूमिका साकारली तर चित्रपटसृष्टीत आरडाओरड होईल की आपण "सेकंड हिरो"ची भूमिका साकारु लागलोय आणि मग अशाच दुय्यम भूमिका आपल्या वाटेला येतील! त्याने पळ काढताच अनिल कपूर सुभाष घईच्या

मदतीला धावला. व्यावसायिकता म्हणजे काय हे

अनिल कपूरकडून शिकावे.

"ताल" च्या आठवणी या अशा अनेक! पिक्चरला पंचवीस वर्षे पूर्ण झालीदेखील तरी त्याच्या गाण्याचा गोडवा क्या कहने? 'इश्क बिना क्या जिना यारों....'!!!!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर)
♥

## लेख क्र. ४५

## 'इश्क इश्क इश्क' @५० वर्षे
## प्रेमाच्या गोष्टीत 'देव आनंद' चक्क अनुत्तीर्ण!!




देव आनंदचं पाहणं/ ऐकणे/असणे/ हसणे/ बोलणे/सांगणे/ गाणे यात "प्रेमाचा मुरंबा/ लोणचं/ पिझ्झा" असं काही भरलंय की हिंदी चित्रपटाच्या पडद्यावर प्रेम पाहताना/ ऐकताना पहावे ते फक्त आणि फक्त 'देव आनंद'ला...

'पलभर के लिए कोई हमे..' अशी विनवणी असो की 'दिल का भंवर करे पुकार..' असो! त्याने रुपेरी पडद्यावर

साकारलेले कोणतेही प्रेम-गीत असो, ते आठवताच आपण ते गुणगुणायला लागतो! ते गाणे देव आनंदच्या छोट्या छोट्या प्रेमाच्या लकबीसह डोळ्यासमोर येतेच! रसिकांच्या किमान तीन पिढ्या देव आनंदच्या 'प्रेम' शैलीवर लट्टू होत्या. त्याच्या चालण्यात प्रेम ('ये दिल ना होता बेचारा..'), त्याच्या प्रेयसीच्या छेडछाडीत 'प्रेम'! ('छोड दो आंचल जमाना क्या कहेगा...' आठवतंय ना?).

'प्रेम' ही त्याची अभिनेता म्हणून पहिली आणि कायमची ओळख! त्याशिवाय त्याने भावनिक क्षण (गाईड), समजदार पती (तेरे मेरे सपने), पिस्तूलधारी नायक (जॉनी मेरा नाम), ढिश्यूम ढिश्यूम हीरो (अमीर गरीब) असे बरेच काही केले, पण त्याचा प्रेमाचा परिपाक अतिशय उत्फूर्त! तीचं त्याच्या यशाची हेडलाईन! अनेक नायिकांसोबत त्याने पडद्यावर रोमान्स केला! त्याही देव आनंदसोबतच्या प्रेम दृश्यात "हा तर अभिनय आहे" हेच विसरल्या असतील!

पडद्यापलिकडेही त्याची रंगलेली प्रेम प्रकरणे आजही रंगवून, खुलवून सांगितली जातात! अर्थात, सुरैय्या व त्याच्या प्रेम प्रकरणाच्या गोष्टी अनेक! (त्यावरच एकादा चित्रपट काढावा असे अजूनही कोणाला का बरे वाटले नसेल? भरपूर नाट्य आहे यात!)

असा "प्रेम पुजारी"च्याच प्रगती पुस्तकातील सर्वात कमी गुण मिळाल्याने अनुत्तीर्ण झालेला चित्रपट चक्क 'प्रेमपट' असावा? दैवदुर्विलास! दुसरे काय? "इश्क इश्क इश्क" हा देव आनंदचा
सर्वाधिक अपयशी चित्रपट. पडद्यावर येतोय तोच
त्याला रसिकांनी पूर्णपणे नाकारले!

ही गोष्ट घडली, गुरुवार १४ नोव्हेंबर १९७४ रोजी! त्या दिवशी हा चित्रपट मुंबईत प्रदर्शित झाला! त्या अपयशाला चक्क पन्नास वर्षे पूर्ण झाली देखील! खुद्द देव आनंदचे भक्तही या चित्रपटाच्या आसपास गेले नाहीत!

दक्षिण मुंबईतील 'मेट्रो' या चित्रपटगृहात गुरुवारी नवीन चित्रपट प्रदर्शित होण्याची प्रथा आहे. आणि जवळपास प्रत्येक चित्रपट निर्माता व दिग्दर्शकाला मेन थिएटरच्या 'फर्स्ट डे फर्स्ट शो'चा पब्लिक रिपोर्ट काय आहे, त्यांना आवडला की नाही याचं भारी कुतूहल, उत्सुकता, तणाव असे. (ही पूर्वीची हुकमी गोष्ट! आता नवीन चित्रपट प्रदर्शित होतोय नि कोणी पाहतोय न पाहतोय त्याने किती कोटी कमावले याच्या बातम्या! चित्रपटाला "विक्री मूल्य" आल्यावर रसिक प्रेक्षकांना काय वाटतेय हे फार कोणी सिनेमावाला जाणून घेत असेल असे वाटत नाही!)

'इश्क इश्क इश्क' प्रदर्शनाच्या दिवसाचा एक किस्सा प्रसिद्ध आहे! 'फर्स्ट शो'साठीचा चित्रपट रसिक उत्साहाने 'मेट्रो' चित्रपटगृहात येत आहेत असा देव आनंदला त्याच्या सांताक्रूझ पश्चिमेकडील 'खिरा हाऊस' येथील कार्यालयात वितरकाचा फोन येताच तो सुखावला! आणि ते स्वाभाविकच

होते. "प्रेम पुजारी" (१९७०) पासून चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकल्यावर देव आनंदला "हरे राम हरे कृष्ण" (१९७२)च्या दिग्दर्शनात 'रौप्य महोत्सवी' यश प्राप्त झाले. (मुंबईत 'गंगा' चित्रपटगृहात या चित्रपटाने खणखणीत पंचवीस आठवड्यांचा मुक्काम केला).. तसे यश "हीरा पन्ना" (१९७३) ला मिळाले नाही! 'हीरा पन्ना'च्या ट्रायल खूप झाल्या तरी वितरक मिळत नसल्याने 'नवकेतन फिल्म' अशा नावानेच चित्रपट वितरण केले. त्या चित्रपटाला फारसे यश मिळाले नाही म्हणून देव आनंद गोंधळला, निराश झाला असे अजिबात नाही! तो त्याचा स्वभाव नव्हता. "निराश देव आनंद" ही त्याची अजिबात ओळख नव्हती. अधिक उत्साहात त्याने नेपाळला जावून "इश्क इश्क इश्क" ची निर्मिती व दिग्दर्शन केले होते. चित्रपटाचे नाव त्याच्या प्रतिमेला (इमेज) साजेसे!

'मेट्रो'तील पहिला खेळ संपल्यावर अतिशय निराश होऊन बाहेर पडत असलेल्या रसिकांचे चेहरे, कुजबुज यातून "पब्लिक रिपोर्ट" स्पष्ट होता (तो मध्यंतरलाच लक्षात आला होता आणि पडद्यावर गाणे सुरु होताच चहापान, सिगारेट, टॉयलेट यासाठी बाहेर पडत असलेल्या रसिकांवरुन शिक्कामोर्तब होत होता! पूर्वी "पिक्चरमध्ये किती दम आहे अथवा नाही!" हे अशा गोष्टीतून सुचित होत असे! (या बाबतीत 'शोले'च्या पहिल्या 'शो'चा मामला तर भयंकर होता यार! पहिल्या चार रांगेतलं पब्लिक तर जाम परेशान होतं! ७० एम.एम.चा "मिनर्व्हा"तील तो पडदा! त्यांच्यासाठी अक्षरशः कर्दनकाळ ठरलेला! त्या रांगांतून सिनेमा पाहणे ही जणू तर शिक्षाच होती! "वॉशरूम"ला आलेल्यांची आपापसातली चर्चा.. मी स्वतः ऐकलीय! "लेफ्ट टू राईट" असा "अर्धवर्तुळाकार" तो पडदा अक्षरशः अंगावर यायचा!

पडद्यावरच्या सगळ्या कलावंतांचे "खांदे" चक्क वाकडे दिसायचे! यावर
भरीस भर म्हणून की काय तो.. कानाचे पडदे फाडून टाकणारा असा "स्टिरीओफोनिक साऊंड"!.. बाप रे! भयंकर परिस्थिती! मोजून "चार आठवड्यानंतर" हे निर्मात्यांनी पुढाकार घेत चित्र बदलले खरे..! हा विषय वेगळा! पण हे असे अनुभव बरंच काही सांगून जातात! शिकवून जातात! चित्रपटाची दुनिया अशाच अनेक छोट्या छोट्या गोष्टींतून गुंफलीय!)

....शो सुटलाय या अंदाजानुसार नवकेतन फिल्मच्या कार्यालयातील फोन वाजण्याची देव आनंदची प्रतिक्षा 'ट्रिंग ट्रिंग' या घंटेने संपली... पलीकडून वितरक जे सांगत होता, त्यावरुन देव आनंद अधिकाधिक निराश होत होत गेला. त्याचा हा सर्वाधिक बजेटचा आणि मेहनतीचा हा चित्रपट होता. आपला चित्रपट रसिकांना अजिबात आवडलेला नाही,

फ्लॉप झाला आहे हे देव आनंदला समजले होते, उमजले होते! काही क्षण तो बैचेन राहिला, चेहऱ्यावरचे भाव उतरले, तो अस्वस्थ झाला.. पण, पण.. आपल्या ऑफिसबाहेर येत आपल्या सहकाऱ्यांना नेहमीच्याच अतिशय उत्साहात म्हणाला, माझ्याकडे आपल्या नवीन चित्रपटाची पटकथा तयार आहे. आपण लवकरच आपल्या नवीन चित्रपटाची घोषणा करतोय आणि मेहबूब स्टुडिओत मुहूर्त करतोय..!

देव आनंद कायमच म्हणायचा, मी मागे वळून पाहत नाही. मी चित्रपटाच्या यशापयशात अडकून पडत नाही हे त्याचे म्हणणे असे खरे ठरते. त्याने "देस परदेस" च्या निर्मिती व दिग्दर्शनाला सुरुवात केली देखील.

...न आवडावे असे "इश्क इश्क इश्क" मध्ये

होते तरी काय? लहानपणापासून गीत संगीताची आवड असलेल्या "धून"ची (देव आनंदच्या) प्रेमाची ही गोष्ट. नेपाळमधील डोंगरमाथ्यावर घडते. 'धून' हा 'कलिप्लोंग

शाळे'त संगीत शिक्षक आहे. त्याचे व 'पम्मी' (शबाना आझमी) यांच्या प्रेमाचे रुपांतर तिच्या नातेवाईकांच्या विरोधामुळे लग्नात होत नाही. म्हणून तो निराश होऊन नवीन आयुष्य जगण्यासाठी नेपाळमधीलच 'मठ' येथे जातो. तेथे पहाड (प्रेमनाथ) याच्या हॉटेलमध्ये तो राहतो. पहाड हा सदैव दारु पिण्यात आनंद घेणारा. त्याला सहा मुली असतात त्यातील पूजा (झीनत अमान) हिच्याशी झालेल्या ओळखीचे रुपांतर प्रेमात होते! गीत संगीत नृत्य होते आणि ते लग्न करणार तोच त्यांचे जवळचे नाते आहे असे दिसून येते. प्रत्यक्षात तसे नसते! आणि मग 'क्लायमॅक्स'ला त्यांचे लग्न होते. गोष्टीत 'नाट्य' नाही म्हणून पटकथेत ते नाही आणि तसे नाही म्हणून दिग्दर्शनही सरधोपट! असा चित्रपट पडायला वेळ तो काय लागतोय! देव आनंद व शबाना आझमी अशीही रोमॅन्टीक जोडी असू शकते? शोभू शकते?? तिच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातील हा चित्रपट! देव

**आनंद व झीनत अमान यांच्या पडद्यावरच्या व पडद्या मागच्या नातेसंबंधांवर गॉसिप्स मॅगझिनमधून बरेच काही चमचमीत लिहिले गेले. देव आनंदच्या दिग्दर्शनातील चित्रपटावर एक प्रकारचा पाश्चात्यपणा दिसतो, त्यात झीनत अमान एकदम फिट्ट! ती देव आनंदमधील दिग्दर्शकापेक्षा त्याचं देव आनंदपण असण्यावर ती जास्त फिदा असावी असे या जोडीच्या चित्रपटात दिसते. मग तो चित्रपट प्रमोद चक्रवर्ती दिग्दर्शित 'वॉरंट' असू शकतो आणि बी. आर. इशारा दिग्दर्शित "प्रेम शास्त्र" असू शकतो, अगदी 'डार्लिंग डार्लिंग' व 'कलाबाज'ही असू शकतो. 'इश्क इश्क इश्क'साठी देव आनंदने भरपूर मेहनत घेतली. देव आनंदला एक चांगली सवय होती. कोणत्याही चित्रपटांच्या बाह्य चित्रिकरण स्थळी गेल्यावर शूटिंग संपल्यावर वा आपलं शूटिंग नसेल त्या दिवशी एक पेन व डायरी घेऊन फिरायला जायचे. त्यात काय काय पाहतोय, कोण कोण भेटतोय हे**

लिहून ठेवायचे. त्यातून होत असलेल्या ओळखीचा त्याला फायदा होई. 'हरे राम हरे कृष्ण'च्या वेळच्या भटकंतीत त्याला




'इश्क इश्क इश्क'साठीची शूटिंग स्थळे गवसली होती. तेवढ्यावरच शांत राहिल तो देव आनंद कसला? त्याने हेलिकॉप्टरमधून फिरुन नेपाळ मधील दूरवरच्या डोंगरमाथ्यावरील स्थळे हेरली. छायाचित्रणकार फली मिस्त्री यांचीही नवीन आव्हाने स्वीकारण्याची तयारी होती. चित्रिकरण

स्थळाचा विचार करुन शंभर जणांचे युनिट नेले. कलाकारही भरपूर होते. स्वत: देव आनंद आणि जोडीला झीनत अमान,

कबीर बेदी, प्रेमनाथ, नादिरा, जीवन,इफ्तेखार, शबाना आझमी, झरीना वहाब, कोमिला विर्क, सत्यजित, त्रिलोक कपूर, सुधीर, नाना पळशीकर, ए. के. हनगल, जानकीदास. यात देव आनंदने आपला 'लंडन' येथे सी. ए. असलेला भाचा 'शेखर कपूर'लाही बोलावले. त्याचा हा पहिलाच चित्रपट. भूमिका मात्र किरकोळ! म्हणजेच त्याच्याही कारकिर्दीला पन्नास वर्ष पूर्ण झाली आहेत! चित्रपटाची जमेची बाजू एकच! आनंद बक्षी यांच्या गीतांना राहुल देव बर्मनचे संगीत! 'अच्छे बच्चे नहीं रोते है..' (किशोरकुमार), 'मुझको अगर इजाज़त हो..' (किशोरकुमार), 'टिमटिम चमका झिलमिल तारा..' (आशा भोसले व किशोरकुमार), 'वल्लाह क्या नजारा है..' (आशा भोसले, किशोर कुमार व सुषमा श्रेष्ठ) ही गाणी लोकप्रिय ठरली! त्या काळात रिदम हाऊसमध्ये 'लॉन्ग-प्ले' तबकडी आली होती, रेडिओ सिलोनवरील 'बिनाका गीतमाला'मध्ये नवीन गाणे आले की नवीन चित्रपट

प्रदर्शनास सज्ज होतोय याचा जणू सिग्नल मिळे! देव आनंदच्या चित्रपटातील गाणी नक्कीच चांगली असणार यावर विश्वास होता! (जो कालांतराने कायमचाच गेला). राहुल देव बर्मनचा तर हा सुगीचा काळ होता! 'इश्क इश्क इश्क'ची गाणी लोकप्रिय होत गेली. पण चित्रपटाला ती वाचवू शकली नाहीत! देव आनंदची भूमिका असलेले अमरजीत दिग्दर्शित 'तीन देवियाँ' व 'गॅम्बलर', शंकर मुखर्जी दिग्दर्शित 'महल', विजय आनंद दिग्दर्शित 'तेरे मेरे सपने', खुद्द देव आनंद दिग्दर्शित "प्रेम पुजारी" यांना फर्स्ट रनला गल्ला पेटीवर यश मिळाले नाही. मात्र गाणी लोकप्रिय असल्यानेच ते चित्रपट मॅटीनी शोला वा रिपीट रनला आल्यावर त्याच गाण्यांमुळे ते हाऊसफुल्ल होत. 'इश्क इश्क इश्क'बद्दल तेही झाले नाही. अरेरे, ज्याच्या रोमारोमात "रोमान्स" भरला होता, त्या देव आनंदचा "प्रेमभरा" असा "इश्क इश्क
इश्क" सर्वाधिक फ्लॉप चित्रपट ठरावा? या

चित्रपटात देव आनंदचं मन का रमले नसेल? त्याचं दिग्दर्शन अगदीच सपक का बरे झाले असेल? जे




झाले त्याला पन्नास वर्षं पूर्ण झाली देखील. मात्र संगीतकार आर. डी. बर्मनमुळे या चित्रपटाचं अस्तित्व कायम राहिले. 'मुझको अगर इजाज़त हो...' देव आनंद प्रेम शैलीतील किशोरकुमारचे पार्श्वगायन. हे गाणे कितीही वेळा ऐकावे/पहावे, आठवावे गुणगुणावे देव आनंदची "प्रेमिक प्रतिमा" डोळ्यासमोर येतेच तर मग आणखीन काय हवे?

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर)
♥

## लेख क्र. ४६

## "हाथ की सफाई" @५० वर्षे राज कपूरच्या "दो उस्ताद"च्या रिमेकमध्ये रणधीर कपूर रंगला !!




दिग्दर्शक प्रकाश मेहरा याने "हाथ की सफाई" (१९७४)चे शूटिंग सुरु होण्याअगोदर रणधीर कपूरसाठी हा चित्रपट, ज्या चित्रपटाची रिमेक आहे त्या तारा हरीश दिग्दर्शित "दो उस्ताद" (१९५९) या चित्रपटाच्या खास ट्रायलचे आयोजन केले त्याचा हा गाजलेला रंगतदार किस्सा! या पिक्चरमध्ये रणधीर कपूरला नेमके काय करायचेय हे समजावे हाच त्यामागचा हेतू. "दो उस्ताद" मध्ये राज कपूर,

मधुबाला व शेख मुख्तार यांच्या प्रमुख भूमिका आहेत. विशेष उल्लेखनीय गोष्ट राज कपूरच्या अगदी लहानपणीच्या वयातील भूमिका रणधीर कपूरने केली! तेव्हा तो अगदी दहा वर्षांचा होता! ट्रायल संपल्यानंतर रणधीर कपूर त्याच्या नेहमीच्या शैलीत गंमतीत म्हणाला, माझे 'डॅडी' कशा कशाही स्वरुपाच्या चित्रपटात भूमिका करत. काहीही करत! यावर पटकन प्रकाश मेहराने म्हटलं, त्यांनी अशा चित्रपटातून कामे केली म्हणून आपल्या कपूर कुटुंबाचा उदरनिर्वाह उत्तम केला...!

हा 'किस्सा' त्या काळात बराच गाजला. राज कपूरच्या चित्रपटात "दो उस्ताद" वर कधीच फारसा फोकस पडत नाही. कारण तो 'ऑल्सो रन'चा मसालेदार मनोरंजक चित्रपट म्हणून गणला जातो! दोन्ही नायक गुन्हेगार असा फंडा!




याच "दो उस्ताद" वरुनच बनलेल्या "हाथ की सफाई" (मुंबईत रिलीज ३० ऑगस्ट १९७४) च्या प्रदर्शनास चक्क पन्नास वर्ष पूर्ण झाली देखील.

सध्या "ॲन्ग्री यंग मॅन" या लघुपटामुळे छान "फोकस" मध्ये असलेल्या पटकथा व संवाद लेखक 'सलिम-जावेद' यांनीच "हाथ की सफाई" लिहिला. अर्थात "दो उस्ताद" चे मध्यवर्ती कथासूत्र घेऊन लिहिला. ही एक रिमेक आहे! आणि हिंदी चित्रपटाच्या यशस्वी पटकथाकारांच्या वाटचालीवर फोकस टाकताना दिसतेय, 'सलिम-जावेद' यांनी अनेकदा तरी जुन्या चित्रपटाची गोष्ट नवीन आकर्षक वेस्टनात

मुद्देसूदपणे मांडली. उत्तम व्यक्तिरेखा रेखाटन आणि बोलके संवाद ही आपली वैशिष्ट्ये पूर्ण क्षमतेने वापरली! एका तमिळ भाषेतील चित्रपटावरुनच "हाथी मेरे साथी" (१९७१) लिहिण्याच्या निमित्ताने त्यांना राजेश खन्नाने एकत्र आणले. त्यांनीच तापी चाणक्य दिग्दर्शित "राम और श्याम" (१९६७) वरुन रमेश सिप्पी दिग्दर्शित "सीता और गीता" (१९७२) लिहिला. मूळ नायकप्रधान चित्रपट त्यांनी नायिकाप्रधान केला! बी. आर. चोप्रा निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित "वक्त" (१९६५) वरुन नासिर हुसेन दिग्दर्शित "यादों की बारात" (१९७३) लिहिताना त्यांनी चित्रपटाला नवीन रुपडं दिलं! ती त्यांची विशेष खासियत, कसब व कौशल्य! थेट "कॉपी" करायची नाही. तर मूळ चित्रपटांवरुन प्रभावित व्हायचे. यश चोप्रा दिग्दर्शित "दीवार" ( १९७५) च्या अतिशय बंदिस्त पटकथेचे कायमच विशेष कौतुक केले जाते. याच "दीवार"ची मुळे कशात आहेत? मेहबूब खान दिग्दर्शित "मदर इंडिया"

ची करारी आई आणि नितीन बोस दिग्दर्शित "गंगा जमुना" मधील भिन्न स्वभावाचे/व्यक्तिमत्वाचे भाऊ या सगळ्याचे आधुनिक मिश्रण म्हणजे "दीवार". तर रमेश सिप्पी दिग्दर्शित "शोले" (१९७५) ची पाळेमुळे अकिरा कुरोसावा दिग्दर्शित "सेव्हन समुराई" आणि राज खोसला दिग्दर्शित "मेरा गाव मेरा देश" (१९७१) या चित्रपटात आहेत हे सर्वज्ञात आहे..! ("शोले" या विषयावर माझे "ई-बुक" प्रतिष्ठित अशा "ई साहित्य प्रतिष्ठान" तर्फे नुकतेच प्रकाशित झाले आहे! अवश्य आस्वाद घ्या!) ही 'हिट-लिस्ट' अथवा उदाहरणे अशीच आणखीन वाढवता येईल. सत्तरच्या दशकातील सामाजिक व्यवस्थेवरचा राग अथवा उद्रेक त्यांच्या नायकात असे हे उल्लेखनीय! तोच तो 'ॲन्ग्री यंग मॅन'! त्याच सलिम जावेद लिखित "हाथ की सफाई"!

दिग्दर्शक प्रकाश मेहराने "जंजीर" (मुंबईत रिलीज ११ मे १९७३) प्रदर्शित होताच निर्माता 'आय. ए. नडियादवाला'

यांच्यासाठी सलिम जावेद लिखित "हाथ की सफाई" चे चित्रीकरण सुरु केले!

रणधीर कपूरचे हे चलतीचे दिवस. 'जवानी दीवानी', 'रामपूर का लक्ष्मण' सुपर-हिट झालेले. आणि चक्क हेमा मालिनी त्याची नायिका! तोपर्यंत हेमा मालिनीने राज कपूरची "सपनों का सौदागर" ची नायिका (तो तिचा पहिलाच चित्रपट!), शम्मी कपूरची नायिका (रमेश सिप्पी दिग्दर्शित "अंदाज"), शशी कपूरची नायिका (समीर गांगुली दिग्दर्शित "अभिनेत्री") अशी "कपूर" नायकांची नायिका साकारली होतीच! (शशी कपूरसोबत त्यानंतर "त्रिशूल" वगैरे अनेक चित्रपटांत काम केले!) "हाथ की सफाई"पासून ती नवीन पिढीतील कपूरांची नायिका झाली! (काही वर्षांनी सुखवंत दढ्ढा दिग्दर्शित "एक चादर मैली सी" या पंजाबी लोककथेवरील चित्रपटात तिने 'ऋषि कपूर'सोबत काम केले.)

"हाथ की सफाई"त  "चोर कथा" रंगली! राज कपूरने चोर साकारावा याचे रणधीर कपूरला आश्चर्य वाटले असेल? आणि राज कपूरचं व्यक्तिमत्व पाहता ते खरेच आहे. त्या काळात हिंदी चित्रपटात "पाकिटमार" पासून "हिऱ्याची अथवा महागड्या जुन्या मूर्तीची चोरी" अशा गोष्टीत पटकथाकार, दिग्दर्शक यांना फार रस असे! सगळाच "चोरांचा बाजार"! चित्रपट रसिकही अशा पिक्चर्सना हाऊसफुल्ल गर्दीने प्रतिसाद देई.

लहानपणी 'हरवलेले भाऊ' हादेखील त्या काळातील एक हुकमी फंडा. पिक्चरच्या पहिल्याच रिळात ते हरवत आणि 'क्लायमॅक्स'ला एकमेकांना ओळखत भेटत. दिग्दर्शक मनमोहन देसाई यांच्याकडे जणू याचे पेटंट होते! याही पिक्चरमध्ये दोन भाऊ लहानपणीच हरवतात. त्यातला राजू (रणधीर कपूर) हा मुंबईतील एका पाकिटमाराकडे लहानाचा मोठा होतो. (योगायोग बघा, "दो उस्ताद" मध्येही

राज कपूरचे नाव राजू हेच असते. सलिम जावेद रिमेक चित्रपट लिहिताना केवढे साम्य ठेवत बघा!) हा गुन्हेगारी विश्वात 'राजू ताडदेव' या नावाने ओळखला जातो. दुसरा भाऊ शंकर (विनोद खन्ना) देखील गुन्हेगारी क्षेत्रात! हिऱ्यांची चोरी, स्मगलिंग वगैरेत कार्यरत! तर कामिनी चोप्रा (हेमा मालिनी) ही एका श्रीमंत खानदानातील युवती काही कारणास्तव घरातून पळून मुंबईत आलेली असते आणि तिला शोधून देणाऱ्यास 'बक्षीस' अशी वृत्तपत्रात आलेली जाहिरात नेमका राजू ताडदेव पाहतो आणि पैशाच्या लालसेने तो कामिनीचा शोध घेतो. तिच्याशी प्रेमाचे नाटक करत तिला तो तिच्या काकांकडे घेऊन जातो. ते करताना तो तिच्याकडच्या किंमती हिऱ्याची चोरी करतो! कामिनीचा काका तिचं लग्न गुन्हेगारी प्रवृत्तीच्या रणजित (रणजित) हिच्याशी करु इच्छितोय म्हणून कामिनी पुन्हा घरातून पळते. आता ती नेमकी शंकरला भेटते! राजू ताडदेवला आता

कामिनीबद्दल खरोखरचे प्रेम वाटू लागते आणि कामिनीची शंकरच्या तावडीतून सोडवू इच्छितोय....पडद्यावर हे रंगलेय हो! रणजितचे नाव रणजितचं आहे. मध्यंतरी त्याच्या जुहूच्या बंगल्यावर त्याच्या दीर्घ मुलाखतीचा योग आला असता तो मला म्हणाला, माझ्या भूमिकेला वेगळे नाव देता आले नाही तर अनेकदा रणजित असेच ठेवत, असे म्हणत तो छान हसला. या चित्रपटात मुश्ताक मर्चंट, सत्येन कप्पू, गोगा कपूर यांच्याही भूमिका. 'पुष्पा पिक्चर्स' या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती झाली!

मूळ चित्रपटातील "स्टोरी" अधिक रंगतदार पणे पटकथा व संवादात मांडण्यात 'सलिम-जावेद' नेहमीच यशस्वी ठरले. प्रकाश मेहरा यांनी अतिशय प्रभावीपणे हा चित्रपट पडद्यावर साकारला. ते पब्लिकला पडद्यावरील घटनांत गुंतून ठेवण्यात यशस्वी ठरले! मसालेदार मनोरंजक चित्रपटाच्या मांडणीत प्रकाश मेहरा अनेक चित्रपटांत

यशस्वी. मग काय विचारता? 'फर्स्ट शो'पासूनच पिक्चर सुपर हिट. मुंबईतील 'सुपर' थिएटरमध्ये पिच्चरने 'रौप्यमहोत्सवी' यश संपादले. आणि त्यात गीत संगीताची धमाल. ती तर हवीच! गुलशन बावराची गाणी आणि कल्याणजी-आनंदजीचे संगीत यांनी पिक्चरच्या मसालेदार मनोरंजनात मस्त भर घातली! 'तुम को मोहब्बत हो गयी..' (किशोरकुमार व लता मंगेशकर), 'तू क्या जाने बेवफा..' (लता मंगेशकर), 'वादा कर ले साजना..' (मोहम्मद रफी व लता मंगेशकर) ही गाणी लोकप्रिय! 'वादा करले...' तर रफीच्या चाहत्यांचे फेवरेट! आणि उल्लेखनीय असे.. 'पिने वालो को पिने का..' (किशोरकुमार! सोबतची गायिका कोण? तर चक्क हेमा मालीनी!)




या गाण्यामागचा "किस्सा" तर "भन्नाट" आहे! कल्याणजीभाईच्या "टीममधला" खास "ज्येष्ठ वादक" (यांना "म्युझिक इंडस्ट्रीत" संगीतकारांच्या "टीम" मधले आदराने "सिटिंग-मेंबर्स" म्हणतात. त्यांचे "मानधन" सुद्धा खास व जास्त असतं!) मला एका "रेकॉर्डिंग" स्टुडिओत अचानक भेटला! मी प्यारेभाईची वाट पाहत होतों. तर.. "काय पेपरवाले साहेब! काय चाललेय सध्या! मी : "कल्याणजी-आनंदजी" यांच्या "सांगीतिक वाटचालीबद्दल" लिहितोय! "मदारी, सट्टा बाजार, छलिया" अशा अनेक सिनेमात "लक्ष्मीकांत-प्यारेलालजी" त्यांचे चक्क "संगीत संयोजक" होते हे ऐकून थक्क झाल्याने मी

"प्यारेभाईना" भेटायला आलोय. असो! येत्या "रविवार पुरवणी साठी" मला "हाथ की सफाई" वर "लेख" द्यायचाय.. पण कधी भेटतील? प्यारभाई??"

"आत्ता साडेचार वाजलेत ना? ते पाचच्या दरम्यान वादकांना पंधरा मिनिटे "चहापानाची" सुट्टी द्यायची म्हणून बाहेर येतील! बाय द वे, "हाथ की सफाई" बद्दल तुम्ही एवढं काय लिहिलंय?"

"त्या सिनेमाबद्दल सर्वकाही मस्त लिहून झालंय!"

"पिनेवालो को.." बद्दल लिहिलात? कुणी गायलय? माहित आहे!"

"मित्रा.. माझ्या लेखात मी त्या सिनेमातल्या गाण्यापर्यंत आलो नाही! माझा सध्यातरी अजूनही अभ्यास सुरू आहे!"

तो सावरून बसला.. "साहेब.. या गाण्या बद्दल मी जे सांगेन ना! ते "इंडस्ट्रीत" कुणीच सांगणार नाही!"

आता मी सावरून आणि कान टवकारून अगदी भक्तांप्रमाणे बसलो.. तो बोलत होता.. मी माझ्या "पॅडवर" टिपून घेत होतो. त्याने "चहा" मागवला. "साहेब.. खरं सांगू.. मी त्या "सीटींगला" होतो! धम्माल अनुभव! काय सांगू साहेब! सिनेमात.. खरंतर वरवर पाहता ती सिच्युएशन नव्हतीच! "गीतकार : गुलशन बावरा" (तो गबाळा रहायचा म्हणून त्याला "कल्याणजीभाईनी" ते नाव दिलेले. ("कुमार शानू, साधना सरगम ही व अशी नावे.. कल्याणजीभाई यांनीच दिलीत, हे तर तुम्ही जाणताच!) तर.. आमचे "बावराजी" अगदी साधे व सरळ..! पण भयंकर मिश्किल स्वभावाचे! डायरेक्टर प्रकाश मेहरा साहेबांनी "वादा कर ले साजना.." हे गाणे फायनल झाल्यावर.. "मला आणखी एक फडकतं गाणं हवंय म्हणून सांगितलं! आपली "हिरोईन" मुळात एक "नर्तकी" असल्याने तिला वाव मिळेल, असे काही देऊया! त्यांना सुचलेली ती "आयडिया" त्या "म्युझिक

**सीटिंग" मध्ये सहजच सांगितलेली! नायक "राजू" हा तिला आपल्या प्रेमात अडकविण्यासाठी झटतोय ना? मग एक "नाटकी" सिच्युएशन करूया! धम्माल गाणे झाले पाहिजे! मग काय! गुलशन बावरा यांनी त्यांच्या पोतडीतले "देवदास, पारो व चंद्रमुखी" या विषयावरील काहीश्या "विनोदी ढंगाने" जाणारे काव्य ऐकवले होते. प्रकाशजी खूप इंप्रेस झाले..!**

**"ओके.. आपण येत्या "मंगळवारी" पुन्हा भेटूया सांगत, रजा घेतली. मग काय! दुसऱ्या दिवशी आमची "सॉलिड" सीटिंग!**

**कथाकार "सलीम-जावेद" यांनी "सिच्युएशन" निर्माण केली. रणधीर-हेमा यांच्या भेटीचा "सीन" बनवला. हेमाची "पर्स" चोरीला जाणे व ती "पॉकेटमार"असलेल्या राजुने आणून देणे. त्यात हेमाचा आयोजित "कार्यक्रम" ज्यातील "नायक" अचानक सोडून जाणे. मग तो राजुने**

**(रणधीरने) करणे/निभावणे.. वगैरे! वगैरे! अशी जुळवा जुळवी (की "बनवा-बनवी") केली! झालं "सिच्युएशन" जमून आली एकदाची! "गुलशन बावराने" जी तोड मेहनत करून गाणे बनविले एकदाचे. कल्याणजी-आनंदजी साहेबांनी.. अनेक तासांच्या मेहनतीनंतर ते आकाराला आणले.. या गाण्यात "संवादयुक्त" भाग होता! तो नाट्यमय संवाद व गाणे एका क्षणी.. एखाद्या मोठ्या गायिकेकडून (लतादीदी, आशाताई) यांच्या आवाजात करावा असं वाटलेलं खरं! परंतु ते "संवाद" हे "देवदास-पारो-चंद्रमुखी" अशा अतिसामान्य व नाटकी "किरदारावर" चित्रित होणार असल्याने, ती "मोठ्या गायिकांना" घ्यायची कल्पना संगीतकारानी स्वतःच बाद केली!**

**गीतकार : गुलशन बावरा यांनी "दिग्दर्शकांनी".. नव्यानं विषद केलेल्या "संकल्पनेनुसार" एक पूर्ण गाणे आकाराला आणले. मेसेज मिळाल्याने आम्ही सकाळींच**

"कल्याणजीभाईच्या" घरी (देवाशिष, पेडर रोड येथील) घरी पोहोचलो! "बावराजी" पावनखिंड जिंकून आल्यागत "उत्साही" होते. "कल्याणजीभाई" आणि पाचेक मिनिटात "आनंदजीभाई" अगदी "फ्रेश-मूड" मध्ये आले! नंतर धाकटा "बाबला" सुद्धा उत्सुकतेने आला.. "बावराजी" आपली संकल्पना मांडू लागले. आम्ही सगळे अक्षरशः संभ्रमावस्थेत होतो! "ये क्या हो रहा हैं?" या मानसिकतेत! आम्हाला आश्चर्याचा धक्का म्हणजे.. "कल्याणजीभाईंनी" बिनधास्त.. "रणधीरच" नव्हे तर "हेमा मालिनी" यांनाही पाचारण केले होते! "भावनगरी गाठ्या-जिलेबी-फाफडा सह चतुरस्त्र

"नाश्ता" तयार होता! "बावरा" आपल्या कुवती
नुसार.. आपले काव्य पेश करत होते.. त्या

गाण्यासाठी त्यांनी सुरुवातीचा भाग.. "संवादाच्या" स्वरूपात सांगितला! नंतर "कच्च्या" चालीत गाणे पेश करायला घेतले.

त्या क्षणी "हेमा मालिनी" अक्षरश: गांगरलेली आणि टेन्शन मध्ये असल्याचे स्पष्ट जाणवत होते. इतक्यात तिथे अचानक "किशोरदा" अवतरले! बाप रे! सगळे स्तब्ध!

आता "बावराजी" अक्षरश: जणू अधिकचा "प्राण" फुंकल्यागत चेकाळले! कल्याणजींनी त्यांना नजरेनेच "सबुर सबुर" असा इशारा करत काहीसे शांत केले म्हणाना! इतक्यात "प्रकाश मेहरा साहेब" आले! मग काय! "बावरांनी" आपले "काव्य" सादर करताच.. नंतर कल्याणजींनी तो माहौल आपल्या ताब्यात घेतला.. "हार्मोनियमवर" संपूर्ण चाल ऐकवायला घेतली. "सिटिंग-मेंबर" असलेल्या आम्ही... गाणे आकाराला आणायला घेतले.. बाप रे! भयंकर! "भरतनाट्यम, कथ्थकच्या

रूपड्यातील ते गाणे पुढे कव्वालीच्या अंगाने जातंय", म्हणता आम्ही परेशान! नशीब! "लंच-ब्रेक" झाला! आम्ही "सीटिंग मेंबरसनी" त्या पाऊण तासात खूप चर्चा केली! आव्हान स्वीकारले! दुपारी दोनच्या दरम्यान आम्ही कामावर रुजू होताना.. अगदी विचारपूर्वक गाण्याला मस्त आकार देण्याचं मनोमन ठरवलं! संध्याकाळी सात वाजता.. ते गाणे मस्त आकाराला आले, हे नशीब!

"पॅक-अप"! तो दिवस संपला खरा! पण तिथे उपस्थित असणाऱ्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर,
का कुणास ठाऊक! एक भलंमोठं "प्रश्नचिन्ह"
होतं! "उद्या पहाटे दुसऱ्या वाटा.. दुज्या गावचा
वारा.." अशा भयंकर मानसिकतेत असतो आम्ही! तुमचे काय? तुम्ही लोक तर "पाच, सहा, आठ व दहा मिनिटांची" गाणी मस्त "एन्जॉय" करता यार! पण एकेका "गाण्याच्या" निर्मितीमध्ये "गीतकार, संगीतकार, गायक इतकंच नव्हे तर

संगीत संयोजक यांच्या अनेक विचित्र गोष्टीने आम्ही भरडले जातो हे कुणालाच माहीत  नसते"!

दुसरा दिवस उजाडला तो नवी उम्मीद घेऊन. आम्ही कल्याणजींच्या घरी पोहोचलो. काही वेळातच प्रकाशजी, गुलशन बावरा आले. किशोरदा आणि.. काही वेळातच हेमाजीसुद्धा आल्या. गप्पा करता करता.. चहा घेत गाण्यावर चर्चा सुरू झाली. "रिहर्सल" सुरू! आधी काही वेळ गाण्याच्या सुरुवातीच्या संवादात्मक नाट्याची तालीम झाली. हेमाजी किशोरदांच्या इशाऱ्यावर ठसक्यात ते संवाद म्हटले. प्रकाशजी म्हणाले.."मस्तच होणार! पण यात "गायिका" कोण असणार आहे!"

किशोरदा म्हणाले.."सहज सांगायचं तर यात दोनच अंतरे आहेत ना!? ते आपण हेमाजीकडूनच गाऊन घेऊया का!? यहाँ प्लीज "पल भर के लिये.." (जॉनी मेरा नाम) भूल जाओ! वहा मेरे साथ "उषा खन्नाजी" थी! खैर यहाँ अच्छा

मौका है!" सगळे संभ्रमात! प्रकाशजी म्हणाले.. "हां यार! आयडिया अच्छा है!" कल्याणजींनी होकार भरला! मात्र इकडे हेमाजींची अवस्था बिकट झालेली! किशोरदा म्हणाले.."हो जाएगा! मैं उनकी तगडी "रिहर्सल" करता हुं! मै इसलिये बोलता हुं की "भरतनाट्यम" माहीर हेमाजी ताल और सूरसे अच्छी तरह वाकिफ है! "नट्टूवंगम, मृदुंगम्" के साथ पेशकश करते है, इसलिये दावे के साथ बोल रहा हुं!.." कल्याणजी-आनंदजीभाईनी अनुमोदन दिले. पुढचा पूर्ण दिवस किशोरदा, हेमाजी, कल्याणजी-आनंदजी असे कामाला लागलो.. आणि ते गाणं दुसऱ्याच दिवशी "रेकॉर्ड" झालं एकदाचं...!"



बाप रे! मी ऐकूनच हैराण झालो होतो. गाणे.. सातेक मिनिटांचे झाले! ते "ईपी" वर कसे मावणार? हा प्रश्न होता. प्रकाशजीनी "एच. एम. व्ही."ला विनंती केली..! "बाबांनो..माझ्या या सिनेमातलं हे जबरदस्त गाणं आहे! कृपया "काटछाट" करू नका. भले ते एकच "ईपी" वर "पुढे व मागे" असे दोन भागात येऊद्या! झंझट
खतम! मग काय? ते "गाणं" प्रदर्शित होताच सुपर
हिट झालं! हुश्श!!

आणखी एक उल्लेखनीय आठवण सांगतो! हेमा मालिनीच्या 'तू क्या जाने..' या 'क्लब-डान्स' गाण्यावरुन फार उलटसुलट चर्चा रंगली होती. हेमा मालिनीने अशा गाण्यावर नृत्य करु नये असं म्हणण्यामागे एक प्रकारची आपुलकीच होती! काय दिवस होते हो ते. पन्नास वर्षांपूर्वीचे चित्रपट चाहते अशा सकारात्मक दृष्टिकोनातून आपल्या आवडत्या कलाकाराकडे पाहत!

तरी एक प्रश्न आहेच, "जंजीर" आणि "हाथ की सफाई" सुपरहिट ठरुनही प्रकाश मेहराने सलिम जावेदच्या पटकथेवर त्यानंतर चित्रपट का दिग्दर्शित केला नाही? आपल्या पटकथेत सगळेच बारीक सारीक तपशील असल्यानेच दिग्दर्शकाला त्यावर करायला फार काही नसतेच अशा सलिम जावेद यांच्या वक्तव्यावर प्रकाश मेहरा व मनमोहन देसाई यांनी प्रत्युत्तर देताना रोखठोकपणे म्हटले, तसे असेल तर देश मुखर्जी दिग्दर्शित "इमान धरम" का सुपर फ्लॉप ठरला?

सलिम जावेदना निरुत्तर करणारी ही गोष्ट हो. (मनमोहन देसाई यांनीही एकमेव "चाचा भतिजा" नंतर सलिम-जावेद सोबत काम केलेले नाही!) रणधीर कपूर व हेमा मालिनी जोडीही पुन्हा एकत्र आली नाही! मनमोहन देसाई दिग्दर्शित

"चाचा भतीजा" मध्ये धर्मेंद्र व हेमा मालिनी आणि

रणधीर कपूर व योगिता बाली अशी जोडी होती.

"हाथ की सफाई" हा सलिम-जावेद यांचा एक

सुपर हिट चित्रपट तसाच प्रकाश मेहरा यांचाही! पन्नास वर्षांनंतरही तेवढाच मसालेदार मनोरंजक! पहा तर एकदा. आजच्या 'ओटीटी प्लॅटफॉर्म'च्या काळात जगभरातील अनेक प्रकारचे चित्रपट एन्जॉय करीत असलेल्यांना कदाचित प्रश्न पडेल, पन्नास वर्षांपूर्वी "असे" चित्रपट रसिकांना आवडायचे? ही काय आवड होती? याचे उत्तर "होय" असेच आहे! "पिक्चर देखते वक्त टेन्शन नही लेने का! टाईमपास करने का!" अशा वृत्तीने त्या काळात चित्रपट एन्जॉय केले जात! "हाथ की सफाई" त्यात एकदम फिट्ट बसणारा!

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर)
♥

## लेख क्र. ४७

## 'थ्री-डी'चा चष्मा 'चाळीशीचा' झाला....!




आपण पिक्चरला गेल्यावर थिएटरचा 'डोअर-किपर' अर्धे तिकीट कापून घेऊन उरलेले देताना त्यासोबत एक विशिष्ट 'चष्मा' देतो आणि तो लावून चित्रपट पाहताना पडद्यावरच्या गोष्टी आपल्या समोरच घडताहेत असे वाटते...! 'त्रिमिती' अर्थात 'थ्री-डायमेन्शन' (थ्री-डी!) चित्रपटाशी आपण चित्रपट रसिकांची झालेली पहिली ओळख!

या ओळखीला तब्बल चाळीस वर्ष पूर्ण झाली देखील!

आपण पाहिलेला पहिला थ्री डी चित्रपट "छोटा चेतन"( मुंबईत रिलीज सप्टेंबर १९८४). मूळ तमिळ भाषेतील हा चित्रपट हिंदीत डब होऊन आल्यावर "हा चष्मा नेमका कोणता?" यापासून तो लावून पडद्यावर अडीच तीन तास पाहिल्यावर काही त्रास तर होणार नाही ना? डोकेदुखी तर होणार नाही ना? अशा केवढ्या शंका, प्रश्न काही विचारु नका! आणि ते स्वाभाविक होतेच. पडद्यावरच्या जगात हरखून/हरवून जाण्याची आपली चित्रपट प्रेक्षक संस्कृती! चित्रपटगृहाच्या अंधारात एकदा का पडद्यावर गोष्ट सुरु झाली की त्यातील गीत संगीत व नृत्य आणि संवाद यातून रमायचे हीच आपली पध्दत! चित्रपट आवडला तर तो डोक्यावर घेत डोक्यात 'फिट' करायचा आणि आवडला नाही तर तो तसाच पडद्यावर ठेवून बाहेर पडायचे असे आपले आपले सोपे समीकरण. त्यात आता हा 'चष्मा' लावून पडद्यावर पाह्यचे तर चष्मा सांभाळायचा की पिक्चरमध्ये

काय चाललंय यात मग्न व्हायचे असा प्रश्न! त्यात भर मूळ तमिळ भाषेतील चित्रपट! का? कुणास ठाऊक! पण त्या काळातील दक्षिणेकडील चित्रपट फारसे आपले वाटतच नसत! त्यांची हिंदी रिमेक जमली असेल तर ते चित्रपट स्वीकारले जात. ('प्यासा सावन', 'एक दुजे के लिए', 'हिम्मतवाला', 'सदमा' ही काही उदाहरणे.) "छोटा चेतन" या नावातच यात बालनायक 'हिरो' असणार हे उघड होते!

'थ्री डायमेन्शन' म्हणजे काय? याची मुद्रित माध्यमातून दखल घेतली गेल्याने चित्रपट पाहण्याचे (एन्जॉय करण्याचे) एक आधुनिक तंत्र आले आहे याची जाणीव झाली. त्या काळातील चित्रपटविषयक लेखनात 'प्रबोधन'ही असे. (आज त्याची जागा 'प्रमोशन'ने घेतली आहे हे जनसामान्य जाणून आहेत!)

"छोटा चेतन"चे मुंबईतील मेन थिएटर 'मेट्रो' होते. असं काही विशेष असेल तर त्यासाठी 'मेट्रो' चित्रपटगृह हुकमी!

संगीतम श्रीनिवास राव दिग्दर्शित "पुष्पक" या संवादरहित चित्रपटाचे मेन थिएटर 'मेट्रो'च होते! मेट्रोत सुरुवातीपासूनच गुरुवारी नवीन चित्रपट प्रदर्शित होतोय. मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांना मात्र वरळीतील सत्यम चित्रपटगृहाचे शुक्रवारचे फर्स्ट शोचे तिकीट दिले. एका नवीन अनुभवाला सामोरे जाण्याची मानसिक तयारी झाली होती. चित्रपट पाहणे म्हणजे तिकीट काढून आत गेलो असे अजिबात नसते. आणि त्या हाऊसफुल्ल गर्दीतील एक होवून आपण चित्रपट पाहत असतो. चित्रपट हे समूहातील एक बनून 'एन्जॉय' करण्याचे एक माध्यम!

चष्मा लावताना "समीक्षकाचा चष्मा" काढून ठेवायचा का हा प्रश्न असला तरी मी समीक्षकाचा चष्मा कधीच लावला नसल्याने 'थ्री-डी'चा चष्मा पटकन फिट बसला आणि पडद्यावर नजर सेट झाली. पहिली काही दृश्ये अवघडलेपण वाटले. अचानक डोळ्यासमोर काही आल्याने दचकून

व्हायला झाले! हळूहळू पडद्यावरच्या जगात रमलो. नवीन तंत्र आवडले! एक 'थ्रीलींगफुल' अनुभव वाटला! (आपले सुदैव हेच की हा सिनेमा
जेव्हां प्रदर्शित झाला, तेव्हां कोणत्याही साथीच्या
रोगांनी डोकं वर काढलं नव्हतं! मला आठवतंय!
आमच्या लहानपणी, त्या १९७०च्या दशकात मुंबईमध्ये "डोळे येण्याची" एक महाभयंकर साथ आली होती! (हे आमचे "समवयस्क" पूर्णतः जाणतात!) तो भयंकर "संसर्गजन्य" आजार असल्याने, या व अशा "थ्री-डी" सिनेमांच्या काळात ती 'साथ' आलेली नव्हती, हे आपले सुदैव!) या सिनेमाचा 'पब्लिक रिपोर्ट'ही सकारात्मक होता. बच्चे कंपनी अतिशय खुश होऊन 'सत्यम'बाहेर पडत होती! पिक्चर हिट होणार याचेच हे लक्षण होते! नेहमीच चित्रपट रसिकांच्या आवडीनिवडीवर चित्रपटाचे यशापयश ठरलयं!

**....पिक्चर 'सुपर-हिट' म्हणजे अनेक आठवड्यांचा हुकमी मुक्काम!**

**आपल्या देशात 'रंगीत दूरदर्शन' व 'व्हिडिओ' यांचे <u>१९८२च्या एशियाडच्या</u> वेळेस आगमन होताच नवीन चित्रपट प्रदर्शित होताच रात्रीपर्यंत त्याची, चोरट्या मार्गाने 'व्हिडिओ कॅसेट' यायची आणि त्याचा जोरदार फटका चित्रपट गृहांना बसत होता. त्याला एक उत्तर म्हणून हे 'थ्री डायमेन्शन' चित्रपट तंत्र आहे असाही एक निष्कर्ष काढण्यात आला! चित्रपटाच्या यशापयशाच्या नोंदीच्या अलिकडे-पलिकडे बरेच काही असतेच असते! आता जो 'हिट' है वो 'फिट्ट' है! अशा अलिखित नियमानुसार 'थ्री डायमेन्शन' चित्रपट निर्मितीत वाढ अपेक्षित असली तरी ती सोपी अजिबात नव्हती! कारण अशी पेशकश खर्चिक तर होतीच वर असे चित्रपट दाखविण्यात थिएटर प्रोजेक्शनमध्ये करावे लागणारे काही बदल, ते अमुक 'चष्मे.. वॉश' करण्याची**

खर्चिक यंत्रणा अश्या खूप गोष्टी होत्या! हे तर एक आव्हान होतेच आणि चित्रपट सुरु होण्याअगोदर प्रेक्षकांना 'चष्मा' द्या आणि संपल्यावर ते जमा करा! (काहीजण ते चक्क ढापायचे सुद्धा! ही कसरतच..) त्याची काळजी घ्या! यात वेळ जात होता आणि थिएटरला अधिक स्टाफ हवा होता! मोठ्या शहरात हे जमून जायचं पण छोट्या शहरात आणि ग्रामीण भागात हे चित्रपट दाखवणे अधिकच आव्हानात्मक होते! मुळात अशा चित्रपटांच्या चित्रिकरणापासून आव्हाने होती. बालप्रेक्षकांना आवडेल अशीच कथा पटकथा हवी! ही आणखी डोकेदुखी!

"शिवा का इन्साफ"ची तशीच गत होती! आणि दिग्दर्शक राज एन. सिप्पी याने गोरेगाव येथील दादासाहेब फाळके चित्रनगरीतील आपल्या चित्रपटाच्या सेटवर शूटिंग रिपोर्टींगसाठी मुंबईतील आम्हा सिनेपत्रकारांना आवर्जून आमंत्रित केले. तेव्हा जॅकी श्रॉफ व पूनम धिल्लन यांच्यावर

एक दृश्य चित्रीत होत असतानाच वारंवार होत असलेले 'रिटेक' हे नवीन तंत्रज्ञान सोपे नाही हे तर सांगत नव्हते ना? छायाचित्रणकार अशोक मेहता अतिशय मेहनतीने कॅमेऱ्यात मग्न होता आणि या अनुभवाचे रिपोर्टींग केले. प्रत्यक्षात चित्रपटसृष्टीतील भटकंतीमधील माझे लाईव्ह अनुभव असे केवढे तरी विविधांगी आणि इस्टमनकलर!

'शिवा का इन्साफ', 'महाशक्तीमान', 'सामरी' असे काही 'थ्री-डायमेन्शन' चित्रपट पडद्यावर आले पण त्यांना फारसे यश प्राप्त झाले नाही! चष्म्यातून चित्रपट पाहण्याचे नाविन्य राहिले नव्हते ना...! नव्वदच्या दशकात "छोटा चेतन"मध्ये उर्मिला मातोंडकरचे फक्कड नृत्य समाविष्ट करुन रिपीट रनला प्रदर्शित करण्यात आला. (रिपीट रन प्रथेत 'थ्री-डी' पिक्चरही) गोरेगावच्या 'सम्राट' थिएटरच्या नूतनीकरणानंतरचा पहिला चित्रपट!

कालांतराने 'मल्टीप्लेक्स' युगात आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रोजेक्शन आणि त्याबरोबरच ग्लोबल युगातील डिजिटल पिढी या सगळ्यात 'थ्री डायमेन्शन' चित्रपटाचे सातत्य दिसतेय. मराठीतील पहिला थ्री डायमेन्शन चित्रपट निर्माण करण्याचे श्रेय महेश कोठारेना! "झपाटलेला" चित्रपटाची 'सिक्वेल' अर्थात पुढचा भाग "झपाटलेला-२" हा मराठीतील पहिला 'थ्री डायमेन्शन' चित्रपट!

'मल्टीप्लेक्स युगातच रमेश सिप्पी दिग्दर्शित सर्वकालीन बहुचर्चित "शोले"वर तांत्रिक सोपस्कार करुन चित्रपट 'थ्री डायमेन्शन' करण्यात आला आणि मला, चित्रपट समीक्षकांना आवर्जून मल्टीप्लेक्समध्ये दाखवला, तेव्हाही गब्बरसिंगची तीच दहशत आणि दरारा!

मल्टीप्लेक्स युगात 'थ्री डायमेन्शन' चित्रपटात विविधता केवढी तरी! विदेशी चित्रपट ('अवतार' इत्यादी), दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपट हिंदीत डब

('बाहुबली', 'आर आर आर' वगैरे), हिंदी सायन्स फिक्शन (रा. वन', '2.0'), 'थ्रीलर' (ॲनिमल), पौराणिक पाश्र्वभूमी ('हनुमान', 'आदिपुरुष', 'कल्की 2898'), ऐतिहासिक चित्रपट ('तान्हाजी', 'पद्मावत'), भूतपट ('भेडिया', 'भूत रिटर्न') , रहस्यरंजक ('राज 3', 'भोला', 'हॉन्टेड') , 'पिरियड' चित्रपट ('83') वगैरे वगैरे! चित्रपटाची निर्मिती, बजेट अवाढव्य झाली, एकेका चित्रपटाच्या पूर्वप्रसिध्दीत एकादा प्रादेशिक भाषेतील चित्रपट नक्कीच निर्माण होईल, मोठ्याच प्रमाणावर देश विदेशातील प्रदर्शन, बिग स्क्रीनवरील अफाट महामनोरंजन, चित्रपट म्हणजे अवाढव्य आर्थिक उलाढाल अशा वातावरणात 'थ्री डायमेन्शन' चित्रपट आता रुळलेत! एका मोठ्याच प्रवासानंतरचे हे यश आहे! अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा हा प्रत्यय आहे! एकेकाळी काही मध्यमवर्गीय चित्रपटगृहात पडद्यावर भुरकट चित्र दिसे आणि मोनो साऊंड सिस्टीममुळे आवाजात दोष असे, असे असले तरी

जनसामान्य प्रेक्षकांनी अनेक चित्रपट डोक्यात फिट केले, डोक्यावर घेतले. त्याचीच गोड गोड
गोड फळे आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल
वातावरणातील चित्रपटसृष्टीला मिळताहेत!

थ्री डायमेन्शन चित्रपट चाळीस वर्षांनंतर कुठे? याचे सकारात्मक उत्तर, प्रचंड प्रगतीपथावर असेच आहे! चित्रपट माध्यमाचा प्रवास 'बायस्कोप', 'मूकपट' असा सुरु होवून तो बराच पुढे चाललाय! त्यात चित्रपटाचा दर्जा तो काय हो? हा मात्र गंभीर विषय ठरेल! आत्ता तर 'ए. आय. ' हे 'तंत्र' अधिकच झपाट्याने अक्राळविक्राळ रूप धारण करतंय! म्हणजे पुढे नेमकं काय? 'तुका म्हणे उगी रहावे.. जे जे होईल ते ते पहावे! चित्ती असो द्यावे समाधान!' आणखी काय!??

© दिलीप ठाकूर
(राम प्रहर-झूम प्रहर)
♥

## लेख क्र. ४८

## 'जैसे को तैसा' @५२ वर्षे.. 'बडा मजा आया'....!!




एक पिक्चर 'सुपरडुपर हिट' म्हणजे सापडला हो सापडला, पिक्चर हिट होण्याचा फॉर्म्युला सापडला. (तसा तो नसतोच. 'फर्स्ट डे फर्स्ट शो'चा पब्लिक रिपोर्ट त्या पिक्चरमध्ये दम आहे की नाही हे सांगतो. वर्षानुवर्ष तेच तर चालत आलेय!) हिट फॉर्म्युला मानत चालणे ही तर हिंदी पिक्चरची केव्हापासून तरी रियल स्टोरी! दिलीपकुमारच्या दुहेरी भूमिकेतील तापी चाणक्य दिग्दर्शित "राम और श्याम" (१९६७) असाच भारी मसालेदार मनोरंजक चित्रपट

पब्लिकला आवडला आणि त्याच्या जणू 'झेरॉक्स' कॉपीज रुपेरी पडद्यावर आल्याच. नवीन सुचत नसले की 'रिमेक' करायची असते म्हणे!

दोन जुळे भाऊ. लहानपणी हरवतात. एक शहरात दुष्ट काकाकडे लहानाचा मोठा होतो. (कारण त्या जुळ्या भावांच्या माता-पित्यांचा अपघातात मृत्यू होतो!). तर दुसरा भाऊ गावात वाढतो. शहरातील भाऊ भित्रा असतो. काका त्याला अधूनमधून चाबकाने फोडतो. गावातील भाऊ धीट, बिनधास्त बेधडक असतो! अरे ला कारे करण्याची धमक त्यात असते. त्याची एक खट्याळ चंचल प्रेयसीही असते. आणि अचानक एके दिवशी गावातील भाऊ शहरात येतो व चुकून तो या श्रीमंत घरात येतो आणि आता तो चाबकाने मार खाण्यापेक्षा तो चाबूकच पकडून परतफेड करु लागतो! हाऊसफुल्ल गर्दीतील थिएटरमधील पब्लिक टाळ्या शिट्यांनी या दृश्याला जबरदस्त रिस्पॉन्स देतो. पिक्चर सुपर

हिट! इकडचा भाऊ तिकडे तर तिकडचा इकडे यात फारच गंमत!

आता मूळ गोष्टीत थोडसं इकडेतिकडे होणारच. मूळ सूत्र कायम! सारख्याच दिसणाऱ्या नायक अथवा नायिकेची अदलाबदल आणि त्यातून उडणारा गडबड गोंधळ म्हणजे हिट पिक्चरचा जणू हुकमी फॉर्म्युला. प्रत्येक निर्माता, दिग्दर्शक, कलाकार, गीतकार, संगीतकार, वितरक या प्रत्येकाला वाटत असतेच, एक हिट पिक्चर मंगता है यार..! 'राम और श्याम" वरुनच बरेच पिक्चर आले. काहींची नावे, सलिम जावेद लिखित, जी. पी. सिप्पी निर्मित व रमेश सिप्पी दिग्दर्शित "सीता और गीता" (१९७२), 'एव्हीएम' प्रॉडक्शन्सचा एम. सुखणन व एम. बालकृष्णन निर्मिती व मुरुगन कुमारन दिग्दर्शित "जैसे को तैसा" (१९७३), पंकज पराशर दिग्दर्शित "चालबाज"(१९८९), फिल्म क्राफ्ट निर्मित व राकेश रोशन निर्मित व दिग्दर्शित "किशन कन्हय्या"(

१९९०) असे "एकाच स्टोरीलाईनवर"चे चित्रपट आले आणि चक्क कमी अधिक हिटही झाले. 'सीता और गीता'मध्ये बदल इतकाच की तो
नायिकाप्रधान! हेमा मालिनीची दुहेरी भूमिका!




म्हणजेच १९६७ला जे पेरले ते तब्बल अनेक वर्ष उगवत राहिले! या काळात आणि नंतरही असेच दुहेरी भूमिकेतील नायक पडद्यावर आले पण त्यात काही नवीन मसाला होता. (उदाहरणार्थ "किशन कन्हय्या'). गंमत म्हणजे मराठीतही "सीता और गीता"ची आठवण येईल असा शरद पिळगावकर निर्मित आणि मुरलीधर कापडी दिग्दर्शित मनोरमा फिल्म्सच्या "चोरावर मोर" (१९८०) आला. या चित्रपटाच्या श्रेयनामावलीत कथा




पटकथा म्हणून मनोरमा फिल्म्स कथा विभाग असे म्हटलयं! उषा चव्हाणची झक्कास दुहेरी भूमिका अशी रंगली की पब्लिक म्हणाले, पैसा वसूल!

यातील मुरुगन कुमारन दिग्दर्शित "जैसे को तैसा" (मुंबईत रिलीज ३१ ऑगस्ट १९७३. मेन थिएटर नॉव्हेल्टी) प्रदर्शनास चक्क बावन्न वर्ष पूर्ण झाली देखील! म्हणून तर हा फोकस!

यातले जुळे भाऊ विजय व विनोद असेच लहानपणीच हरवतात आणि एक शहरात वाढतो, दुसरा गावात! शहरातील विजयची (जीतेंद्र) प्रेयसी राधा (श्रीविद्या) तर

गावातील विनोदची (अर्थात पुन्हा जीतेंद्रच!) प्रेयसी रुपा (रिना रॉय). तर चाचा प्रकाशचंद (रमेश देव)! भित्र्या स्वभावाच्या विजयला चाबकाने फटकावत असतात! मूळ चित्रपटात हीच भूमिका प्राणने केलीय. यात एक योगायोग आहे. रमेश देव यांनी मराठीत "लक्ष्मण रेषा" वगैरे चित्रपटात खलपुरुष साकारल्याने त्यांना मराठीतील 'प्राण' म्हटले जाई आणि यात तर प्राणलाच त्यांनी जणू फॉलो केले!

यात अन्वर हुसेन (श्यामलाल मामा), कामिनी कौशल (विजय व विनोदची आई), अरुणा इराणी (नोकराणी), मोहन चोटी (गोपाल दास) इत्यादींच्याही भूमिका! आनंद बक्षी यांच्या गीतांना राहुल देव बर्मनचे संगीत! 'अब के सावन मे जी डरे..' (लता मंगेशकर व किशोरकुमार) या पावसाळी गाण्यात जीतेंद्र व रिना रॉय प्रचंड चिंब चिंब भिजले! तर 'जैसे को तैसा मिला..' (किशोरकुमार) गाण्यात जीतेंद्र (आता अदलाबदल झालेला) आता रमेश देव यांना चाबकाने मारतो

पब्लिक बहुत खुश हुआ. त्या काळात पब्लिकला काय काय आवडेल याची पेरणी अशी खुबीने होई!

जीतेंद्र व रमेश देव यांचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्या काळात त्यांनी दक्षिणेकडील चित्रपट निर्मिती संस्थांच्या हिंदी चित्रपटात मोठ्याच प्रमाणावर भूमिका साकारत आपला जम बसवला! दोघांकडेही व्यावसायिक दूरदृष्टी व धोरण. तेच फार फार महत्वाचे! साठ-सत्तरच्या दशकात दक्षिणेकडील एव्हीएम, जेमिनी, प्रसाद प्रॉडक्शन्स, सुरेश प्रॉडक्शन्स, देवर फिल्म हे मोठ्याच प्रमाणावर हिंदी चित्रपट निर्मिती करीत ("बाहुबली" सुपरहिट होताच अनेकांना वाटले दक्षिणेकडील वारे हिंदीत आले. ते तर केव्हाच आले होते. आणि त्यात काही बदलही होत गेले!)

जीतेंद्र व रमेश देव हे साठच्या दशकाच्या उत्तरार्धात दक्षिणेकडील चित्रपट निर्मिती संस्थेत गेले, रमले आणि स्थिरावले! एव्हीएमने दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील

चित्रपट मोठ्याच प्रमाणावर निर्माण केले. तर हिंदीत एम. व्ही. रामण दिग्दर्शित "भाई भाई" ( अशोककुमार, किशोरकुमार, निरुपा रॉय), अनंत ठाकूर दिग्दर्शित "चोरी चोरी" (राज कपूर व नर्गिस), कृष्णन पंजू दिग्दर्शित "भाभी" (बलराज साहनी व नंदा), "दो कलियाँ" (विश्वजीत व माला सिन्हा), "मै सुंदर हूं" (मेहमूद, विश्वजीत व लीना चंदावरकर), ए. भीम सिंग दिग्दर्शित "पूजा के फूल" (अशोककुमार, धर्मेंद्र व माला सिन्हा) अशा अनेक चित्रपटांची निर्मिती केली! शिस्तबद्ध चित्रपट निर्मिती हे दक्षिणेकडील वैशिष्ट्य!

कालांतराने अनंत महादेवन दिग्दर्शित "दिल विल प्यार व्यार" या चित्रपटात संगीतकार राहुल देव बर्मनला आदरांजली म्हणून त्याच्या काही सुपरहिट गाण्यांना या चित्रपटात समाविष्ट




करण्यात आले. त्यात 'अब के सावन मे जी डरे..' या गाण्यावर संजय सुरी व ऋषिदा भट्ट पावसात चिंब झाली आहे. मात्र मूळ गाण्यातील जीतेंद्र व रिना रॉयसारखा ओलावा यात नव्हता! हे गाणे अतिशय देखणे होते! "जैसे को तैसा"चा प्रवास असाही होत राहिला!

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान-एन्टरटेन्मेन्ट)
♥

## लेख क्र. ४९

### 'सौदागर' @५२ वर्षे!!
### 'हर हंसी चीज का मै तलबगार हू..'




"कौन बनेगा करोडपती" या खेळातील अनेक वैशिष्ट्यांतील एक विशेष गोष्ट, अमिताभ बच्चन सहज बोलता बोलता जुन्या आठवणीत जात जात आपल्या एकाद्या जुन्या काळातील चित्रपटाबाबत एकादी आठवण सांगणार!

अलिकडेच बीग बीने "सौदागर" (१९७३) मधील आपल्या भूमिकेबद्दल बोलताना म्हटले, त्यात एका दृश्यात नारळाच्या झाडावर चढून नारळ काढायचा होता. पण ते

आपणास येत नाही आणि जमणारही नाही असे आपण दिग्दर्शकाला म्हणाल्याचेही त्याने सांगितले!

याच 'राजश्री प्रॉडक्शन्स' निर्मित व सुधेन्दु रॉय दिग्दर्शित "सौदागर"च्या मुंबईतील प्रदर्शनास बावन्न वर्षं पूर्ण झाली देखील! २६ ऑक्टोबर १९७३ रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला! मुंबईत या चित्रपटाचे मेन थिएटर 'रॉक्सी' होते आणि तेथे मॅटीनी शोला हा चित्रपट प्रदर्शित झाला!

'अमिताभ बच्चन' हा माझा कायमच आवडता विषय! बरं आपल्या 'उंची' अभिनय कारकिर्दीत अमिताभ बच्चनने 'पहिल्या डावा'पेक्षा 'दुसरा डावा'त खूपच वेगळ्या व्यक्तिरेखा साकारत आपल्या अष्टपैलूत्वाचा 'क्लास' सिध्द केलाय असे माझे निरीक्षण आहे! अमिताभ आणि त्याचा चढउताराचा प्रवास यातून शिकण्यासारखे बरेच काही आहे. एक मोठाच आदर्श आहे! हा माणूस इतकी 'एनर्जी' आणतो कुठून याचे कायमच कौतक आणि कुतूहल आहे, पण त्याच्या

सकारात्मक दृष्टिकोनातून बरेच काही शिकण्यासारखे आहे! मित्रांनो, "सौदागर" प्रदर्शित होण्याआधी.. अमिताभच्या आधीचे काही टप्पे.. केवळ एक उत्सुकता म्हणून जाणून घेऊया! ते महत्त्वाचे आहेत बरं! 'सात हिंदुस्थानी' १९६९ हा पहिला सिनेमा ओके! पण यानंतर इतरही सिनेमे आले होते. त्याची यादीच द्यायची तर.. त्याच सालातला 'भुवन शोम', १९७० चे 'बॉम्बे टॉकी', १९७१ चे 'आनंद', 'प्यार की कहानी', 'परवाना', 'रेश्मा और शेरा', 'गुड्डी', 'पिया का घर'! तर १९७२ चे 'संजोग', 'बॉम्बे टू गोवा', 'एक नजर', 'बन्सी बिरजू', 'रास्ते का पत्थर', 'बावर्ची', 'गरम मसाला', 'जबान'.. आणि १९७३ चे 'बंधे हाथ', 'जंजीर', 'गहरी चाल', 'अभिमान'... यानंतर आला तो आपला हा सौदागर! असो!!

आर. बल्की दिग्दर्शित 'पा' (२००९) पासूनचा 'बीग-बी'चा ग्राफ काही वेगळाच नि कौतुकाचा! रामगोपाल वर्मा दिग्दर्शित 'रण', आर. बल्की दिग्दर्शित 'शमिताभ' , सुरजीत

सिरकार दिग्दर्शित 'पिकू', बिजॉय नंबियार दिग्दर्शित 'वझिर', उमेश शुक्ला दिग्दर्शित '१०२ नॉट आऊट', सुजॉय घोष दिग्दर्शित 'बदला', नागराज मंजुळे दिग्दर्शित 'झुंड', मिलिंद लेले दिग्दर्शित 'एबी आणि सीडी' (मराठी), रुमी जाफरी दिग्दर्शित 'चेहरे', शूरजित सिरकार दिग्दर्शित 'गुलाबो सिताबो' किती नावे घ्यायची? कोरानाच्या काळात ओटीटीवर 'गुलाबो सिताबो' प्रदर्शित होत असतानाच तो जगातील अनेक भाषेत डब करुन रिलीज झाला! म्हणजेच तो अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचला!

सत्तरच्या दशकातील समांतर अथवा नवप्रवाहातील (कोणी त्यांना दुर्बोध म्हणत!) चित्रपटात त्याने अभिनय केल्यास ते चित्रपट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल असे म्हटले तर जात होते! अमिताभ मात्र मनमोहन देसाई, प्रकाश मेहरा, यश चोप्रा, हृषिकेश मुखर्जी आणि रमेश सिप्पी यांच्या चित्रपटात अधिक प्रमाणात

"एकाच वेळेस" भूमिका साकारत होता! अमिताभ त्यांचा हुकमी एक्का होता! त्यातही विविधता होतीच आणि त्यातूनही अमिताभचे अष्टपैलूत्व अधोरेखित होत होतेच. पण हा 'तद्दन' पलायनवादी चित्रपट आहे (अपवाद हृषिकेश मुखर्जींचा चित्रपट!) अशी प्रतिमा निर्माण झाली होती! त्या काळात अमिताभ रमेश बहल, राकेशकुमार, एस. रामनाथन, रवि टंडन, दुलाल गुहा या दिग्दर्शकांच्या चित्रपटातून अमिताभची लोकप्रियता आणि या चित्रपटांचे यश विस्तारत होती! सत्तरच्या दशकातही अमिताभने काही 'हटके' चित्रपटात भूमिका साकारलीय. आणि असाच एक महत्त्वाचा चित्रपट 'सौदागर'!

मुळचे कला दिग्दर्शक असलेल्या सुधेन्दु रॉय यांचे या 'सौदागर'ची पटकथा आणि दिग्दर्शन आहे! तर संवाद पी. एल. संतोषी यांचे आहेत. साठ आणि सत्तरच्या दशकात बंगालकडून आलेल्या अनेक दिग्दर्शकांनी ग्रामीण भागातील

एकादी सकस गोष्ट पडद्यावर आणलीय हे सांगायलाच हवे. कसदार लोककथा, त्याला गीत संगीताची उत्तम साथ आणि दर्जेदार अभिनय यांची त्यात सांगड दिसते. आणि प्रेक्षकांपर्यंत चित्रपट पोहचवण्याचे काही सकारात्मक प्रयत्न होते!

'सौदागर' मध्ये कळत नकळतपणे एक वेगळ्या प्रकारचा सौदा आहे. एका गावात 'गुळ' विक्रीत अग्रेसर असलेला मोती (अमिताभ) च्या नजरेत चंचल फुलबानो (पद्मा खन्ना) भरते! या आकर्षणात त्याचे आपल्या पत्नीकडे म्हणजे महजबीकडे (नूतन) दुर्लक्ष होत जातेच पण आपण महजबीपासून तलाक घेऊन फुलबानोशी निकाह केल्यास आयुष्याचा भरपूर आनंद घेऊ शकू असेही त्याला वाटते! फुलबानोचा पिता अब्बा शेखसाहब (रझा मुराद) मोतीकडे जास्त पैशाची मागणी करतो. तेवढे कमवायचे तर आपल्याला बाजारात मोठ्या प्रमाणात गुळ विकता यायला हवा असे

त्याला वाटते. महजबी उत्तम प्रतीचा 'गुळ' बनवते म्हणूनच मोतीकडचा 'गूळ' मोठ्या प्रमाणात विकला जात असतो! महजबीला आपल्या अंतस्थ हेतूचा अजिबात थांगपत्ता येऊ न देता मोती तिच्याकडून जास्त प्रमाणात गूळ तयार करुन घेतो! महजबीचे मोतीवर उत्कट प्रेम आहे आणि ती सुखी संसाराची स्वप्ने रंगवतेय आणि अशातच तिला मोतीचा खरा हेतू समजतो आणि तिला आश्चर्याचा मोठाच धक्का बसतो! मोती महजबीला तलाक देऊन फुलबानोशी लग्न करतो! महजबी हे गाव सोडून जाते आणि तीन मुले असलेल्या एका मच्छी व्यापारी तिच्याशी लग्न करतो!

फुलबानो आता मोतीसाठी 'गूळ' बनवू लागते. पण त्याला महजबीच्या गुळाची चव नाही आणि मूळात तिचे लक्ष सजण्या-धजण्याकडे जास्त आहे. त्यामुळे तिचे कामाकडे दुर्लक्ष होतेय आणि या सगळ्याचा दुष्परिणाम म्हणजे मोतीचा गूळ आता विकला जात नाही! त्याची पत आणि विश्वासार्हता

घसरते. यातून सावरायचा मार्ग एकच! तो म्हणजे, महजबीला विनंती करणे की फुलबानोला चांगल्या प्रतीचा गुळ बनवायला शिकव! एका वेगळ्याच टप्प्यावर ही गोष्ट येते. आपण महजबीपासून तलाक घेऊन फुलबानोशी निकाह केल्याची चूक त्याच्या लक्षात येते..!

या गोष्टीतील मर्म म्हणजे, आपल्या समजूतदार पत्नीशी एकनिष्ठ न राहता, तिच्या प्रामाणिक भावना लक्षात न घेता अधिक लोभापायी उगाच एकाद्या लोभी युवतीत गुरफटत जाऊन पत्नीला घटस्फोट देऊन, या युवतीशी लग्न करण्याचे चुकीचे पाऊल टाकणे....कोणत्याही काळात व कुठेही योग्य वाटेल असेच कथानक!

रवींद्र जैन यांच्या श्रवणीय गीत संगीतातून ही पटकथा आकार घेते! 'तेरा मेरा साथ रहे..' (लता मंगेशकर), 'क्यों लायो सय्या पान..' (आशा भोसले), 'मै हू फूलबानो..' (लता मंगेशकर), 'दूर है किनारा..' (मन्ना डे), 'हर हसीं चीज का...'

(किशोरकुमार), ['सजना है मुझे सजना के लिए..'] (आशा भोसले)...! चित्रपटातील तीनही प्रमुख व्यक्तिरेखांची ओळख या गाण्यांतून होते हे लक्षात आले असेलच आणि अशीच गाणी चित्रपटाला आकार देतात! त्या काळात रेडिओवर ही गाणी ऐकावयास मिळत! लोकप्रिय गीत संगीत एका पिढीतील चित्रपट पुढील पिढीत नेत असतात. चित्रपटाचा प्रवास असा बहुस्तरीय आहे वा असतोच. या चित्रपटात रझा मुराद, लीला मिश्रा, त्रिलोक कपूर, सी. एस. दुबे यांच्याही भूमिका आहेत. 'नूतन' च्या (आमच्या बॅचच्या जवळजवळ सर्वांच्याच चक्क आईच्या वयाच्या) कारकिर्दीतील ही एक महत्त्वाची भूमिका ठरलीय! करियरच्या या टप्प्यावर 'नूतन' चरित्र भूमिकेकडे वळत होती आणि अशा वेळी तिला ही अतिशय उत्तम भूमिका मिळाली! [नूतन]ने आपले अभिनय श्रेष्ठत्व तत्पूर्वीच ['बंदिनी'], ['सुजाता'], ['सीमा'], ['मिलन'], ['तेरे घर के सामने'], ['खानदान'],

'अनाडी', 'छलिया' इत्यादी अनेक चित्रपटातून सिध्द केले होतेच! यातली पद्मा खन्ना ही कधी डान्सर तर कधी सेक्स सिम्बल अशाच भूमिकेत अडकली! ('जॉनी मेरा नाम' उत्तम उदाहरण) तिला क्वचितच चांगल्या अथवा स्वतंत्र व्यक्तिरेखा साकारायला संधी मिळाली! या चित्रपटात तिला ते मिळाले, (काहीही म्हणा!! तिने त्याचं सोनंच केलं! तिच्याबद्दलचं अमुक गॉसिप आजपर्यंत तरी ऐकिवात नाहिय! बरं! असो!) एक प्रकारची ती अमिताभची या चित्रपटातील 'दुसरी नायिका' आहे आणि त्यात तिने 'उच्छखृंल' भूमिकेत रंग भरलाय! आज ती अमेरिकेत असते! अनेक वर्ष तेथे ती नृत्य शिकवतेय!

अमिताभची ही एक वेगळीच भूमिका आहे! पण हा चित्रपट प्रदर्शित होईपर्यंत त्याची 'ॲन्ग्री यंग मॅन'ची पॉवरफुल इमेज प्राप्त झाली होतीच! प्रकाश मेहरा दिग्दर्शित 'जंजीर' (रिलीज ११ मे १९७३). अतिशय जोरात होता आणि

हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'नमक हराम' लवकरच (२३ नोव्हेंबर १९७३) प्रदर्शनास सज्ज होता! अशातच 'सौदागर' रिलीज झाला. चित्रपटाला साधारण स्वरूपाचे यश लाभले, पण असा वेगळा अमिताभ पाहण्यास प्रेक्षक फारसे उत्सुक नव्हते!

अमिताभचा एक वेगळा चित्रपट म्हणून 'सौदागर'चा खास उल्लेख हवाच! दिग्दर्शक सुधेन्दु रॉय यांच्या तत्पूर्वी 'उपहार' (१९७१, प्रमुख भूमिकेत जया भादुरी आणि स्वरुप दत्त!) या चित्रपटाने 'ऑपेरा हाऊस' थिएटरमध्ये रौप्य महोत्सवी आठवड्याचे यश संपादले होते हे विशेष! तर उत्तम कला दिग्दर्शक म्हणून त्यांनी आपला उत्तम ठसा उमटवला होता. 'मधुमती' (१९५९), 'सुजाता' (५९), 'बंदिनी' (६३), 'मेरे मेहबूब' (६४) हे त्यांचे उत्तम कला दिग्दर्शनाचे महत्वाचे चित्रपट आहेत! यावरून त्यांच्या कामाचे महत्व आणि दृश्य माध्यमाची जाण लक्षात येते. उत्तम कला दिग्दर्शक चांगला

दिग्दर्शकही बनू शकतो हे त्यांनी सिध्द केले. तर अमिताभने आपल्या संपूर्ण करियरमध्ये राजश्री प्रॉडक्शन्सच्या 'सौदागर' या एकमेव चित्रपटात भूमिका साकारलीय हे आवर्जून सांगावेसे वाटते. राजश्री प्रॉडक्शन्सची चित्रपट संस्कृती आणि सत्तरच्या दशकातील अमिताभ यांचा ताळमेळ शक्यही नव्हतेच! ('फक्त इथे अतीव दु:खाने सांगायचं तर.. त्यांचे चित्रपट 'यू- ट्यूब'वर उपलब्ध नसतात! कठीण आहे!) कालांतराने नव्वदच्या दशकात चांदिवली स्टुडिओत टीटो दिग्दर्शित "इन्सानियत" या चित्रपटाच्या 'सेट'वर नूतनजींच्या भेटीचा योग आला असता 'सौदागर'च्या काळातील अमिताभ व आता 'इन्सानियत'च्या काळातील अमिताभ यात काय फरक असे मी मुलाखतीत नूतनजींना विचारले! यावर त्या म्हणाल्या 'काहीच फरक नाही. तेव्हा ज्याप्रमाणे तो वक्तशीर, दिग्दर्शकाच्या सूचना ऐके, आजही तो तसाच आहे!' नूतनजींनी मला कौतुकाने म्हटले!

..आज बावन्न वर्षांनंतरही "सौदागर" चित्रपटाचा आशय, अभिनय व गीत संगीत आपला क्लास राखून आहेत हे विशेषच! 'हर हंसी चीज का..' कधीही गुणगुणावे! आणि फ्रेश व्हावे! अमिताभचे काही वेगळे चित्रपट म्हटल्यावर "सौदागर" सहज आठवायला हवाच! जुन्या काळातील चित्रपट रसिकांना तर या चित्रपटाची पोस्टर्सही आठवत असतील.

© दिलीप ठाकूर
(महाराष्ट्र दिनमान-एन्टरटेन्मेन्ट)
♥

## लेख क्र. ५०

## 'शूल' @२६ वर्षे!-
## 'मै आयी हू यूपी बिहार लूटने...'




नव्वदच्या दशकातील अनेक वादग्रस्त (कॉन्ट्रोव्हर्शिअल) गोष्टीतील एक, राजकारणाचे गुन्हेगारीकरण! सत्तेच्या राजकारणातही ते गाजले आणि चित्रपटाच्या पडद्यावरही ते मनोरंजनाच्या वेष्टनातून ते आले. असाच एक पिक्चर! रेड चिली प्रॉडक्शन्सचा 'ई. निवास' दिग्दर्शित "शूल"! हा चित्रपट मुंबईत ५ नोव्हेंबर १९९९ रोजी प्रदर्शित झाला. चित्रपटाला पंचवीस वर्षे पूर्ण झाली आहेत!

एक कर्तव्यदक्ष पोलीस इन्स्पेक्टर कितीही, कशीही विघ्न आली वा आणली गेली तरी भ्रष्ट सिस्टिमशी कडवा लढा देतो आणि ती सगळीच भ्रष्ट व्यवस्था मोडून काढतो या कथासूत्रावर अनेक चित्रपट आले. कर्तव्यदक्ष पोलीस इन्स्पेक्टर नायक ही व्यक्तीरेखा नवीन नव्हती! त्याची "स्टोरी" बदलत गेली. सलिम जावेद लिखित व प्रकाश मेहरा दिग्दर्शित "जंजीर" (१९७३) चा कर्तव्यदक्ष पोलीस इन्स्पेक्टर हा आपल्या 'माँ बाप के खून का' अतिशय त्वेषाने बदला घेतो. हा "सूडनायक" 'ट्रेण्ड-सेटर' ठरला. विजय तेंडुलकर लिखित व गोविंद निहलानी दिग्दर्शित "अर्ध सत्य" (१९८३) चा कर्तव्यदक्ष पोलीस इन्स्पेक्टर अनंत वेलणकर (ओम पुरी) हा झोपडपट्टीतील गुंडाराजचा म्होरक्या अण्णा शेट्टीच्या (सदाशिव अमरापूरकर) दडपशाहीविरुध्द उभा राहतो. जया बच्चनच्या कथा कल्पनेवरील टीनू आनंद दिग्दर्शित "शहेनशाह" (१९८८) चा कर्तव्यदक्ष पोलीस इन्स्पेक्टर रात्री वेष बदलून गुन्हेगारांचे अड्डे उध्वस्त करतो! किती उदाहरणे सांगू? कर्तव्यदक्ष पोलीस इन्स्पेक्टर अनेक चित्रपटांतून दिसला! पटकथेत काही फरक पडत राहिला!

"शूल" या वाटचालीतील पुढचे पाऊल! तेही रामगोपाल वर्मा लिखित व निर्मित!

रामगोपाल वर्मा दिग्दर्शित "सत्या" (१९९८) पासून व्यावसायिक चित्रपटांतून वास्तवता जास्त प्रभावी ठरु लागली. "सत्या" मुंबईतील गॅन्गस्टर, अंडरवर्ल्ड यांच्या विश्वावरचा बेधडक फोकस होता! "सत्या"च्या निर्मितीचा वळणावळणाचा प्रवास अतिशय रोचक आहे. नव्वदच्या दशकात मुंबईतील गॅन्गवॉर मोठीच गुन्हेगारी व सामाजिक समस्या झाली होती. त्याच वेळेस भारत व पाकिस्तान सीमेवरील दहशतवाद गाजत होता. पाकिस्तानी अतिरेकी भारतात घुसखोरीचा प्रयत्न करत होते. जॉन मॅथ्यूज मथान दिग्दर्शित "सरफरोश" (मुंबईत रिलीज ३० एप्रिल १९९९. यंदाच पंचवीस वर्षे पूर्ण. ते साजरेही झाले!) मध्ये त्याचे प्रतिबिंब दिसले. तर देशातील काही राज्यांत राजकारणात गुन्हेगारांचे प्रमाण वाढत होते. त्यांच्या दडपशाहीविरुध्द राजकीय व्यवस्था हतबल होत चालल्याचे चित्र निर्माण होत चालले होते. आणि हे चित्रपटाच्या पडद्यावर येवू लागले!

(यामुळेच की काय.. 'ठाकूरद्वार ते परळ' या संपूर्ण परिसरातील अनेक रहिवाशी त्या काळात "गँगवॉर, गुंडाराज, दादागिरी, महागाई, मिल तसेच रेल्वे कामगारांचे (अयशस्वी) संप" वगैरे तत्सम कारणांनी चक्क उपनगरात स्थायिक झाले! असे बुजुर्ग लोक बोलताना आम्ही मुलांनी ऐकले होते!!)

रामगोपाल वर्मा या नावाभोवती नव्वदच्या दशकात वलय आणि विश्वासार्हता होतीच. विषयाची विविधता असणारा, दृश्य माध्यमाची जाण असणारा आणि प्रेक्षकांना डोळ्यासमोर ठेवणारा फिल्मवाला अशी रामगोपाल वर्माची ओळख. त्याने "शूल" लिहिलाय म्हणजेच त्यात नक्कीच काही धमाकेदार असणार याची खात्रीच! रामू एकाद्या विषयावर चित्रपट लिहितो तेव्हा तो त्या क्षेत्रातील अधिकाधिक जणांशी भरपूर बोलतो, अनेक गोष्टी जाणून घेतो, संदर्भ, माहिती, तपशील जमा करतो आणि मग त्याचा

आपल्या चित्रपटात सदुपयोग करतो. ("सत्या" हे उत्तम उदाहरण!). तो उगाच कल्पनेच्या राज्यात विहार करत नाही. नव्वदच्या दशकात तर त्याच्या "फॅक्टरी" तून त्याने स्वतः आणि अन्य दिग्दर्शकांनी बरेच चित्रपट रसिकांसमोर आणले...."शूल" कडून म्हणूनच अपेक्षा वाढली.

"शूल" च्या पूर्वप्रसिध्दीत पहिला ठेका धरला गेला तो लोकसंगीताचा बाज असलेल्या "मै आयी हू युपी बिहार लुटने.." या गाण्याच्या ध्वनिफीत व मनोरंजन उपग्रह वाहिनीवरील शिल्पा शेट्टीच्या नृत्याने! त्या काळात 'आयटेम साँग' हा फंडा फारच जोरात होता! आणि त्यासाठी कोणतीही पार्श्वभूमी फिट्ट असे. या गाण्याचे सादरीकरणच चित्रपटाचे स्वरुप स्पष्ट करीत होती! हा उत्तर भारतातील एकाद्या छोट्याश्या शहरात घडणारा चित्रपट आहे.

मला आठवतंय, मुंबईतील आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी परेल येथील राजकमल कलामंदिर

स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये "शूल"चा खेळ आयोजित केला होता!

बिहारमधील एका छोट्याशा शहरात हा चित्रपट घडतो. या शहरात बदली होवून आलेला कर्तव्यदक्ष पोलीस इन्स्पेक्टर 'समर प्रताप सिंग' (मनोज वाजपेयी) आपली पत्नी मंजिरी (रविना टंडन) आणि मुलीसह रेल्वे स्टेशनवर उतरताच त्याचा एका उध्दट हमालाशी (राजपाल यादव) खटका उडतो! या शहरात शिस्तीचा अभाव असल्याची त्याला जाणीव होते! पोलीस स्टेशनमध्ये सूत्रे हाती घेतल्यावर त्याला अनेक सामाजिक, राजकीय समस्येशी जोरदार संघर्ष करावा लागतो. अगदी पोलीस खात्यातील अनागोंदी कारभाराशीही त्याला लढावे लागते! आणि त्यात त्याची अतिशय मोठी लढाई असते ती अतिशय शक्तीशाली, बेडर, बेपर्वा आणि कायदा धाब्यावर बसवणाऱ्या अशा राजकीय नेता 'बच्चू भय्याजी यादव' (सयाजी शिंदे) यांच्याशी!

सगळीच सिस्टीम बच्चू यादवच्या दावणीला बांधलीय. त्याची या शहरावर दहशत आहे. या परिस्थितीशी लढताना इन्स्पेक्टर समर प्रताप सिंग याला अग्निदिव्यातून जावे लागले! प्रत्येक पावलावर कडवट संघर्ष करावा लागतो. अनेक वळणे घेत घेत या "शूल"चा धगधगता प्रवास सुरु राहतो. चित्रपटात प्रचंड हिंसा आहे, कौर्य आहे! विनितकुमार (इन्स्पेक्टर तिवारी), गणेश यादव (इन्स्पेक्टर हुसैन), वीरेंद्र सक्सेना (प्रबल प्रताप सिंग), नंदू माधव (लालजी यादव), संदीप कुलकर्णी (गोपालजी), नागेश भोसले (सुधीर विनोद), यशपाल शर्मा (लल्लन सिंग), वल्लभ व्यास (डीएसपी), नवाजुद्दीन सिद्दीकी (वेटर) असे लहान मोठ्या भूमिकेत अनेक कलाकार आहेत! यात दोन विशेष गोष्टी. एक म्हणजे, महाराष्ट्रीयन कलाकार अनेक आहेत! (बरेचसे महाराष्ट्रीयन कलाकार हिंदीत म्हणावे तसे सातत्य का ठेवत नाहीत हा वेगळा विषय!) दुसरी गोष्ट, नवाजुद्दीन सिद्दीकी तोपर्यंत एक

प्रकारचा स्ट्रगलर होता. मिळेल ती छोटीशी भूमिका साकारत असे!

मनोज वाजपेयीसाठी "शूल" खूपच महत्वाची संधी! "सत्या"च्या भिखू म्हात्रेनंतर तो आता "कथेचा नायक" झाला होता. तोही हिंदी चित्रपटसृष्टीत आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी व ओळख निर्माण करण्यासाठी धडपडत होता. त्याने इन्स्पेक्टर 'समर प्रताप सिंग' साकारण्यास अक्षरश: भरपूर मेहनत घेतली. "पिंजर"च्या निमित्ताने त्याची सविस्तर मुलाखत घेण्याचा योग आला असता तो म्हणाला, "शूल"च्या इन्स्पेक्टर समर प्रताप सिंग या व्यक्तिरेखेत इतका व असा गढून गेलो की त्यातून बाहेर यायला मला बराच वेळ लागला..! मनोज वाजपेयीच्या एक्स्प्रेशनवर त्याचे म्हणणे दिसत होते! "शूल" मनोज वाजपेयीच्या जडणघडणीतील महत्वाचा चित्रपट. अशाही चित्रपटात झोकून द्यावे लागते हे सांगणारा!

"शूल"ची अनेक प्रकारचा वास्तवदर्शी मसाला असलेली पटकथा लिहिली होती! ई. श्रीनिवासन, अनुराग कश्यप आणि रामगोपाल वर्मा यांनी! चित्रपटाला मुंबईत सर्वसाधारण यशावर समाधान मानावे लागेल यात आश्चर्य नव्हते! ऐन दिवाळीत हा चित्रपट प्रदर्शित झाला. दिवाळी मूडला हा चित्रपट खरंच साजेसा आहे का सांगा? आणि स्पर्धेत 'राजश्री प्रॉडक्शन्स' निर्मित व सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित "हम साथ साथ है" असताना...????

"शूल" गाजला शिल्पा शेट्टीच्या ठुमकेदार अशा 'आयटेम साँग'वर, 'मै आयी हू...' या सपना अवस्थी, चेतन शशिलाल व शंकर महादेवन यांनी ठसक्यात गायलेल्या या मसालेदार मनोरंजक गाण्याची रचना समीरची तर ठसकेबाज संगीत शंकर एहसान लॉय यांचे आहे! त्या काळात 'बारपासून ट्रक'पर्यंत या मनोरंजक गाण्याने

**अक्षरशः धुमाकूळ घातला. दर्जेदार नव्हतेच पण लोकप्रिय होते!**

**"शूल" सारख्या राजकारणाचे गुन्हेगारी करण असलेल्या गोष्टी अनेक चित्रपटांत बऱ्या वाईट प्रमाणात येतच राहिल्या...! आणि प्रत्यक्ष राजकारणातही गाजल्या. ती गोष्ट आपली नाही! आपण फक्त चित्रपटाच्या पडद्यावर पहावे, तेही विश्व केवढी तरी मोठे आणि विस्तारलेले! आपल्या देशातील हिंदी व मराठीसह अनेक प्रादेशिक भाषेतील चित्रपटांचे विश्व असंख्य गोष्टींनी भरलयं नि ते जगावेगळे आहे! "शूल" त्यातलाच एक चित्रपट! त्याला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त हा फोकस! एक <u>'राष्ट्रीय पुरस्कार'</u> प्राप्त कलाकृती!**

**© दिलीप ठाकूर ((महाराष्ट्र दिनमान-एन्टरटेन्मेन्ट)**

# लेख क्र. ५१

## माधुरीला नवीन ओळख दिलेल्या 'मृत्युदंड'ची चक्क अठ्ठाविशी पार!




'मृत्युदंड' चित्रपट तुमच्या नेमका का लक्षात आहे अथवा हे नाव ऐकल्यावर तुमच्या डोळ्यासमोर नेमके काय आले याची कल्पना नाही, पण माधुरी दीक्षितच्या जबरा चाहत्यांच्या मनात मात्र आले की, या चित्रपटातून माधुरी दीक्षितने आपल्या टीकाकारांना चोख उत्तर दिले!

होय!... 'मलादेखील अभिनय येतोय. फक्त योग्य संधी मिळायला हवी. तसा दिग्दर्शक हवा, तशी भारी कथा हवी, तशी बंदिस्त आणि प्रभावी पटकथा हवी. आणि अभिनयाचा

**कस लागेल अशी व्यक्तिरेखा हवी.. मग बघाच!' असा जणू माधुरीचा हट्टच पुरा झाला!**

**माधुरी दीक्षितच्या अभिनय क्षमतेवर शिक्कामोर्तब केलेल्या प्रकाश झा दिग्दर्शित 'मृत्युदंड' (रिलीज ११ जुलै १९९७) च्या प्रदर्शनास चक्क अठ्ठाविस वर्षे पूर्ण झाली. माधुरी दीक्षितच्या चाहत्यांकडून सोशल मिडियात याची मस्त दखल घेतली. विशेषतः माधुरीच्या या चित्रपटातील विविध बोलक्या मुद्रा पोस्ट केल्या. मोबाईलमध्ये त्या सेव्ह कराव्यात असेच वाटावे.**

**मला आजही मरीन ड्राईव्हवरील एका तारांकित हॉटेलमधील राजश्री प्रॉडक्शन्स निर्मित आणि हीरेन नाग दिग्दर्शित 'अबोध' (१९८४) च्या आम्हा सिनेपत्रकारांसाठीच्या 'टी-पार्टीत' पाहिलेली, भेटलेली, बोललेली माधुरी दीक्षित आठवतेय! अगदीच शाळकरी होती**

हो! पण बोलण्यातील आत्मविश्वास आणि हसरा चेहरा या गोष्टी माझ्या मनावर कायमच्या कोरल्या गेल्या!

माधुरी दीक्षित आपल्या गुणवत्ता आणि मेहनत यावर यशस्वी ठरेल याची खात्री होती. तरी तिच्या प्रगती पुस्तकात एन. चंद्रा दिग्दर्शित 'तेजाब' (१९८८) येईपर्यंत वाट पहावी लागली. चित्रपटाच्या जगात 'सुपर हिट चित्रपट' म्हणेज बरेच काही असते , देते आणि घडवते!

माधुरी दीक्षित नावाचे 'ग्लॅमरस' पर्व 'एस्टॅब्लिश' होत गेले! तिचे चित्रपट प्रदर्शित होत राहिले. काही सुपर हिट झाले ('तेजाब', 'त्रिदेव', 'राम लखन', 'साजन', 'खलनायक', 'हम आपके है कौन'.... हे तिचे सर्वोत्तम सुपर हिट!), काही हिट ठरले ('दिल', 'किशन कन्हय्या', 'मुजरिम', 'संगीत', 'बेटा', 'राजा', 'हन्ड्रेड डेज' वगैरे), काही फ्लॉप सुद्धा झाले म्हणा! ('उत्तर दक्षिण', 'जीवन एक संघर्ष', 'जमाई राजा', 'इज्जतदार', 'पाप का अंत', 'खेल', 'याराना', 'प्रतिकार', 'प्रेम

ग्रंथ', 'दिल तेरा आशिक' वगैरे). सगळ्याच स्टारच्या कोष्टकात काही जोरदार हिट, अनेक फ्लॉप असतानाच. सगळ्याचीच टोटल लावायची असते. ओक्के ओक्के असते!

असे असूनही 'माधुरी दीक्षित जबरदस्त अभिनय कधी करणार अथवा दाखवणार' अशी काहींची भुणभुण सुरु होती!

कोणी म्हणत होते, तिच्या चेहऱ्यावरचे कायमस्वरुपी हास्य हे तिचे ग्लॅमर झाले. तिचा अभिनय कुठे आहे? कोणी म्हणत होते, तिचे नृत्य चापल्य भन्नाटच आहे. 'एक दो तीन...'! (तेजाब), 'धक धक करने लगा..' (बेटा), 'चोली के पीछे क्या है..' (खलनायक), 'दीदी तेरा देवर दीवाना..' (हम आपके है कौन).. तिच्या नृत्यात सौंदर्य, क्षमता, स्टाईल, विविधता असे अनेक गुण आहेत, पण अभिनयाचे काय हो? असा तिरसट प्रश्न केला जात होता. खरेतर नृत्यात फक्त नाचकाम नसते तर अनेक भावछटा त्यात असतात. अभिनयाचे अनेक पैलू

त्यात असतात. तोपर्यंत 'दिल तो पागल है' (रिलीज दिवाळी १९९७) रिलीज झाला नव्हता!




अन्यथा यश चोप्रा यांच्या दिग्दर्शनातील चित्रपटात माधुरी दीक्षितने अभिनय साकारला असे दिसून आले असते! अर्थात, आपल्या ग्लॅमरस रुपाचा प्रत्यय देतच तिने आपली व्यक्तिरेखा त्यात साकारलीय. 'मृत्युदंड' साठी प्रकाश झाने माधुरी दीक्षितची निवड केली तेव्हाही भुवया उंचावल्या होत्या! तत्पूर्वी 'दिल क्या करे' साठी काजोलची



निवड केली तेव्हा तसे काहीच झाले नाही. 'मृत्युदंड' हा खास प्रकाश झा स्टाईलचा चित्रपट! बिहारमधील जमिनदारी, हुकुमत, पुरुषी मानसिकता, अहंकार आणि नायिकेने केलेला उठाव, तिचा स्वाभिमान याभोवतीचे कथानक! आणि त्यात गीत संगीत आहेच. हिंसा आहे. जबरदस्त क्लायमॅक्स आहे. या सगळ्यात माधुरी दीक्षित फॉर्मात आहे. तिने 'केतकी' ही विविध छटा असलेली व्यक्तीरेखा अतिशय प्रभावीपणे साकारत समिक्षक आणि टीकाकारांचे लक्ष वेधून घेतले. चित्रपटात शबाना आझमी, अयूब खान, शिल्पा शिरोडकर, डॉ. मोहन आगाशे, मोहन जोशी, हरिश पटेल, सुहास भालेकर, अच्युत पोतदार, अजित वाच्छानी आणि ओम पुरी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. जावेद अख्तर यांच्या गीताना आनंद मिलिंद यांचे संगीत आहे!

अशा या 'मृत्युदंड' चे कथानक जरी बिहारमध्ये घडत असले तरी बरेचसे चित्रिकरण सातार्‍यात, विशेषतः

पाचगणीत झाले असून तेव्हा मुंबईतील काही सिनेपत्रकारांना शूटिंग रिपोर्टींग साठी आवर्जून नेले होते! 'मृत्युदंड' हा माधुरी दीक्षितचा चित्रपट म्हणून ओळखला जातो. त्यात नेहमीप्रमाणेच गोड दिसलीय (तेही साधेपणात) आणि महत्त्वाचे म्हणजे काही अवघड दृश्यात तिने अतिशय प्रभावी अभिनय केला आणि आपल्या टीकाकारांना चोख उत्तर दिले. आपल्या कामातून आपण बोलणे केव्हाही चांगलेच असते म्हणा..!

'मृत्युदंड' ला अठ्ठाविस वर्ष पूर्ण झाली असताना माधुरी दीक्षितला या चित्रपटाने दिलेली नवीन ओळख आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीला सांगालाच हवी...!

© दिलीप ठाकूर
(नवराष्ट्र रविवार पुरवणी - क्षितिज)
♥

# लेख क्र. ५२

## 'छोटी बहू' बघता बघता चक्क चोपन्न वर्षांची झाली की हो!




आजच्या 'यू-ट्युब', 'डिजिटल युग','ओटीटी प्लॅटफॉर्म' या काळात "छोटी बहू" अशा नावाचा चित्रपट पुन्हा एकदा नव्याने निर्माण होईलसं वाटतं तुम्हाला? अतिशय घरेलू, आपलंसं वाटणारं असं या चित्रपटाचे नाव आहे. अतिशय सोपे आणि समजेल असेच आहे! कौटुंबिक, सामाजिक चित्रपट आणि त्यात नातेसंबंधाची गोष्ट ही तर

आपल्याकडच्या चित्रपट संस्कृतीची अनेक वर्षांची खासियत! पडद्यावर कुटुंबाची गोष्ट आणि समोरच सहकुटुंब तोच पिक्चर 'एन्जॉय' करतेय असा रिअलीटी शो! अशीच बांधिलकी! आणि असाच एक कौटुंबिक नाव व कथा असलेला चित्रपट के. बी. पाठक दिग्दर्शित 'छोटी बहू' (मुंबईत  प्रदर्शन ३ सप्टेंबर १९७१) च्या प्रदर्शनास चोपन्न वर्षे पूर्ण झाली देखील. त्या काळात देशभरात विभागवार चित्रपट प्रदर्शित होत म्हणूनच मुंबईची तारीख आवर्जून दिली! आता यात पुन्हा आणखीन काही गोष्टी कशा आहेत ते बघा! राजेश खन्नाच्या जबरदस्त क्रेझमध्ये हा चित्रपट निर्माण झाला, पण तरीदेखील तो 'नायिकाप्रधान' आहे! नावच तसे आहे म्हटल्यावर काय हो? बरं या चित्रपटाचे शूटिंग सुरु झाले तेव्हा सायरा बानू नायिका होती! राजेश खन्ना व सायरा बानू ही अगदीच वेगळी जोडी! कल्पना करा ही जोडी पडद्यावर कशी दिसली असती? पण काही रिळांचे शूटिंग होतेय तोच

**सायरा बानूच्या जागी शर्मिला टागोर आली आणि राजेश खन्ना व सायरा बानूचा जो एकमेव चित्रपट ठरला असता तो योग हुकला! त्यानंतर कोणत्याच निर्माता व दिग्दर्शकाला ही वेगळी वाटणारी जोडी जमवावी असे वाटलेच नाही. तशी थीम नसेलही. आपल्या चित्रपटसृष्टीचा एक हुकमी फंडा म्हणजे, सुपर हिट पिक्चरचीच जोडी आपल्याही पिक्चरमध्ये असावी, म्हणजे त्यांचे जमलेले ट्यूनिंग आणि त्यांच्यातील 'कन्फर्ट-झोन' आपल्याही पिक्चरच्या मेकिंगच्या पत्थावर पडेल. अशा सुपर हिट जोडीच्या पिक्चरला एकीकडे वितरक मिळेल आणि दुसरीकडे अशा हिट-फिट जोडीचा पिक्चर पाह्यला प्रेक्षकांना भारी आवडते! अहो! इतकेच नव्हे तर चित्रपटाच्या एकूणच स्वरुपानुसार त्याचे 'मेन थिएटर' कोणते असावे यावरही गणिते असत. आपली चित्रपट पब्लिक संस्कृती अशाच अनेक छोट्या छोट्या गोष्टीने गुंतलीय आणि हे आपले वेगळेपणही आहे!**

**'छोटी बहू'चीच खासियत बघा! याचे निर्माते शंकर बी. सी. हे त्या काळातील मोठे निर्माते व राजेश खन्नाचे खास मित्र म्हणून ओळखले जात! त्यांच्या 'डिलक्स पिक्चर्स' या निर्मिती संस्थेच्या वतीने 'छोटी बहू' निर्माण झाला आणि त्यांच्याच 'बॉम्बे पिक्चर्स रिलीज' या वितरणच्या वतीने हा चित्रपट प्रदर्शित झाला! विशेष म्हणजे, सत्तरच्या दशकातील ही एक खूप प्रतिष्ठित अशी चित्रपट वितरण संस्था होती आणि मुंबईतील अनेक सिंगल स्क्रीन थिएटर्सच्या प्रदर्शनात त्यांचा सहभाग असे. (चित्रपट काढणाराच चित्रपटगृह चालण्याचे व्यवस्थापन पाहतोय हीदेखील एक खासियत!) आणि याच चित्रपटाच्या व्यक्तिमत्वानुसार मुंबईत मेन थिएटर 'ऑपेरा हाऊस'! त्या काळात दक्षिण मुंबईतील मेन थिएटर हा एक भन्नाट प्रकार होता! आता 'ऑपेरा हाऊस' थिएटर म्हणजे हमखास सहकुटुंब मनोरंजक चित्रपट पाहण्याचे हुकमी स्पॉट! ('फॅमिली'साठी अगदी खास असे 'बॉक्स' सुद्धा होते**

बरं!) आणि राजेश खन्नाची 'क्रेझ' कॅश करण्यासाठी जोडीला मरीन लाईन्सचे लिबर्टीही!

शक्ती सामंता दिग्दर्शित 'आराधना' (१९६९) सुपर हिट होतानाच राजेश खन्ना व शर्मिला टागोर जोडी जमली! खरं तर शर्मिला टागोर राजेश खन्नाला काही वर्षे सिनियर! म्हणून तर त्यांच्या चित्रपटाची बातमी, जाहिरात, पोस्टर, होर्डींग्स, श्रेयनामावली (टायटल्स) यात शर्मिला टागोरचे अगोदर नाव आणि मग राजेश खन्नाचे! हा क्रम असाच कायम राहिला! या जोडीने शक्ती सामंता दिग्दर्शित 'आराधना' (१९६९), असित सेन दिग्दर्शित 'सफर' (१९७०), के. बी. पाठक दिग्दर्शित 'छोटी बहू' (१९७१), शक्ती सामंता दिग्दर्शित 'अमर प्रेम' (१९७२), ए. भीमसिंग दिग्दर्शित 'मालिक' (१९७२), यश चोप्रा दिग्दर्शित 'दाग' (१९७३), सचिन भौमिक दिग्दर्शित 'राजा रानी' (१९७३), बासू भट्टाचार्य दिग्दर्शित 'आविष्कार' (१९७४), दिलदयाल शर्मा दिग्दर्शित 'त्याग' (१९७७) या




चित्रपटात नायक नायिका साकारली. काही जबरा हिट! तर काही चक्क फ्लॉप सुद्धा झाले! ( 'त्याग' फारच रखडत रखडत एकदाचा प्रदर्शित झाला.) तर 'बदनाम फरिश्ते' (१९७०) आणि 'नसीब' (१९८१) या चित्रपटात प्रमुख पाहुणे होते. ही जोडी आणखीन एका चित्रपटात एकत्र पाह्यला मिळाली असती, शक्ती सामंता दिग्दर्शित 'कटी पतंग' (१९७१) मध्ये शर्मिला टागोर नायिका असणार हे नक्कीच होते! पण या चित्रपटाच्या शूटिंगच्या तारखांत शर्मिला टागोर आपल्या पहिल्या बाळंतपणाच्या तयारीत होती! म्हणून तिच्या जागी 'आशा पारेख' आली. १९७१ साली शर्मिला टागोरचे 'छोटी बहू' आणि बंगाली चित्रपट 'सीमा बध्द' हे दोनच चित्रपट प्रदर्शित झाले आणि तिने सैफ अली खानला जन्म दिला!

'छोटी बहू'ची गोष्ट एका गावात घडते! आपला मोठा भाऊ (तरुण बोस) आणि वहिनी (निरुपा रॉय) यांच्या लहान मुलगा यांच्यासोबत राहत असलेल्या डॉक्टर नायकाचे (राजेश खन्ना) लग्न गावातील एका व्यापाऱ्याच्या मुलीशी (शर्मिला टागोर) होते! तिला या लहान मुलाचा आणि त्याला हिचा असा काही लळा लागतो की तो सात वर्षाचा होईपर्यंत तिला आपली आईच समजतो! कालांतराने काही समज, गैरसमज होतात आणि एकूणच नातेसंबंधात विघ्न येते. असे नाट्य म्हणजे हा चित्रपट! अर्थात, चित्रपटाचा शेवट गोड म्हणजे सगळेच गोड हे स्वाभाविक असतेच.

'छोटी बहू'मधील अन्य कलाकार म्हणजे, निरुपा रॉय, शशिकला, ज्युनियर मेहमूद, मा. सूरज, तरुण बोस, पी. जयराज, सत्येन कप्पू, आय. एस. जोहर इत्यादींच्या भूमिका आहेत. हा चित्रपट 'मुदद्दू बिद्दा' (१९५६) या तेलगू चित्रपटाची रिमेक होता! हा तेलगू चित्रपट बंगाली कादंबरीकार शरतचंद्र

चटर्जी यांच्या 'बिन्दूर छले' या कादंबरीवर आधारीत होता. एका गोष्टीचा प्रवास कसा कुठून होत असतो ते बघा. राज बलदेव राज यांनी 'छोटी बहू'चे लेखन केले. इंदिवर यांच्या गीताना कल्याणजी आनंदजी यांचे संगीत आहे. 'हे रे कन्हय्या..' (किशोरकुमार) हे कृष्ण भक्तीचे गाणे फारच लोकप्रिय झाले. 'ओ माँ मेरी माँ..' (लता मंगेशकर) हेही गाणे रसिकांना आवडले.

..अनेक गोष्टी जमून तर आल्या, पण याची बेरीज जमेची झाली नाही. साध्या सोप्या कथेला पूरक वातावरण आणि राजेश खन्नाला पडदाभर कधी पाहतोय अशी चित्रपट रसिकांची भावना असूनही यशाची गती संथच होती. राजेश खन्नाचे अनेक चित्रपट त्यानंतर मॅटीनी शो आणि 'रिपिट-रनलाही गर्दीत पाह्यले गेले तसे या चित्रपटाबाबत झालेच नाही. एकादा चित्रपट असाही असू शकतो. 'यु-ट्यूब'वर आजची पिढी हा चित्रपट पाहू शकेलही! पण पन्नास वर्षांपूर्वी

**जगण्याची गती संथ लयीत होती, तसेच कौटुंबिक स्वच्छ मनोरंजन करणारे चित्रपटही संथगतीचे होते याचे भान मात्र ठेवा. पूर्वी 'छोटी बहू'ची गोष्ट चित्रपटाची होती, आज ती एकाद्या मालिकेची असू शकते. प्रश्न असा आहे की, आजच्या ग्लोबल युगातील 'छोटी बहू' कशी असेल?**

**© दिलीप ठाकूर**
**(नवराष्ट्र रविवार पुरवणी - क्षितिज)**

## लेख क्र. ५३

# निर्माता/दिग्दर्शक/अभिनेता/ देशभक्त 'मनोजकुमार'..! एक वेगळेच रसायन!



'मेरे देश की धरती..' (उपकार)

'पूरवा सुहानी आयी रे..' (पूरब और पश्चिम)

'भारत का रहने वाला हूं..' (पूरब और पश्चिम)

'इक प्यार का नगमा है..' (शोर)

'पानी रे पानी तेरा रंग कैसा..' (शोर)

.. ही माझ्या मते तरी त्याच्या दिग्दर्शनातल्या चित्रपटातील त्याचा सर्वोत्तम टच असलेली "टॉप फाईव्ह" गाणी! चक्क

काळजाला भिडणारी! ही 'हिट लिस्ट ' आणखीन वाढवता येईल!

यातील 'शोर'च्या (रिलीज १५ सप्टेंबर १९७२) प्रदर्शनास चोपन्न वर्षे पूर्ण कधी बरे होऊन गेली हे त्याच्या सर्वकालीन सदाबहार गाण्यांमुळे समजलेही नाही! हेच या चित्रपटाचे यश आहे! चित्रपटात गीत संगीत नृत्य म्हणूनच महत्त्वपूर्ण! ते त्या चित्रपटाचे अस्तित्व कायमच दाखवते!




'अभिनेता ' मनोजकुमारचे वेगळे मूल्यमापन होते! अगदी त्याच्या रुपेरी पडद्यावरील अभिनय आणि वावर यावर दिलीपकुमार शैलीचा प्रभाव असलेला दिसतो यापासून 'देशभक्त' नायक 'भारतकुमार' अशी प्रतिमा असा तो ग्राफ

आहे! पहिल्यात टीकेचा सूर, तरी वाटचाल धीमी तरी विश्वसनीय. त्या काळातील आघाडीच्या अनेक दिग्दर्शकांच्या चित्रपटात तो आहे/ होता. त्याच्याबद्दलच्या दुसऱ्या व्याख्येत चाहत्यांकडून आत्मियता, कौतुक आणि टीकाकारांकडून काहीशी हेटाळणी. तरी यशाचे गमक त्याच देशभक्त नायक याच प्रतिमेत आहे.

मनोज कुमार यांच्याबद्दल अधिकचं सांगायचं तर.. यांच्या भारतीय स्वातंत्र्याच्या आठवणी थरकाप उडविणाऱ्या होत्या. स्वातंत्र्य मिळालं तेव्हा ते अवघे दहा वर्षांचे होते. स्वातंत्र्याचा आनंद ओसंडून वाहत असतानाच त्याला फाळणीचं गालबोट लागलं. फाळणीच्या वेळी मनोज कुमार आपल्या कुटुंबियांसोबत लाहोरला राहात होते. फाळणीनंतर उसळलेल्या हिंसाचाराची झळ त्यांच्या कुटुंबाला बसली. धर्मांधतेनं आंधळ्या झालेल्या एका जमावानं त्यांच्या काकांची निर्घृण हत्या केली. दैवकृपेमुळे

मनोज कुमार व त्यांचे आई-वडील वाचले आणि दिल्ली शहरात स्थलांतरीत झाले. पुढे तिथं तीन वर्षं ते निर्वासितांच्या छावणीत राहिले. मात्र दिल्लीत आल्यानंतर काही दिवसांनीच मनोज कुमारनी नुकताच जन्मलेला आपला भाऊ गमावला. फाळणीनंतरच्या दंग्याधोप्यांमुळे डॉक्टरमंडळी लपून बसली. आपल्या नवजात मुलावर कोणीच उपचार करीत नाही, हे पाहून मनोजकुमार यांच्या आईनं मोठा आक्रोश केला होता. हा आक्रोश ते कधीही विसरू शकले नाहीत. दोन महिन्यांच्या भावावर अंत्यसंस्कार करून आलेल्या मनोज कुमारना अनेक दिवस वाटायचं की आपणच नदीत बुडतोय, वाहून जातोय... मनातील ही आंदोलनं, आक्रंदनं, जखमा ते पुढे चित्रपटाच्या रुपानं पडद्यावर मांडू लागले.

लाहोर-दिल्ली-मुंबई असा प्रवास करीत मनोज कुमार कालांतराने ग्लॅमर नगरीत दाखल झाले. आणखी एका

काकांमुळे इथं त्यांच्या आसऱ्याची सोय झाली होती. परंतु, सुरुवातीचे त्यांचे दिवस गेले ते संघर्षातच. रेल्वे स्थानक, लॉंड्री, इराण्याचं हॉटेल ही त्यांची आश्रयस्थानं बनली. दादर रेल्वे स्थानकाच्या बाजूलाच असलेला रणजीत स्टुडिओ मनोजकुमार यांच्या कारकीर्दीचा टर्निंग पॉइंट ठरला. इथंच त्यांना पहिल्यांदा त्या काळातील दिग्गज मंडळींचं दर्शन झालं. अनेकांबरोबर ओळखी झाल्या. काम नसलं
तरी ते तिथं नुसतेच येऊन बसायचे. एकदा एका चित्रपटाचं शूटिंग सुरू होतं आणि त्याच दिवशीचा सीन काही लिहून तयार नव्हता. नायक अशोक कुमार चेहऱ्याला मेकअप लावून तयार होते आणि निर्माता-दिग्दर्शक लेखकाला शोधत होते. त्यामुळे संपूर्ण युनिट टेन्शनमध्ये होतं. मनोज कुमार नेमके त्याच वेळी तिथं उपस्थित होते. त्यांना ही सगळी अडचण समजली आणि त्यांनी अवघ्या पाच मिनिटांत तो सीन लिहून दिला. हा सीन वाचून अशोक

कुमार आश्चर्यचकीत झाले. चक्रावलेसुद्धा! मनोज कुमारना त्यांनी आपल्या जवळ बोलावून घेतलं. पायाच्या नखापासून ते डोक्यापर्यंत त्यांना पूर्ण न्याहाळलं नि विचारलं, 'हा सीन तू लिहिला आहेस का?' मनोजकुमारनी होकार भरताच अशोककुमार पुन्हा म्हणाले, 'तेही फक्त पाच मिनिटांमध्ये?' मनोजकुमारचा पुन्हा होकार. त्यावर अशोककुमार म्हणाले, 'खूप छान लिहिलं आहेस तू. पण तू लेखक का बनतो आहेस? तुझं व्यक्तिमत्त्व तर एखाद्या हीरोला साजेसं आहे...' या प्रसंगाची तेव्हा 'रणजीत' स्टुडिओमध्ये प्रचंड चर्चा झाली. त्या काळात हा स्टुडिओ चलतीत होता. ज्या कोणा निर्माता-दिग्दर्शकाचा चित्रपटातील सीन लिहून तयार नसे, किंवा ते आणखी 'डेव्हलप' करायचा असे, ते मनोज कुमारना बोलावीत आणि त्यांच्याकडून तो नव्यानं लिहून घेत. त्याचं मानधन मिळे ११ रुपये..! मनोजकुमार यांच्यात दडलेला प्रतिभावान लेखक, दिग्दर्शक इथून घडायला लागला!

त्याच्या दिग्दर्शनातील पहिला चित्रपट 'उपकार' (१९६७), नंतरचा 'पूरब और पश्चिम' (१९६९) यातील त्याच्या व्यक्तीरेखेचे नाव 'भारत' असल्याचे रसिकांना आवडले आणि तीच त्याची ओळख व इमेज झाली! म्हटलं तर




योगायोग! पण पथ्यावर पडलेला! ही इमेज त्याला केवल कश्यप निर्मित व एस. राम शर्मा दिग्दर्शित 'शहीद' (१९६५) च्या यशाने आणि त्यात त्याने साकारलेल्या 'भगत सिंग' या व्यक्तिरेखेला रसिकांची दाद यातून तयार झाली! (अपवाद "शिरडी के साईबाबा"!)

मनोजकुमारच्या एकूणच दिग्दर्शनाचा पट मांडताना 'शोर' बराच वेगळा. आणि त्याचा खास टच असलेला चित्रपट! त्याची गोष्ट आज कदाचित फारच योगायोगाने भरलेली वाटेल. पण पन्नास वर्षांपूर्वीच्या रसिकांना ती

विलक्षण भारावून टाकणारी होती! प्रत्येक काळाचे काही फंडे असतात आणि ते तात्कालिक काळानुसार योग्यही असतात. हीच सिनेमा संस्कृती आहे!

'शोर'ची थोडक्यात गोष्ट अशी, आपल्या मुलाला (मा. सत्यजित) अचानक सामोऱ्या आलेल्या रेल्वे अपघातातून




वाचवण्याच्या प्रयत्नात त्याच्या आईचा (नंदा) दुर्दैवाने मृत्यू होतो! तिचा हा जिवघेणा अपघात पाहताना विलक्षण आक्रोश केल्याने मुलाची वाचा जाते. तो बोलू शकत नाही! पत्नीचा धक्कादायक मृत्यू आणि मुलावरचे संकट यामुळे शंकर (मनोजकुमार) हादरतो. मुलाच्या उपचारासाठी खूपच मोठा खर्च असतो! तेवढे पैसे आणणार कुठून? एकिकडे तो बराच वेळ सायकल चालवत पैसे मिळव वगैरे वगैरे गोष्टी करतो! दुसरीकडे त्याला

आपल्या आई (कामिनी कौशल) व बहिणीची (बेबी नाझ) साथ आहे. दुसरीकडे त्याला खान बादशाह (प्रेमनाथ) आणि रानी (जया भादुरी) मदत करतात! याशिवाय तो नोकरीही करतो. कधी त्या कारखान्यात टाळेबंदी होते म्हणून शंकर व्यथित होतो. कुठे सहकार्य तर कुठे अडथळेच. यातून मार्ग काढत काढत तो मुलाच्या उपचारासाठी पैसे जमवतो. अगदी मुलावर यशस्वी उपचार होतात. तो बोलूही लागतो. पण त्याचा आवाज ऐकण्यासाठी अतिशय जीवापाड प्रयत्न केलेल्या शंकरचा कारखाना नेमका तेव्हाच सुरु होतो, त्यात अपघातात तो सापडतो आणि त्यात तो दुर्दैवाने बहिरा होतो! हा भावूक 'क्लायमॅक्स'च विलक्षण भावस्पर्शी! (टचिंग!) ठरला. रसिकांना गुंतवून ठेवत ठेवत अखेरीस अनपेक्षित धक्का देण्यात मनोजकुमार यशस्वी ठरला आणि येथेच पिक्चरचे यश पक्के झाले. त्या काळात अशा प्रकारच्या सामाजिक चित्रपटांचे वातावरण होते. राजेश खन्नाचा जबरा

क्रेझ असलेला हा काळ होता. त्यात 'शोर' फिट्ट बसला आणि हिट ठरला! आणि मुंबईत 'मेन' थिएटर 'ऑपेरा हाऊस'ला रौप्यमहोत्सवी यश संपादले! विशेष म्हणज.. 'उपकार', 'पूरब और पश्चिम' यांनीही याच 'ऑपेरा हाऊस'ला 'ज्युबिली हिट' यश संपादन केले होते. 'शोर'ने ज्युबिली हिटची हॅटट्रिक केली! इतकेच नव्हे तर नंतरचा 'रोटी कपडा और मकान' (१९७४)नेही येथेच 'पन्नास आठवड्यांचा' मुक्काम करताना दक्षिण मुंबईतील आम्हा चित्रपट रसिकाना मनोजकुमारचा चित्रपट म्हणजे हमखास ऑपेरा हाऊसच असे नाते घट्ट झाले! ('उपकार'चे सुरुवातीला मेन थिएटर 'लिबर्टी' होते इतकेच!) 'शोर' मध्ये मदन पुरी, असरानी, मनोरमा, मीना टी., मनमोहन, राज मेहरा, नाना पळशीकर, कृष्ण धवन, कुलजीत, व्ही. गोपाल इत्यादींच्या भूमिका आहेत! चित्रपटाचे छायाचित्रण नरिमन इराणी यांचे आहे. या चित्रपटाची काही वर्षांनी 'ओसई' या नावाने तमिळमध्ये रिमेक आली! चित्रपट

'हिट' म्हणजे हे असे होणार! 'शोर'ची थीम मनोजकुमारच्या देशभक्तीच्या हुकमी फॉर्म्युल्यापेक्षा निश्चितच वेगळी. 'रोटी कपडा और मकान' पासून मनोजकुमार फिल्मी झाला! पब्लिकला अमूकतमूक आवडेल असा समज करुन घेऊन देशभक्तीपर संवाद वगैरेवर भर देऊ लागला! त्याचा 'क्रांती' (१९८१) चक्क 'सलिम जावेद'ची पटकथा व संवाद असलेला 'पिरियड' सिनेमा! काही प्रसंग मात्र हास्यास्पद बरं! सलिम जावेदकडून हा मागणी तसाच पुरवठा! 'छापो अने आपो टाईप'! मनोजकुमारच्या 'भारतकुमार' प्रतिमेवर प्रेम असलेल्या त्याच्या हुकमी 'क्राऊड'ने पिक्चर हिट केले! आणि एकदा जोरात सुरु असलेला चित्रपट मग बरेच आठवडे चालतच राहतो. मुंबईत मेन थिएटर अप्सरामध्ये पन्नास आठवड्यांचा भारी मुक्काम केला, बरं का?

मनोजकुमार यानंतर आपल्याच 'देशभक्त नायक' या प्रतिमेत अडकला आणि थीमपेक्षा हुकमी दृश्ये (नायिका

पावसात चिंब भिजवणे, एकादा बलात्कार वगैरे!) यात गडबडला! याचा परिणाम म्हणजे, त्याच्या दिग्दर्शनातील 'क्लर्क' (१९८९), 'जयहिंद' (१९९६) दणकून आपटले! मला आठवतय, 'जयहिंद'च्या कमालीस्तान स्टुडिओ तील शूटिंग रिपोर्टींगसाठी आम्हा काही सिनेपत्रकाराना सेटवर बोलावले असता 'मनिषा कोईराला'ची बराच काळ वाट पाहून मनोजकुमार कातावला होता. असे अनेक दिवस झाल्याने त्याने तेव्हाच 'पुरे झाले दिग्दर्शन' असे ठरवले!

गाण्याचे व्यक्तिमत्व पडद्यावर खुलवणे हे त्याच्या यशस्वी दिग्दर्शनातील सर्वात मोठे वैशिष्ट्य! 'शोर' मधील संतोष आनंद यांनी लिहिलेली 'इक प्यार का नगमा है..' (लता मंगेशकर व मुकेश), इंद्रजितसिंग तुलसी यांनी लिहिलेली 'जीवन चलने का नाम..' ( मन्ना डे, महेंद्र कपूर व श्यामा चित्तार (आपल्या सुमनताई कल्याणपूर यांची बहिण), 'पानी रे पानी तेरा रंग..' (लता मंगेशकर व मुकेश), वर्मा मलिक

लिखित 'शहनाई बजे ना बजे..' (लता मंगेशकर) ही सगळी गाणी सहज ओठांवर येतात आणि गुणगुणत असताना त्यांचे पडद्यावरचे सादरीकरण डोळ्यासमोर येतेच! हे मनोजकुमारच्या दिग्दर्शन व संकलनाचे यश आहे! (मनोजकुमारला या चित्रपटासाठी संकलनाचा 'फिल्मफेअर पुरस्कार' प्राप्त झाला.) विशेष म्हणजे, पहिल्या दोन चित्रपटाना ('उपकार' आणि 'पूरब और पश्चिम') कल्याणजी-आनंदजी यांचे संगीत असूनही आणि गाणी आजही लोकप्रिय असूनही 'शोर' साठी मनोजकुमारने 'लक्ष्मीकांत प्यारेलाल' यांची निवड केली. त्यांनीही कम्माल केली! सोपी चाल हे त्यांचे वैशिष्ट्य. विशेष म्हणजे 'पानी रे पानी..', 'जीवन चलने का नाम..', 'इक प्यार का नगमा..' अशा तीन गाण्यात आयुष्याचे तत्वज्ञान आहे आणि ते सोप्या शब्दात व साध्या चालीत आले आहे. ('इक प्यार.. ' तर जगजीतजींचे सुद्धा आवडते गाणे.) आणि 'शोर' पन्नास वर्षांनंतरही आजचा

चित्रपट म्हणून रसिकांसमोर ठेवलयं..! असे अनेक चित्रपट थिएटरमधून उतरले तरी रसिकांच्या मनात कायमचे घर करतात. मग त्याचा 'शोर' कितीही जुना का असेना. त्यात असलेला मनोरंजनाचा 'जोर' महत्वाचा! अशा या चतुरस्त्र आणि देदीप्यमान कारकीर्द असलेल्या आपल्या लाडक्या "मनोज कुमारजींचे" वयाच्या ८७व्या वर्षी दि. ४ एप्रिल, २०२५ रोजी निधन झाले! त्यावर भाष्य तर करायलाच हवे! तर..अमुक गोष्टी वाचकांच्या समोर आपलेपणाने मांडायच्या तर..

ज्येष्ठ अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक मनोज कुमार जवळपास गेली दोन दशकं अंथरुणाला खिळून होते. या काळात 'टीव्ही वाहिन्यांवरील मुलाखती'देखील त्यांनी अंथरुणावर झोपूनच दिलेल्या पाहायला मिळतात. त्यामुळे सार्वजनिक कार्यक्रमांमधील त्यांची उपस्थिती बंदच झाली होती. परंतु, एकाही मुलाखतीत कोणाबद्दल कसलीही

नाराजी, तक्रारीचा सूर त्यांच्या बोलण्यातून जाणवला नाही. जाणवली ते आई-वडिलांवरील श्रद्धा, शिर्डीच्या साईबाबांवरील श्रद्धा आणि भक्ती! चित्रपट माध्यमावरील निष्ठा आणि भारत देशावरील प्रचंड प्रेम! प्रत्येक १५ ऑगस्ट तसेच २६ जानेवारीला मनोज कुमार यांच्यावर चित्रीत झालेलं 'मेरे देश की धरती..' हे गाणं या विलक्षण कलावंताची आपल्याला आठवण करून देतं! खुद्द मनोज कुमार यांच्या एका चित्रपटातील गाण्यात 'परछाइयां रह जाती... रह जाती निशानी है...' हे शब्द ऐकायला मिळतात. ते अगदी खरं आहे. मनोज कुमार यांच्या प्रतिभेची सावली, त्यांच्या आठवणी आजही आपल्या सोबतच आहेत, आणि असतील यात शंकाच नाही!!

© दिलीप ठाकूर
(नवराष्ट्र रविवार पुरवणी - क्षितिज)

## लेख क्र. ५४

## 'मेरे जीवन साथी' @५३ वर्षे... गाणी आजही हिट इतकेच!




संगीतकार आणि आपल्या कामात कायमच विशेष रस घेणाऱ्या राहुल देव बर्मनबद्दलचा एक किस्सा भारीच लोकप्रिय आहे!

शक्ती सामंता दिग्दर्शित 'कटी पतंग' (१९७१) सुपर हिट ठरला आणि सुपर स्टार राजेश खन्ना व संगीतकार राहुल देव बर्मनची छान गट्टी जमली! दोघांनीही या पिक्चरच्या 'ज्युबिली हिट' यशाने आपली पोझिशन आणखीन भक्कम केली! शक्ती सामंता दिग्दर्शित 'आराधना'च्या (१९६९)

**खणखणीत यशाने राजेश खन्नाचे युग रंगात आले! राहुल देव बर्मनने विजय आनंद दिग्दर्शित 'तिसरी मंझिल' (१९६६)च्या लोकप्रिय गीत-संगीताने आपली ओळख निर्माण केली होतीच! (१९६६ चे प्रदर्शित सिनेमे पाहता. "तिसरी मंजिल" या सिनेमाचे संगीत म्हणजे काय चीज होती ते कळेल! त्या वर्षीचे 'टॉप' सिनेमे म्हणता.. 'फुल और पत्थर', 'सूरज', 'मेरा साया', 'लव्ह इन टोकियो', 'दो बदन', 'आए दिन बहारके', 'सावन की घटा', 'प्यार किये जा', 'अनुपमा', 'ममता', 'दस लाख', 'आखरी खत', 'गबन' अशी नावे सहजच आठवतात! हे मस्त संगीत असलेले सिनेमे आज "पन्नाशी, साठीत" असणाऱ्याच नव्हे तर संगीताचे "शौकीन" असणाऱ्या जवळजवळ सर्वांनाच आठवतील यात शंकाच नाही! यातील प्रत्येक सिनेमातील गाणी खूप सुपरहिट होती याबद्दल दूमत नाहीय परंतु "तिसरी मंजिल" मधल्या गाण्याचा विचार करता त्यातल्या सर्व गाण्याचं संगीत, त्यातील वेगळंच व**

**थक्क करणारं 'संगीत संयोजन' अशा पद्धतीने सादर झालं, की ती बाब सर्वांनाच आश्चर्यात टाकणारी होती! काळापासून पुढे! खूप पुढे! ("लिंक्स" दिल्या आहेत. त्या नक्की पहा! अभ्यासा! मजा आएगा!!)**

**बाय द वे! त्या काळात 'कटी पतंग' दोघांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरला आणि तेव्हापासून या दोघांची मैत्री जमतानाच त्यांच्यात आणखीन एक  मित्र होता, 'किशोरकुमार'! (एव्हाना जुन्या पिक्चरचे शौकिन जुन्या आठवणीत रमले असतील!) तिघांनी मिळून हिंदी चित्रपट संगीतात अनेक श्रवणीय गाणी दिली. 'अमर प्रेम' पासून 'कुदरत' पर्यंतचे त्यांचे प्रगती पुस्तक भारीच आहे. या मैत्रीत आर. डी. बर्मन कसा जागला? तर जेव्हा जेव्हा त्याला चांगल्या चाली सुचत त्या तो काकासाठी अर्थात राजेश खन्नासाठी बाजूला काढून ठेवायचा आणि राजेश खन्नाचा चित्रपट**

त्याच्याकडे आला रे आला की त्या चाली राहुल देव बर्मन वापरे..! हा किस्सा लोकप्रिय आहे!

'ओ मेरे दिल के चैन...'

'चला जाता हू किसीकी धून मे..'

'दीवाना ले के आया है...'

ही आजही लोकप्रिय असलेली आणि सहज गुणगुणता येतील अशी गाणी अशीच जन्माला आल्याची आख्यायिका प्रसिद्ध आहेच! बरं, तसेच असेल अथवा नसेलही कदाचित, पण पन्नास वर्षांनंतरही ही गाणी लोकप्रिय असली तरी ही गाणी असलेला रविकांत नगाईच दिग्दर्शित 'मेरे जीवन साथी' (प्रदर्शन २२ सप्टेंबर १९७२! म्हणजेच पिक्चरला त्रेपन्न वर्षे झाली!) मात्र बराचसा विसरला गेला आहे! अपवाद राजेश खन्नाच्या तेव्हाच्या निस्सीम चाहत्यांचा! एव्हाना त्यांनी वयाची पन्नाशी नक्कीच ओलांडली असेल! आणि त्याना आपले तरुणपणीचे दिवस नक्कीच आठवले असतील! ही गाणीही

आज तरुणच आहेत! ही तीनही गाणी किशोरकुमारने राजेश खन्नाच गातोय अशाच 'स्टाईल'ने गायलीत हे त्या गाण्याचे व्यक्तिमत्व सांगतेय. ही गाणी 'मजरुह सुल्तानपुरी' यांनी लिहिली आहेत! हे विशेष!

ही गाणी आजही लोकप्रिय असली तरी 'फर्स्ट रन'ला पिक्चर 'फ्लॉप' झाले त्याचे हो काय? हरीश शहा व विनोद शहा या चित्रपटाचे निर्माते आहेत. माझ्या मते या पिक्चरच्या अपयशाचे महत्त्वाचे कारण म्हणजे, हा चित्रपट दिग्दर्शक रविकांत नागाईच यांच्या स्टाईलचा नव्हता. यांच्याच दिग्दर्शनातील 'द ट्रेन' (१९७०) मध्ये राजेश खन्नाच हीरो होता! हा रहस्यरंजक म्युझिकल हिट पिक्चर आजही पुन:पुन्हा पहावासा वाटतो! रविकांत नगाईच यांच्या दिग्दर्शनातील 'फर्ज' (१९६७, जितेंद्र व बबिता), 'द ट्रेन' (१९७०, राजेश खन्ना व नंदा!), 'कीमत' (१९७३, धर्मेंद्र व रेखा), 'सुरक्षा' (१९७९, मिथुन चक्रवर्ती व रंजिता) या पिक्चर्समध्ये

एक कॉमन सूत्र आहे, हे हिंदी फिल्म स्टाईल जेम्स बाँड आहेत! रविकांत नगाईच यांच्याच अन्य पिक्चर्सपेक्षा वेगळे. 'मेरे जीवन साथी' तर योगायोगाने खच्चून भरलेल्या गोष्टीची पटकथेत फसलेली मांडणी! त्यात पुन्हा एक लोच्या होताच, राजेश खन्नाने एकाच वेळेस इतके पिक्चर स्वीकारले होते की, त्याची शूटिंगसाठी धावपळ होई आणि त्यातूनच त्याच्या अभिनयात तोचतोच पणा अथवा नाटकीपणा येत गेला आणि हे पब्लिक का स्वीकारेल? गाणी लोकप्रिय असल्याने नंतर मॅटीनी शोला पिक्चरला चांगला रिस्पॉन्स मिळत राहिला. हिट गाणी चित्रपटाला असे जिवंत ठेवते. आणि चित्रपटाला पुढील पिढीत नेते.

पिक्चरची थोडक्यात गोष्ट अशी..!

गोष्टीचा नायक प्रकाश (राजेश खन्ना) एका श्रीमंत बापाचा (के. एन. सिंग) मुलगा, जो आर्टिस्ट आहे, चित्र रेखाटतो, पण एक दिवस बाप आपल्या या मुलाला चॅलेंज देतो

की जर स्वतःच्या बळावर तुला श्रीमंत व्हायचे असेल तर तुला स्वतःला स्वतःच्या कर्तृत्वावर सिद्ध करावं लागेल, हे ऐकल्यावर प्रकाश घर सोडतो आणि स्वतःला सिद्ध करायला निघतो, आता त्याची ओळख कामिनीशी (हेलन) होते आणि तो 'प्ले-बॉय' होऊ पाहतो (येथेच गोष्टीची गाडी घसरते ती सावरतच नाही.), त्याची स्वतःची ओळख पेंटिंगमधून पण तो आता 'मॉडर्न आर्ट' करायला लागतो. एक कलाकार म्हणून नवीन ओळख झालेल्या प्रकाशला लंडनवरुन डॉक्टर झालेल्या ज्योती (तनुजा)च्या एका फंक्शनचे आमंत्रण मिळतं आणि प्ले-बॉय प्रकाश आणि ज्योती यांचे सूर ('ओ मेरे दिल के..'!) हळूहळू जुळू लागतात, (गोष्ट अजून एक वळण घेते.) ज्योतीच्या वडिलांना प्रकाशची 'प्ले-बॉय'ची इमेज आवडत नाही, पण एक दिवस त्यांना प्रकाशमधला चांगला माणूस दिसतो आणि ते या लग्नाला होकार देतात, या आनंदाच्या भरात प्रकाश ज्योतीला भेटून निघालेला असताना ('चला

जाता हू..' हे गाणे उत्फूर्तपणे गात गात) अचानक त्याच्या गाडीचे ब्रेक फेल झाल्याने अपघात होतो आणि या अवस्थेत त्याला कामिनी वाचवते! अपघातानंतर प्रकाशचे डोळे जातात आणि त्याच्या असहाय्य परिस्थितीचा कामिनी फायदा घेते, पण एक दिवस प्रकाश पळून जातो, त्याचा शोध घ्यायच्या नादात कामिनी कड्यावरून खाली पडते आणि तिचा मृत्यू होतो, दरम्यान प्रकाश डोळे नसल्याने वाट सापडेल तिकडे जात असतो, अशा अवस्थेत प्रकाशला कॅप्टन विनोद (सुजितकुमार) भेटतो आणि तो त्याला आपल्या घरी घेऊन येतो. आता विनोदचे आई आणि वडील (सुलोचना आणि उत्पल दत्त) प्रकाशची चांगली काळजी घेतात, प्रकाशला अपघात झाल्याचे समजताच ज्योतीला धक्का बसतो पण यथावकाश ती सावरते आणि विनोद तिच्या आयुष्यात येतो, विनोदचे आई आणि वडील ज्योतीवर विनोदशी लग्न करण्यासाठी प्रयत्न करतात! ज्योती घरी येते

तेव्हा तिच्या वडिलांना (नासिर हुसेन) हृदय विकाराचा झटका आलेला असतो आणि ते ज्योतीने लग्न करावे म्हणून वचन मागतात, मग ज्योती विनोदबरोबर साखरपुडा करते आणि याच पार्टीत प्रकाश विनोदसाठी एक गाणं ('दीवाना ले के आया है..') सादर करतो तेव्हा त्याच्या आवाजावरुन ज्योतीला समजते की प्रकाश जिवंत आहे.....आता चित्रपट क्लायमॅक्सकडे वळतो.

आणि अपेक्षित गोष्टी घडतात! या नाट्यपूर्ण घटनांबाबत रसिकांना फारसा रस वाटला नाही आणि राजेश खन्नाची जबरा क्रेझ असूनही पिक्चर नाकारला गेला. याचे मुंबईतील मेन थिएटर 'अप्सरा' होते. १९७२ च्या पहिल्याच शुक्रवारी राजेश खन्नाचा दुलाल गुहा दिग्दर्शित 'दुष्मन' प्रदर्शित झाला तोच 'फर्स्ट डे फर्स्ट' शोपासूनच सुपर हिट (मुंबईतील ताडदेवच्या गंगा व जमुना या जुळ्या थिएटरचे उदघाटन याच पिक्चरने झाले!), मग शक्ती सामंता दिग्दर्शित 'अमरप्रेम',

जम्बो दिग्दर्शित 'अपना देश' हे तीन चित्रपट अंतरा अंतराने सुपरहिट! राजेश खन्नाचे युग होते हो. हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'बावर्ची' सेमी-हिट ठरला . पण 'जोरु का गुलाम' (रिलीज १५ सप्टेंबर) आणि 'मेरे जीवन साथी' हे लागोपाठच्या शुक्रवारी प्रदर्शित झाले आणि राजेश खन्नाच्या व्यावसायिक शत्रू, टीकाकार, मिडिया यांना आयतीच संधी मिळाली. आणि त्यात राजेश खन्नाच्या आणखीन काही फ्लॉपची भर पडली. हा सगळा एकाच वेळेस अनेक चित्रपट साईन करणे, मग पटकथेत फेरफार करणे, आता कामाची घाई असल्याने पाठ केल्यागत संवाद बोलणे आणि त्याच्या चित्रपटाच्या वितरकांचा अतिआत्मविश्वास यातून ही पडझड झाली. तनुजाबरोबरचा राजेश खन्नाचा हा चिन्नापा देवरच्या 'हाथी मेरे साथी' (१९७१) या सुपर-हिट चित्रपटानंतरचा चित्रपट! तर त्यानंतर जम्बो दिग्दर्शित 'हमशकल' (१९७४) मध्ये पुन्हा एकत्र आले! त्याचीही गाणी आजही लोकप्रिय आहेत. पण

तोही फ्लॉप ठरला! 'मेरे जीवन साथी'ची एकच जमेची बाजू म्हणजे राहुल देव बर्मनचे तरुण आणि सदाबहार संगीत! ती त्याची खासियतच!

'ओ मेरे दिल के चैन..' हे गाणं त्याच्या स्वप्नात आलं असाही एक भारीच किस्सा आहे! गंमत म्हणजे, हे गाणं आधी राजेश खन्नाने चक्क विशेष दम नाही असे म्हणतच नाकारले होते. (अनेकदा तो आपल्या गीत संगीतावर विशेष लक्ष देई. रेकॉर्डिंगलाही हजर राही.) पण १५ मिनिटात आर. डीने राजेश खन्नाची समजून घातली आणि हे गाणं सिनेमात आलं! आजही हे गाणे लोकप्रिय आहे!

हिट गाण्यानी अनेक चित्रपट अनेक वर्षे 'फोकस' मध्ये ठेवलेत. तसाच हा एक! गीत संगीत व नृत्य ही आपल्या समाजाची आणि चित्रपटांची मोठीच ओळख आहे!

© दिलीप ठाकूर
(नवराष्ट्र रविवार पुरवणी - क्षितिज)
♥

**लेख क्र. ५५**

## वेगळ्या जितेंद्रचा 'परिचय' चक्क त्रेपन्न वर्षांचा..!




जितेंद्रकडून उत्तम अभिनय करवून अथवा काढून घेतलेले पहिले दिग्दर्शक कोण आणि तो पहिला चित्रपट कोणता? प्रश्न पूर्ण व्हायच्या आत जितेंद्रच्या 'फॅन्स आणि फॉलोअर्स'कडून तर झालेच पण एकूणच चित्रपट रसिकांनी उत्तर दिले असणार!

गुलजार दिग्दर्शित 'परिचय '! येस!

हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि जितेंद्र केवळ "जम्पिंग जॅक हिरो" नाही, तर त्याला अभिनयही येतो यावर

चित्रपटसृष्टी, चित्रपट रसिक आणि त्या काळातील मुद्रित माध्यमे यांनी पहिल्यांदाच विश्वास ठेवला! अशा प्रकाराचा आपल्याबाबतचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होणे ही तेव्हा जितेंद्रची एक व्यावसायिक गरजही होती, म्हटलंत तर 'खेळी'ही होती! आणि ती साध्य होताना 'परिचय' ने मुंबईत मेन थिएटर लिबर्टीत रौप्य महोत्सवी यश संपादले. २० ऑक्टोबर १९७२ रोजी मुंबईत प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाला चक्क त्रेपन्न वर्षे पूर्ण होत आहेत!

कलाकार म्हणून करियर करताना चित्रपटाच्या यशाचे टॉनिक तर लागतेच, तेच तर ओळख देते, पण काही वेगळेही करावेच लागते! त्यावर जास्त लक्ष जाते! जितेंद्रच्या प्रगती पुस्तकातील सुरुवातीचे गुण हिट गाण्यांचे. रवि नगाईच दिग्दर्शित 'फर्ज' मधील 'मस्त बहारोंका मै आशिक..', 'बार बार दिन ये आए..', तर रामन्ना दिग्दर्शित 'हमजोली' मधील 'हाय रे हाय नींद नही..', 'ढल गया दिन..' नासिर हुसेन




दिग्दर्शित 'कारवाँ' मधील 'चढती जवानी मेरी..', 'कितना प्यारा वादा..', 'गोरियां कहा तेरा देस रे..', रामन्ना दिग्दर्शित 'वारीस' मधील 'लहरा के आया है..', 'एक बेचारा प्यार का मारा..', 'कभी कभी ऐसा भी तो..', रविकांत नगाईच दिग्दर्शित 'हिम्मत' मधील 'है शुकर के तू है लडका..', 'मान जाईए मान जाईए..' अशा अनेक सुपर-हिट गाण्यांतील जितेंद्रचे धसमुसळे नाचणे, कंबर हलवणे, नायिकांना धक्के देणे यामुळेच त्याची 'उछलकूद हिरो' अशी इमेज झाली होती! आणि अशा डान्सर हीरोला प्रतिष्ठा मिळत नाही. (काय एकेक अलिखित नियम!) तो सवंग 'एन्टरटेनर' म्हणून दुर्दैवाने ओळखला जातो. आपला चित्रपट गीत संगीत व नृत्य यामुळेच जगापेक्षा अगदी वेगळाच असल्याने ते रुपेरी

पडद्यावर साकारणारा हीरो महत्त्वाचा असतो! (जुन्या व्याख्या बदला हो!) तुलनेत अभिनेत्रींच्या रुपेरी नृत्याला सकारात्मक दाद अशीच दीर्घकालीन परंपरा!

तात्पर्य, जितेंद्रला 'नाचो हिरो' या प्रतिमेतून बाहेर यायचंय आणि त्यासाठी त्याचा भाऊ 'प्रसन्न कपूर' यानेच पुढाकार घेत 'तिरुपती पिक्चर्स' या बॅनरखाली चित्रपट निर्मिती करायचे ठरवले! (आपल्या इथे गावकी-भावकीचे वाद असल्याने हे कदापि शक्य नाही, म्हणा!) दिग्दर्शक म्हणून 'गुलजार' हेच योग्य नाव होते! ते दिवस राजेश खन्नाच्या क्रेझने व्यापलेले होते! जितेंद्रलाही याचा फटका बसला होताच! अशा वातावरणात गुलजार दिग्दर्शित 'परिचय' उत्तम संधी होती! राजकुमार मैत्रा यांच्या 'कारंजी उतरैन' या बंगाली कादंबरीवर आधारित गुलजार आणि डी. एन. मुखर्जी यांनी पटकथा लिहिली! गुलजार यांचेच संवाद! चित्रपटात जितेंद्र, जया भादुरी, प्राण, असरानी, गीता

**सिध्दार्थ, वीणा, लीला मिश्रा, पेंटल, केश्तो मुखर्जी तसेच विशेष भूमिकेत संजीवकुमार आणि पाहुणा कलाकार विनोद खन्ना! तर गुलजार यांच्या गीताना राहुल देव बर्मनचे संगीत! जे आजही लोकप्रिय आहे! मित्रांनो.. गाण्यांच्या विषयावरून आठवलं..! १९७२ चे हिंदी चित्रपट.. (म्हणजे या क्षणी त्रेपन्न वर्षे उलटली की हो!) सिनेमातून फक्त 'डायलॉगबाजी' हिट करणारे सिनेमे नव्हते म्हणा! आम्ही तरुण होत असतानाचे हे सिनेमे! 'पाकिजा', 'सीता और गीता', 'दुश्मन', 'अमर प्रेम', 'राजा जानी', 'बेईमान', 'गोरा और काला', 'अपना देश', 'व्हिक्टोरिया नंबर २०३', 'जवानी दिवानी', 'समाधी', 'परिचय', 'जोरु का गुलाम', 'अनुराग'.. किती नावे सांगू!? या प्रत्येक सिनेमातली किमान दोन ते तीन किंवा सर्वच गाणी सध्या 'साठीत' असणाऱ्यांनी आपल्या कानामनात साठवून ठेवलीत! गंमत सांगायची तर विविध 'म्युझिक क्लासेस'मध्ये गिटार, पियानो, फ्ल्यूट, गायन शिकवताना तिथले वयाच्या**

केवळ 'पंचवीशी-तिशीतले' संगीत शिक्षक, काय शिकवतात? तर सिनेमांच्या 'नव्या' गाण्यांना चक्क फाट्यावर मारून ते जुनी गाणीच शिकवतात! कुणाला? तर आज आठ, दहा ते पंधरा या वयोगटातल्या त्यांच्या विद्यार्थ्यांना! हीच तर कमाल आहे जुन्या गाण्यांची!) तो काळ अनेक बाबतीत वेगळाच! घोषणेपासूनच छोट्या छोट्या बातम्यांतून चित्रपट रसिकांसमोर राही आणि मग चित्रपट पूर्ण होत असतानाच त्याची तबकडी प्रकाशित होई. आणि गुलजार यांच्या गीताना आर. डी. बर्मनचे संगीत म्हणजे, कधी एकदा ही नवीन गाणी ऐकतोय असे होणारे. 'मुसाफिर हू यारो..' (किशोरकुमार), 'बीती ना बीताई रैना..' (लता मंगेशकर व भूपिंदर सिंग), 'मितवा बोले मिठे..' (भूपिंदर सिंग), 'सारे के सारे..' (आशा भोसले आणि किशोरकुमार) ही गाणी लोकप्रिय झाली! 'बिनाका गीतमाला' मध्ये 'मुसाफिर हू यारों..' बऱ्याच वरच्या क्रमांकावर आले देखील.

**जितेंद्रचे वेगळे रुप हे 'परिचय' चे विशेष आकर्षण आणि उत्सुकता! 'परिचय'ची थीम अगदी थोडक्यात सांगायची तर.. आर्मीतील निवृत्त अधिकारी राज साहेब (प्राण) याना आपल्या रमा (जया भादुरी आणि मास्टर राजू वगैरे) आणि इतर नातवंडां साठी चांगला शिक्षक हवा आहे. कारण जो जो शिक्षक येतो त्याला ही नातवंडे सळो की पळो करुन सोडतात. अखेर रवि (जितेंद्र) येतो. या शिक्षकालाही तोच अनुभव येतो. पण तो हळूहळू आपल्या संयमित व खेळकर वागण्यातून सगळ्याना आपलेसे करतो. राज साहेब यांचा मुलगा निलेश (संजीवकुमार) हा संगीतात विशेष रस घेणारा असतो. त्याच्या आणि त्याची पत्नी सुजाता (गीता सिध्दार्थ) यांच्या निधनानंतर त्यांच्या मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी राज साहेबवर असते. चित्रपटात आणखीन काही छोट्या छोट्या गोष्टी आहेतच. संकलन वामन गुरु यांचे आहे. या चित्रपटाची मूळे 'साऊंड ऑफ म्युझिक' या विदेशी**

चित्रपटात सापडतात असे म्हटले गेले असले तरी त्याचे आपल्याकडील चित्रपटातील सादरीकरण उत्तम जमलयं हे महत्वाचे! 'परिचय' प्रदर्शित झाला आणि रसिकांनी त्याला आपलासा केला. चित्रपटाच्या स्वरुपानुसार त्याचे मुंबईतील मेन थिएटर 'लिबर्टी' अगदी परफेक्ट! नवीन रुपातील जितेंद्र त्याना आपलासा वाटला. जयाचे रुपडं तसे परिचित. पण जितेंद्र अगदी संयमित आणि सरळ वृत्तीचा होता. त्या चित्रपटाच्या यशाने जितेंद्रची गाडी पुन्हा रुळावर आली आणि एका बाजूस कौटुंबिक मनोरंजक चित्रपटातून भूमिका साकारत असतानाच दुसरीकडे गुलजार दिग्दर्शित 'खुशबू' (१९७५), 'किनारा' (१९७७) अशा कथाप्रधान चित्रपटांतूनही



**त्याने भूमिका साकारत आपली वाटचाल यशस्वीपणे पुढे सुरु ठेवली. तेच तर महत्त्वाचे असते. त्यासाठी जितेंद्रसाठी टर्निंग पॉईंट ठरला, गुलजार दिग्दर्शित 'परिचय'. जितेंद्रचा नवा परिचय करुन देणारा चित्रपट!**

**© दिलीप ठाकूर**
**(नवराष्ट्र रविवार पुरवणी - क्षितिज)**
♥

## लेख क्र. ५६

## हिंदी चित्रपट 'राजा जानी'! चक्क त्रेपन्न वर्षेपार!
## 'ए बी सी डी छोडो..' आणि बरंच काही!!




रत्ना (हेमा मालिनी) रुपेरी पडद्यावर मनसोक्त गातेय आणि ते देखील खलपुरुष प्रताप बहादूर सिंग (प्रेम चोप्रा) याला उद्देशून! आश्चर्य वाटतेय? उंचावरील एका अतिशय प्रसन्न अशा गार्डनमध्ये हा अनोख्या 'प्रेमाचा खेळ' रंगलाय आणि राजकुमार सिंग 'राजा' (धर्मेंद्र) व त्याचा साथीदार इमारतीलाल (जॉनी वॉकर) हे आडोश्याला उभे राहून हा सगळा प्रकार पाहताहेत. यावरुन राजकुमार सिंगचा खूपच

जळफळाट होतोय! (खरं तर गरम धरमने पुढे सरसावत प्रेम चोप्राला बेदम कुटायला हवे. पण तसे होत नाही!)

सिच्युएशन कशी वाटतेय? थीमनुसार ती आहे तर खरं! पण त्यावरुन फिल्मी कट्ट्यावर छान गप्पा रंगत. प्रेम चोप्राला आपल्या भल्या मोठ्या कारकिर्दीत असा सुखद योग एकादाच! अर्थात 'कहानी की मांग के अनुसार' असे यावर फिल्मी उत्तर असतेच. आणि हा फंडा मदन मोहला निर्मित सेव्हन आर्टस पिक्चर्स या बॅनरखालील मोहन सैगल दिग्दर्शित 'राजा जानी' (प्रदर्शन ३ नोव्हेंबर १९७२) या म्युझिकल हिट चित्रपटातील. चक्क त्रेपन्न वर्षे झाली हो या चित्रपटाला!

सुपर हिट चित्रपट काळाला कधी मागे सारतो हे लक्षात येत नाही हेच खरे. सत्तरच्या दशकातील हिंदी चित्रपट म्हणजे एक प्रकारची घुसळणच होती. त्यात अनेक चटक मटक आपापली 'स्पेस' तयार करीत होता. त्यात एक फंडा

गॉसिप्सचा होता. धर्मेंद्र व हेमा मालिनी यांची पडद्यावर छान जमत असलेली जोडी पडद्यामागेही जमलीय/एकमेकात गुंतत चाललीय या टप्प्यावरचा हा चित्रपट! 'शराफत' (१९७०), 'तुम हंसी मै जवाँ' (१९७०), 'नया जमाना' (१९७१) यानंतरचा या सुपर हिट  जोडीचा 'राजा जानी' हा चित्रपट आणि लगेचच 'सीता और गीता' (१९७२) ही आलाच! या जोडीने २८ चित्रपटात एकत्र भूमिका साकारली. एक फिल्मी रेकॉर्ड!  त्यात 'राजा जानी' हा त्यांच्या अनेक सुपर हिट पिक्चर मधील एक! (संबंधित सर्व 'लिंक्स' देतोय, 'यू- ट्युब' वर एन्जॉय करु शकता!)

तुम्हाला कदाचित आश्चर्य वाटेल, अनेक सोबर भूमिका साकारत साठच्या दशकात आपली कारकीर्द आकाराला आणलेल्या धर्मेंद्रला ओ. पी. रल्हन दिग्दर्शित 'फूल और पत्थर' (१९६५) मधील पोस्टरवरील उघड्या निधड्या पिळदार पोझने (या पिक्चरमधील आजारी

मीनाकुमारीसोबतची पोझ! अर्थात कहानी की मांग!) ॲक्शन हीरोची इमेज द्यायची जणू पेरणी केली. आणि मग कधी सोबर तर कधी देमार भूमिका साकारत साकारत तो पुढे जात राहिला आणि त्यात 'राजा जानी' महत्वाचा! एव्हाना तो कात टाकण्यात यशस्वी ठरलेला. हेमा मालिनीने 'सपनो का सौदागर' (१९६८) पासून रुपेरी पडद्यावर पदार्पण केले तेच 'ड्रीम गर्ल' म्हणून आणि एकेक चित्रपट करत करत वाटचाल सुरु असताना एक भारी हिट हवाच होता. तो 'राजा जानी' ठरला! हा चित्रपट Anastasia या अमेरिकन चित्रपटावर आधारित असल्याचे म्हटले गेले! महत्वाचे असते ते त्याला हिंदी चित्रपटाचे रुपडं कसे दिले जातेय. अली रझा यांनी तसे कथा लेखन केले. नबेन्दु घोषने पटकथा लिहिली आणि हा मसालेदार मनोरंजक चित्रपट आकाराला आला!

याचे मध्यवर्ती कथासूत्र असे, राजघराण्याचा वारसदार म्हणून राजकुमार सिंग उर्फ राजा (धर्मेंद्र) एका युवतीला

त्यानुसार घडवण्याचे आव्हान स्वीकारतो! (त्यामागचे खरे कारण चित्रपटाच्या क्लायमॅक्सला सापडते!) आणि तो रस्त्यावर नाच काम करणाऱ्या शम्मोची (हेमा मालिनी) निवड करतो. अशा नाचकाम करणाऱ्या युवतीमध्ये आंतर्बाह्य बदल करणे खूपच आव्हानात्मक असते. ते होत जाताना ती मॉडर्न बनते आणि पटकथा अनेक वळणे घेत घेत रंगत जाते. आता शम्मो 'रत्ना' बनते. आता राजा आणि रत्ना यांची प्रेमकथा! दीवाण गजेंद्रसिंग (प्रेमनाथ) या सगळ्यात कुटील खेळी/डावपेच खेळवतात आणि पिक्चर रंगत जातो! पिक्चरमध्ये अन्य भूमिकेत जॉनी वॉकर, सज्जन, हेलन, बिंदू, सी. एस. दुबे, सुरेश, मनमोहन इत्यादी. त्या काळात गीत, संगीत व नृत्य मनोरंजनात भर टाकत असे. आनंद बक्षी यांची गीते आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्या संगीताने झक्कास स्कोर केला! पिक्चरच्या सुरुवातीलाच 'जानी ओ जानी..' (किशोरकुमार) आणि मग थोड्याच वेळात 'दुनिया का मेला,

'मेले मे लडकी..' (लता मंगेशकर) गाण्यावर हेमा मालिनीचे बेहतरीन नृत्य! पटकथेत गाण्याच्या जागा नेमक्या पेरलेल्या/काढलेल्या आणि पिक्चर पुढे सरकता ठेवण्यात यशस्वी ठरलेल्या. 'मुबारक हो तुझे ऐ दिल..' (लता मंगेशकर), 'ए बी सी डी छोडो..' (लता मंगेशकर), 'कितना मजा आ रहा है..' (लता मंगेशकर), 'आ आजा कुछ कह..' (लता मंगेशकर) ही गाणी आजही लोकप्रिय! 'ए बी सी डी छोडो..' हे 'टिपिकल' त्या काळातील हिंदी चित्रपटाच्या कल्चरमध्ये फिट्ट बसणारे. त्या काळात नायिका नायकाला पत्र लिहून देई ('रामपूर का लक्ष्मण' मधील 'गुम है किसी के प्यार मे..'). अशा ग्रामीण भागातून आलेल्या नायकाला शुध्द कसे बोलायचे हे शिकवे. 'ए बी सी डी छोडो..' गाण्यात नायिकेला आधुनिक करण्यासाठी नायक तिला इंग्लिश शिकवतोय तर ती म्हणते, 'नैना से नैना जोडो..' धमाल सिच्युएशन आणि पिक्चरमध्ये रंगत! दिग्दर्शक मोहन सैगल

यांची वाटचाल विविध प्रकारचे चित्रपट रसिकांसमोर आणण्याची. त्यामुळे मेकिंगमध्ये तोचतोचपणा येत नाही. 'न्यू दिल्ली' (१९५६), 'अपना हाथ जगन्नाथ' (१९६०), 'करोडपती' (१९६१), 'देवर' (१९६६), 'कन्यादान' (१९६८), 'साजन' (१९६९), 'सावन भादों' (१९७०)




यानंतरचा त्यांचा 'राजा जानी'! यानंतर त्यांनी 'इंतजार' (१९७३), 'वो मै नहीं' (१९७४), 'संतान' (१९७६), 'एक ही रास्ता' (१९७७) वगैरे अनेक चित्रपटांचे दिग्दर्शन केले. चित्रपटसृष्टीला त्याचे सर्वात मोठे देणे म्हणजे 'रेखा'. त्यांच्याच 'सावन भादों' या चित्रपटाव्दारे तिने रुपेरी पदार्पण केले..!

'राजा जानी' हा त्या काळाला अतिशय फिट्ट बसेल अशा फॉर्मुल्यावरील मनोरंजक चित्रपट. राजघराणे, संपत्तीचा वारसदार, संपत्तीवर एकाद्याची बुरी नजर, कुटील डावपेच आणि मोठा संघर्ष. क्लायमॅक्सला धक्कादायक रहस्याची उकल. या साऱ्याची भक्कम मांडणी महत्वाची. तीच 'राजा जानी'मध्ये जमून आली. अहो, यश दूरवर राहिलचं कसे? आणि यशच कायम लक्षवेधक असते. मग ते त्रेपन्न वर्षांपूर्वीचे का ना असेना..!?

© दिलीप ठाकूर
(नवराष्ट्र रविवार पुरवणी - क्षितिज)
♥

**लेख क्र. ५७**

## कारकिर्दीची यशस्वी पंचेचाळीशी..!
## 'विधु विनोद चोप्रा'च्या चित्रपटांची नवलाई!




**आपल्या देशामध्ये चित्रपट म्हणजे एक प्रकारचा 'उत्सव'! आणि चित्रपटाच्या महोत्सवांना सतत कोणते ना कोणते निमित्त असतेच... नसेल तर ते अतिशय हुशारीने काढले जाते! बरं उत्सव म्हणजे तरी काय अनेकांनी एकत्र येऊन साजरा करण्याचा 'सुखद योग'..! काय असेल ते असो, अशा महोत्सवाच्या निमित्ताने जुने चित्रपट रसिकांसमोर येतात आणि त्या महोत्सवामध्ये जुन्या आणि आजच्या पिढीचे**

चित्रपट रसिक एकत्रपणे त्या कलाकृतीचा आनंद घेतात! हा 'फील', हा योग काही वेगळाच असतो! यानिमित्ताने त्या जुन्या चित्रपटाची चर्चा होते. त्या काळामध्ये दिग्दर्शकांने नेमका काय विचार केला असेल, ते चित्रपट का यशस्वी ठरले?, त्या काळामध्ये त्या चित्रपटाबद्दल समीक्षकांची प्रेक्षकांची मते काय होती, तेव्हाचे सामाजिक सांस्कृतिक वातावरण कसे होते अशा अनेक गोष्टींवर या निमित्ताने फोकस पडतो..!

असाच एक दिग्दर्शक आहे 'विधु विनोद चोप्रा'! याची जर तुम्हाला वेगळ्या पद्धतीने ओळख करुन द्यायची झाली तर तुम्हाला रामगोपाल वर्मा दिग्दर्शित 'रंगीला' (१९९५) या चित्रपटांमध्ये गुलशन ग्रोवरने साकारलेली चष्मीश दिग्दर्शकाची व्यक्तिरेखा आठवते का बघा. तो 'या चित्रपटातील चित्रपटात' काही प्रसंगाचं दिग्दर्शन करत असताना सतत वैतागलेला असतो आणि तो सतत म्हणत

असतो, माझी जागा हॉलिवूडमध्ये आहे! मला भारतात राहण्यामध्ये फारसा रस वाटत नाही वगैरे वगैरे. हे 'कॅरेक्टर' म्हणजे एक प्रकारे दिग्दर्शक विधु विनोद चोप्राची घेतलेली फिरकी आहे! म्हणजे चोप्रा हा पाश्चात्य तंत्राने आणि चित्रपट शैलीने भारावलेला असा दिग्दर्शक असाच ओळखला जातो! असं असलं तरी त्याने हिंदी चित्रपटसृष्टीत अतिशय चांगल्या पद्धतीने ठसा उमटवलाय! आणि त्याच्या कारकीर्दीला पंचेचाळीस वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने 'फिल्म हेरिटेज फाऊंडेशन'च्या वतीने १३ ते १९ ऑक्टोबर या कालावधीमध्ये 'पीव्हीआर आयनॉक्स'च्या वतीने देशातील अठ्ठावीस शहरांमध्ये त्याच्या चित्रपटाचा महोत्सव आयोजित केला होता!

'विधु विनोद चोप्रा'चे चित्रपट हे प्रामुख्याने ऐंशी आणि नव्वदच्या दशकातले! त्याच्यावर 'फोकस' टाकताना आपल्याला प्रामुख्याने लक्षात येते ती विविधता! विदु विनोद

चोप्रा  एकसूरी झाला नाही. सतत पहिल्यापेक्षा वेगळे करत राहिला ही त्याची जमेची बाजू!

त्याचा दिग्दर्शनीय पहिला चित्रपट "सजा ए मौत" (१९८१) हा एक  न्यायाधीश थ्रिलर अर्थात पाश्चात्य ढंगाचा स्टाईलचा चित्रपट! विधु विनोद चोप्राने त्याचे हिंदीकरण करताना त्या काळातील 'हायफाय कल्चर'चा युवक आपला प्रेक्षक ठरवला..असा 'फोकस' स्पष्ट हवा. चित्रपटांत नसरुद्दीन शाह, दिलीप धवन,  राधा सलुजा यांच्या भूमिका. मला आठवतेय, चर्चगेट विभागातील आकाशवाणी थिएटरमध्ये  हा सिनेमा प्रदर्शित झाला आणि पहिल्या चित्रपटांत विधु विनोद चोप्राने आपण कलात्मकता आणि व्यावसायिकता यांची सांगड घालणारे दिग्दर्शक आहोत यावरचा फोकस स्पष्ट केला! म्हणजे आपल्या चित्रपटाची समीक्षकांनी दखल घ्यावी,  त्याचं कौतुक करावं पण त्याच वेळेला त्या चित्रपटांना रसिकांनी देखील स्वीकारावं असा

ताळमेळ त्याने ठेवला! त्याने एक मध्यम मार्ग काढला असं म्हणता येईल. त्यानंतरचा त्याचा रहस्यरंजक चित्रपट "खामोश" (१९८५) मध्ये अमोल पालेकर, नसिरुद्दीन शहा, शबाना आजमी, पंकज कपूर, सोनी राझदान, सुषमा सेठ, सदाशिव अमरापुरकर इत्यादींच्या भूमिका..! काश्मीरमधील पहेलगांम येथील एका हॉटेलमध्ये शूटिंगच्या निमित्ताने जमलेल्या युनिटमध्ये खून होतो आणि एक गडद रहस्य निर्माण होते. तो खुनी कोण आहे त्याचा मागोवा घेण्याचा प्रवास म्हणजे हा चित्रपट "खामोश"!




आता विधु विनोद चोप्राने आपला 'कॅनव्हास' वाढवला. मुंबईच्या गॅंगस्टरवरचा अतिशय दाहक 'परिंदा' (१९८९)

रुपेरी पडद्यावर आणला आणि त्याची अतिशय प्रभावी मांडणी पाहून सगळेच स्तब्ध! अतिशय शांतपणे याची पटकथा व संवाद गुंफलेत हे प्रत्येक फ्रेममध्ये दिसत होते! अंडरवर्ल्डबद्दलची अधिकाधिक माहिती, तपशील, संदर्भ त्यातील बारकावे मिळवून त्यात एक रोमँटिक कथा पेरली. कशा पद्धतीने युवक या अंडरवर्ल्डमध्ये गुंतला, गुरफटला जातो आणि त्या विश्वामध्ये कसं अतिशय थंड डोक्याने डावपेच लढवली जातात आणि क्रूरतेने एकेकाचा काटा काढला जातो, ते कसं एक प्रकारचं एक वेगळं जग आहे याच्यावरचा जबरदस्त फोकस असा हा चित्रपट! नाना पाटेकर, अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, माधुरी दीक्षित, अनुपम खेर इत्यादींच्या भूमिका असणाऱ्या या चित्रपटाची समीक्षक आणि प्रेक्षक आणि मोठ्या प्रमाणावर दखल घेतली! विशेषत: कलादिग्दर्शक नीतीश रॉय याच्याकडे या चित्रपटासाठी नितीन चंद्रकांत देसाई सहायक म्हणून काम

करत असताना त्यांनी उभारलेल्या अंधारातील समुद्रातील लॉन्चच्या सेटची बरीच चर्चा झाली. अंडरवर्ल्डवरील सर्वोत्कृष्ट पाच चित्रपटात 'परिंदा' चे नाव आवर्जून घेतले जाते हे दिग्दर्शकाचे यश. विधु विनोद चोप्राला संगीताचा कान व दृष्टी हे आता अधोरेखित होत गेले. विधु विनोद चोप्राने आपल्या प्रत्येक चित्रपटासह असं पुढचचं पाऊल टाकले...!




विधु विनोद चोप्रा हा 'एक चित्रपट झाला लगेच दुसरा करुया' अशा पद्धतीने याच विश्वामध्ये
रमणारा, वावरणारा असा दिग्दर्शक नाही! एक
चित्रपट झाल्यानंतर देश-विदेशातील चित्रपट पाहणे, भरपूर पुस्तके वाचणे, आजूबाजूच्या जगामध्ये काय सुरु आहे याचा

मागोवा घेणे आणि स्वतःला कशा पद्धतीने विकसित करणं अपडेट ठेवणं याकडे त्याचं विशेष लक्ष. नवीन चित्रपटासाठी अधिकाधिक नवीन कल्पनांवर तो विचार करणार नि एक निवडल्यावर त्यावर खोलवर काम करणार. अंधेरीतील नटराज स्टुडिओत त्याचं ऑफिस होते. त्या ऑफिसची मांडणी, बांधणी, शैली वेगळीच होती हे ते पाहताच लक्षात येई.

'1942 अ लव्ह स्टोरी' (१९९४) मध्ये त्याने इंग्रजांविरुद्धच्या 'चले जाव!' या चळवळीच्या पार्श्वभूमीवर एका प्रेमकथा साकारली. हिमाचल प्रदेशातील 'डलहौसी' येथे याचे चित्रिकरण करण्याचं त्यांनी पाऊल टाकलं ते विशेष कौतुकास्पद ठरले! या चित्रपटाच्या कला दिग्दर्शनामुळे नितीन चंद्रकांत देसाई नावाला 'ग्लॅमर' आले. काही चित्रीकरण राहिलं असता त्या पद्धतीची घरं आणि वातावरण

नितीन चंद्रकांत देसाईनी गोरेगावच्या दादासाहेब फाळके चित्र




नगरीत उभारलं आणि त्याची खूप चर्चा झाली. चित्रपटात अनिल कपूर, जॅकी श्रॉफ, मनीषा कोइराला, अनुपम खेर इत्यादींच्या भूमिका आहेत. खरं तर या चित्रपटांत माधुरी दीक्षित प्रेयसी साकारणार होती. माधुरी दीक्षितचे या चित्रपटातील व्यक्तीरेखेनुसार फोटोसेशन देखील झालं. तो फोटो आपल्याला सोशल मीडियात पाहायला मिळतो. परंतु त्याच सुमारास माधुरी दीक्षित इतर अनेक चित्रपटांमध्ये बिझी असल्याने तिला हा चित्रपट सोडावा लागला अन्यथा 'परिंदा' नंतर पुन्हा एकदा विधु विनोद चोप्राच्या

दिग्दर्शनामध्ये माधुरी दीक्षित पाहायला मिळाली असती! '1942 अ लव्ह स्टोरी' (मात्र तो 'यू-टयूब' वर उपलब्ध नाहीय याचं वाईट वाटतं!)

विधु विनोद चोप्राने काश्मीरमधील दहशतवादावरचा "मिशन कश्मीर" (२०००) साकारला. त्यात संजय दत्त, हृतिक रोशन, प्रीती झिंटा, सोनाली कुलकर्णी इत्यादींच्या भूमिका! काश्मीर दडपणाखाली कशा पद्धतीने श्रीनगर वगैरे ठिकाणी वातावरण आहे! जनसामान्यांची
कशी घुसमट झालीय! यातलं नाट्य आणि रोमांचकता आणि त्यात एक प्रेमकथा अशी एकूण मांडणी आहे!



'करीब' ( १९९८. प्रमुख भूमिकेत बॉबी देवल व नेहा) ही एक वेगळी तरल प्रेमकथा विधु विनोद चोप्राने आपल्यासमोर आणली! आपला दिग्दर्शनीय वारसदार म्हणून त्याने राजकुमार हिरानीला तयार केलं. हे फार कमी जणांना जमतं. आपल्या वीस बावीस वर्षाच्या वाटचालीनंतर
आपण 'निर्मात्याच्या भूमिकेत रहावे, एखादा
चित्रपट पण दिग्दर्शक आता पुढील पिढीचा
असावा हे स्वीकारायला वेगळी मानसिक ताकद लागते! ती विधु विनोद चोप्राने दाखवली. राजकुमार हिरानी विधु विनोद चोप्राकडे सहायक दिग्दर्शक होता! "मुन्नाभाई एमबीबीएस" या चित्रपटाची विधु विनोद चोप्राने घोषणा केली त्यावेळेला तोच या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार होता आणि शाहरुख खान प्रमुख भूमिका आणि संजय दत्त त्याच्या सहाय्यक भूमिकेत असा एकंदर




सेटअप होता! परंतु काही कारणास्तव 'विधु' या चित्रपटातून बाजूला झाला! आणि राजू हिरानीने "मुन्नाभाई"ची सूत्रे हाती घेतल्यावर शाहरुख खान सिनेमातून बाहेर पडला! त्याच्या जागी संजय दत्त आला आणि मूळ संजय दत्तच्या जागी जिमी शेरगिल आला! ग्रेसी सिंग नायिका भूमिका होती! जगण्याचा आनंद घ्या आणि इतरांनाही द्या. आयुष्याचे तत्वज्ञान हसत खेळत मांडणारा 'मुन्नाभाई' लोकप्रिय झाला! निर्माता म्हणूनही विधु विनोद चोप्राची जी कारकीर्द लक्षवेधक आहे! त्याने 'परिणीता', 'लगे रहो मुन्नाभाई', 'थ्री इडियट्स' इत्यादी चित्रपटाची निर्मिती केली. म्हणजे निर्माता/ लेखक/ दिग्दर्शक विधु विनोद चोप्रा! अशी वैशिष्ट्ये आहेत! आता "विधु विनोद चोप्राच्या चित्रपटांचा महोत्सव" एक विशेष

**मेजवानीच! त्याच्या दिग्दर्शनातील चित्रपटांनी त्या काळात चित्रपट रसिकांना अतिशय आनंद तर दिलेलाच आहे आता उपग्रह वाहिन्या , 'यू ट्यूब' चॅनेल, 'ओटीपी' या प्लॅटफॉर्मवर जरी हे चित्रपट उपलब्ध असले/नसले तरीसुद्धा 'मल्टिप्लेक्स'मध्ये पुन्हा एकदा या चित्रपटाचा आस्वाद, आनंद, घेण्यातही एक वेगळ्या प्रकारचा अनुभव आहे. देव आनंदच्या चित्रपट महोत्सवाला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाल्यामुळे मला असं वाटतं की आता अशा पद्धतीचे जुन्या चित्रपटांचे महोत्सव मुंबईसह देशातील पंचवीस तीस शहरांमध्ये आयोजित केले गेले तर त्यात आश्चर्य वाटायला नको! म्हटलं ना! आपल्या देशामध्ये चित्रपट एक 'उत्सव' असतो! फक्त त्यासाठी एखादं चांगलं 'निमित्त' असावे लागतं आणि त्याचे आपल्या देशातील चित्रपट रसिक नक्कीच स्वागत करतात..!**

**© दिलीप ठाकूर**
**(नवराष्ट्र रविवार पुरवणी - क्षितिज)**

"सुपर डुपर हिट्स" (भाग ३)© श्री. दिलीप ठाकूर

♥

**लेख क्र. ५८**

## चक्क बत्तिशीपार झाला हो....!
## 'हार कर जीतनेवालों को'.. 'बाजीगर' कहते है...!




चक्क नायकच 'निगेटीव्ह' भूमिकेत आहे. आपल्या पित्याच्या (अनंत महादेवन) मृत्यूस आणि आईच्या (राखी) दुरवस्थेला जबाबदार असलेल्याच्या (दलिप ताहिल) दोन्ही मुलींशी 'प्रेमाचा खेळ' करतो. एकीला (शिल्पा शेट्टी) लग्नाचे आमिष दाखवून इमारतीच्या गच्चीतून खाली ढकलतो! दुसरीशी (काजोल) तो प्रेमाचे नाटक

करतोय. तो सुडाने पेटलाय..!!

असा 'नायक ' चित्रपट रसिकांना आवडेल?

समजा चित्रपटाच्या शेवटी अशा क्रूरकर्मा नायकाचा मृत्यू दाखवला तर? की एका खूनप्रकरणी पोलीस त्याला पकडून नेतात असा क्लायमॅक्स ठेवला तर?

अनुभवी राखीनेच हा प्रश्न उपस्थित करुन हा दुसरा शेवट असावा म्हटलं. वितरकही तेच म्हणत होते. दिग्दर्शक अब्बास मुस्तान यांनी 'सेफ झोन' म्हणून दोन्ही शेवट चित्रीत केले. प्रेक्षकांना पहिला शेवट रुचला नाही तर पटकन त्यात बदल करायचा याची तयारी ठेवली!

रसिकांना मात्र 'बाजीगर' (रिलीज १२ नोव्हेंबर १९९३....चक्क बत्तीस वर्ष झाली देखील. म्हणूनच हा 'फोकस'!) चा पहिला शेवट आवडला! चक्क 'निगेटीव्ह' भूमिका साकारलेला 'हीरो' आवडला. चक्क नायक प्रेयसीला गच्चीतून ढकलतो आणि खाली ती बेशुद्ध पडली असता,

तिच्याभोवती पोलीस व पब्लिक असतानाही हा क्रूरकर्मा हीरो त्याकडे दुर्लक्ष करुन चालून जातो या दृश्याला पब्लिकचा भारीच रिस्पॉन्स मिळाला. याचं कारण, नव्वदच्या दशकात चित्रपट रसिकांना व्यावसायिक चित्रपटाची मोडलेली चौकट पाह्यची होती. या हीरोवर अन्याय झालाय म्हणून तो असा कठोर वागला हे त्यांना पटले होते. वर्षानुवर्ष रुपेरी पडद्यावर चिकटलेल्या नायक व खलनायकाच्या प्रतिमेत त्यांना आता बदल हवा होता. नायक म्हणजे असंख्य सदगुणाचा पुतळा आणि व्हीलन म्हणजे पापी, दुर्जन, दुष्ट हेतू असलेला हे फारच झाले होते. या चौकटीला मुकुल आनंद दिग्दर्शित 'ऐतबार' (राज बब्बर) आणि 'अग्निपथ' (अमिताभ बच्चन) यानी नक्कीच धक्का दिला होता! आता




त्यापुढे जायला हवे होते. ती गरज होतीच. यश चोप्रा दिग्दर्शित 'डर' मध्ये देखील सहनायक (शाहरुख खान) खलप्रवृतीचाच आहे. तो आपल्याला आवडलेल्या युवतीवर (जुही चावला) ती विवाहित असूनही 'क.... क.... किरण.. तुम मेरी

हो किरण!' असं विकृतपणे म्हणत एकतर्फी प्रेम

करतो. मला आठवतय, मुंबईतील मेट्रो थिएटरमध्ये पिक्चरच्या हीरो (सनी देओल) पेक्षा काहीश्या विकृत अशा सहनायकाला हाऊसफुल्ल

गर्दीचा रिस्पॉन्स मिळला. 'बाजीगर' च्याच क्रेझमध्येच 'डर' आला (रिलीज २४ डिसेंबर १९९३)

तोच फर्स्ट शोपासूनच सुपर हिट! 'बाजीगर'च्या 'न्यू एक्सलसियर'मधील प्रीमियरला सुभाष घईची खास उपस्थिती होती! मुंबईत मेन थिएटर 'ड्रीमलॅन्ड'ला झळकताना पिक्चर इतकं हिट होईल असं वाटले नव्हते. शाहरुख खान या नावाभोवती अजून वलय वाढले नव्हते. तो व काजोल जोडीचा हा पहिलाच चित्रपट! शिल्पा शेट्टीचा पहिलाच चित्रपट (दिलीप नाईक दिग्दर्शित 'गाता रहे मेरा दिल' खरं तर तिचा पहिला चित्रपट! अंधेरीतील नटराज स्टुडिओत मुहूर्त झाल्याचे आठवतयं! चार रिळांच्या शूटिंगनंतर पिक्चर डब्यात गेला.) तात्पर्य, 'बाजीगर' ला स्टार व्हॅल्यू नव्हती. ती पिक्चर हिट झाल्यावर येते. तसेच येथे झाले. गंमत माहित्येय का? एक जानेवारी १९९३ म्हणजे नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी याचे शूटिंग सुरु होईपर्यंत शाहरुख व काजोल एकमेकांना ओळखत नव्हते. नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी शूटिंग करावे या मताचा शाहरुख

होता तर शाहरुखचं रुपडं पाहून 'याला कोणी हीरो केला' यावर काजोल आपल्या मेकअपमनकडे अखंड बकबक करीत होती. शाहरुख या बडबडीला कंटाळला होता. खुद्द काजोलने एका मुलाखतीत ही गोष्ट रंगवून सांगितलीय!

'बाजीगर ओ बाजीगर..', 'ऐ मेरे हमसफर..', 'किताबे बहुत सी..', 'ये काली काली आँखे..' ही या पिक्चरची गाणी अगोदरच हिट झाल्याने (तो टेपरेकॉर्डर, ऑडिओ कॅसेटचा जमाना होता आणि 'बाजीगर' व्हीनस कॅसेट निर्मित चित्रपट! गाण्याचे महत्व ते जाणत!) पिक्चरची हवा होती! ('छुपाना भी नहीं आता..' या गाण्याविषयी सांगायचं तर.. ते आधी "पंकज उधास" यांच्या आवाजात "रेकॉर्ड" केलं गेलं होतं. धक्का बसला ना!? "नाम" (१९९२) या चित्रपटात एक "लाईव्ह कॉन्सर्ट" अशी "सिच्युएशन" निर्माण करून पंकजजी यांचे "चिठ्ठी आयी है.." जसं सादर केलं होतं तसंच आपण इथे सादर करायचं असा "स्टोरी बोर्ड" होता! पण

दिग्दर्शकांच्या मनात वेगळेच होते. एक "पार्टी" सुरू आहे त्यात गायक ("पंकज उधास") तिथे फिरत फिरत उपस्थितांत गाताहेत अशी त्यांनी संकल्पना मांडली. चित्रपटातील "इन्स्पे. करण सक्सेना" (सिद्धार्थ रे) हा "प्रिया चोप्रा" (काजोल) हिच्यावर एकतर्फी प्रेम करत असतो. त्याच्या मनाची घालमेल दाखवणे ही त्यामागची "थॉट" होती. मात्र पंकजजी यांनी ठाम नकार दिला.. "ते गाणं भले "गझल"च्या जातकुळीचे असले तरी असे "फिरत फिरत" तर मी अजिबात पेश करणार नाही. माझ्या "गझल गायक" या प्रतिमेला ते अजिबात शोभणारे नाही! प्लिज तुम्ही ते दुसऱ्या कुणाच्या तरी आवाजात करून घ्या.. जो "पॉप सिंगरच्या" थाटात तिथे पेश करेल!" झाली की पंचाईत! दिग्दर्शकांनी त्यावर कुणाला निवडायचं यावर बराच खल केला. त्यानंतर "संगीतकार श्रवण" यांचा धाकटा भाऊ "विनोदची" निवड केली. "ऑडिओ कॅसेट" मध्ये दोन्ही

"व्हर्शन्स" दिली गेली, हे नशीब! दोन्ही "लिंक" देतोय! नक्की ऐका!) शाहरुखचा 'परफॉर्मन्स' आवडताच पिक्चरचा रौप्य महोत्सवापर्यंतचा प्रवास सुखाचा झाला! यशासारखं महत्वाचे काहीच नसते म्हणा. चित्रपटात अनंत महादेवन, जॉनी लिव्हर, दिनेश हिंगू, सिध्दार्थ रे, रेशम टिपणीस इत्यादींच्याही भूमिका आहेत. शाहरुख रेशमचा गळा दाबून खून करतो या शूटिंगच्या आजही रेशम आठवणी सांगतेय. एक चित्रपट असे बरेच काही देतो. थीमवरुन हा विदेशी चित्रपटावर बेतलाय हे स्पष्ट आहेच. 'ए किस बिफोर डाईंग' (१९५६) यावरुन 'बाजीगर' आला तो रॉबिन भट्ट, आकाश खुराना व जावेद सिद्दीकी यांनी हिंदी चित्रपट शैलीत लिहिला. कोणी शाहरुखची तुलना राजकुमारशी तर कोणी राज बब्बरशी केली. तर कोणी नाना पाटेकरशीही केली. 'नकारात्मक व्यक्तिरेखा, पण शैली वेगळी'! पण शाहरुखचा अभिनय अगदी सुरुवातीच्या काळातील 'ज्वार भाटा',

'जुगनू', 'मेला', 'जोगन', 'दीदार'' वगैरे चित्रपटातील दिलीपकुमारसारखा होता!

'बाजीगर'साठी शाहरुख खानने 'फिल्म फेअर' पुरस्कार पटकावला आणि त्याच आनंदात तो इव्हेन्टसच्या रात्री अब्बास मुस्तान यांच्या दक्षिण मुंबईतील गजबजलेल्या वस्तीतील घरी गेला तेव्हा पहाटेचे चार वाजले होते. सोबत अन्नू मलिक वगैरे होते. 'बाजीगर 'चे महत्व त्याने जाणले म्हणायचं. हा किस्सा फार गाजला!

अशा 'व्हीलन हीरो' ने आदित्य चोप्रा याच्या दिग्दर्शित 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' (१९९५) पासून कात टाकली आणि एक नवीन पर्व जणू सुरु झाले. ते आजही सुरु आहे. 'बाजीगर' एक जणू 'ॲसिड टेस्ट' होता म्हणायचे का? अनिल कपूरने 'उगाच रिस्क नको' म्हणत 'बाजीगर ' नाकारला. सलमान खानने 'अशी व्यक्तिरेखा नको' म्हणत काही बदलही सुचवले आणि मग सलिम

खानना वाटलं, सलमानने अशी भूमिका आत्ताच साकारणे घाई होईल म्हणून पिक्चरही नाकारला! शाहरुखशी अब्बास मुस्तानने संपर्क साधताच त्याने 'स्टोरी सिटींग' केली आणि थीम आवडताच 'कुछ हटके करते है' म्हणतच हे आव्हान स्वीकारत तो 'बाजीगर ' झाला. युवा पिढीला असाच 'चॅलेंज ' स्वीकारणारा हीरो हवा होताच.... 'हार कर जीतने वालों को 'बाजीगर' कहते है'! हे तेव्हापासून कायमचेच हिट झालयं.

© दिलीप ठाकूर
(नवराष्ट्र रविवार पुरवणी - क्षितिज)

♥

♥

विशेष आभार : लेखक : डॉ. अनंत पावसकर,
(संरचना/मुखपृष्ठ/ले-आऊट)

♥




♥

**"सुपर डुपर हिट्स" (भाग ४) लवकरच तुमच्या भेटीला.**

♥







**"सुपर डुपर हिट्स" (भाग ३)© श्री. दिलीप ठाकूर**